**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे
मु. पो. केंदूर, ता. शिरुर, अपीलकर्ता
जि. पुणे - ४१२ ४१३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता - १.** श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे
मु. पो. केंदूर, ता. शिरुर, जि. पुणे

२. श्री. सुधाकर श्रीराम मंचरकर - प्रतिनिधी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री. पी. डी. भंडारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आपल्या मागणीतील ७ पैकी ४ मुद्दयांची माहिती विलंबाने मिळाली. ती अपुरी असून ऊर्वरित मुद्दयांची माहिती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी यानी जाणीवपूर्वक अपिलाची दखल घेतली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे यानी केले.

श्री. गावडे यानी 'मागील २० वर्षांतील तसेच चालू अर्जांवर' असे नमूद करुन विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. संभाव्य कारवाई, गृहितावर आधारित कृतीविषयक नियमावली, खुलासा अशा स्वरुपाची विचारणाही त्यात होती. उपलब्ध माहिती दिली व अभिलेखांचे अवलोकन करण्याबाबत कळविले. प्रत्येक प्रकरणातील कार्यवाहीचा शोध घेऊन माहिती द्यावी लागेल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे
श्री. पी. डी. भंडारे यानी केले.

अपीलकर्त्यांनी नेमकेपणाने व माहितीचा अधिकार, २००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या संज्ञेत बसेल अशा स्वरुपाची मागणी करणे आवश्यक आहे. अपीलकर्त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या प्रकरणातील देय ठरणारी कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री. पी. डी. भंडारे यानी अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अजित बाबासाो सासने
१८७०, 'बी', संभाजीनगर, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (।),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. संचालक,
नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९२ + ५३५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अजित बाबासाो सासने
१८७०, 'बी', संभाजीनगर, कोल्हापूर

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा सहा. संचालक,
नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. मा. द. राठोड

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. म. य. देवडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९७७ मध्ये कोल्हापूर महानगरपालिकेने रस्ते विकासासाठी आपली जमीन संपादित करुनही तिचा मोबदला दिलेला नाही. त्याबाबतची कोणतीही माहिती न देता नस्ती हरविल्याचे उत्तर दिले जाते, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अजित बाबासाो सासने यानी केली.

श्री. सासने यांच्या दि. १८.१.२०१० च्या अर्जाला दि. २०.१.२०१० रोजी उत्तर दिले. मात्र महानगरपालिकेच्या कामासह आपल्याकडे अन्य तीन पदभार असल्यामुळे, तसेच अपीलकर्त्यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असल्यामुळे मोबदलाविषयक मागणी वरील पुढील कार्यवाहीस अवधी लागला. आताच्या बाजारभावाप्रमाणे नुकसान भरपाईची त्यांची मागणी असून त्यावेळच्या बाजारभावाप्रमाणे रक्कम देण्यात येईल असे स्पष्ट केले असून तडजोड झाली आहे, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. म. य. देवडे यानी केले.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तरीही मूळ प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. म. य. देवडे यानी केलेली कार्यवाही उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. तानाजी रघुनाथ ढेरे
रितु-अनुग्रह निवास, लोकमान्यनगर, अपीलकर्ता
स्वस्तिक टाईलस मागे, कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
न्यू जनरेशन इन्नोव्हेटिव्ह स्कूल,
(संचलित श्रीनिवास एज्युकेशन सोसायटी),
लोकमान्यनगर, कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७९/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. तानाजी रघुनाथ ढेरे
रितु-अनुग्रह निवास, लोकमान्यनगर,
स्वस्तिक टाईलस मागे, कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
न्यू जनरेशन इन्नोव्हेटिव्ह स्कूल, (संचलित श्रीनिवास एज्युकेशन सोसायटी),
लोकमान्यनगर, कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्रीमती विजया मोहन

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

न्यू जनरेशन इन्नोव्हेटिव्ह स्कूल, कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर या शाळेकडून मागितलेली माहिती  जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, न्यू जनरेशन इन्नोव्हेटिव्ह स्कूल, (संचलित श्रीनिवास एज्युकेशन सोसायटी), लोकमान्यनगर, कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यानी दिली नाही. १० दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यानी देऊनही जन माहिती अधिका-यानी त्यानुसार कार्यवाही केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. तानाजी रघुनाथ ढेरे यानी केली.

श्री. ढेरे यानी मागितलेली माहिती आपल्या कक्षेतील नसून संस्थेच्या कक्षेतील आहे. विश्वस्त मंडळापुढे अर्ज ठेवून त्याबाबत कळविले जाईल, असे श्री. ढेरे याना कळविले. व्यवस्थापन समितीच्या दि.२८.१.२०११ रोजी होणा-या बैठकीत त्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे लेखी व तोंडी प्रतिपादन प्राचार्य श्रीमती विजया मोहन यानी केले. शाळा विनाअनुदानित असल्याचे त्यानी नमूद केले.

शाळा विनाअनुदानित असल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने  रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार शाळेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होणार नाही. या अधिनियमातील कलम २ मधील तरतुदीनुसार शाळा ‘सार्वजनिक प्राधिकरण’ ठरते याचे सप्रमाण निवेदन अपीलकर्ता करु शकले नाहीत. तथापि शाळा ‘सार्वजनिक प्राधिकरण’ ठरत असल्यास, माहिती द्यावयाची की नाही याचा निर्णय विश्वस्त मंडळ अथवा व्यवस्थापक समिती यांच्या मर्जीवर अवलंबून नाही, अधिनियमानुसार कार्यवाही करावी लागेल, याची समज  प्राचार्य, न्यू जनरेशन इन्नोव्हेटिव्ह स्कूल, (संचलित श्रीनिवास एज्युकेशन सोसायटी), लोकमान्यनगर, कोरोची, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्रीमती विजया मोहन याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आनंदराव दत्तात्रय जाधव
लोकमान्य टिळक चौक, मु. पो. नातेपुते, अपीलकर्ता
ता. माळशिरस, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे विभाग, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण,
मु. पो. व ता. फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१४/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. एस. पी. कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे विभाग, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण,
मु. पो. व ता. फलटण, जि. सातारा श्री. यु. डी. मोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. आनंदराव दत्तात्रय जाधव यांच्या दि. ५.१०.२००९ रोजी प्राप्त झालेल्या अर्जान्वये मागितलेली माहिती माळशिरस, पाटबंधारे उपविभागाशी संबंधित असल्यामुळे तेथील सहाय्यक जन माहिती अधिका-यांना कळवून दि. २२.१०.२०१० रोजी श्री. जाधव याना समक्ष दिली. याच स्वरुपाची माहिती त्यानी आधीच्या एका अर्जान्वये मागितली असल्यामुळे तसे कळवून शंका निरसनासाठी बोलावले असता ते आले नाहीत. कळविलेले शुल्क त्यानी भरले नाही. क्लिष्ट स्वरुपाची व तीच तीच माहिती ते पुनः पुन्हा मागत असतात. वेळोवेळी त्याना माहिती देण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि. सातारा श्री. यु. डी. मोरे यानी अनुषंगिक कागदपत्रांसह केले.

तीच तीच माहिती पुनः पुन्हा मागण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. तथापि केवळ पूर्वी माहिती दिली असल्याचे कळविणे व मुदतीनंतर शुल्काबाबतचे पत्र देणे योग्य नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दिलेल्या मुदतीतून सुट्टीचे व अधिका-यांच्या दौ-याचे दिवस वजा करुन गणना करणे, ही पध्दती चुकीची आहे. यापुढील काळात याबाबत दक्षता न घेतल्यास ते शास्तीस पात्र ठरतील, याची समज जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, मु. पो. व ता. फलटण, जि. सातारा श्री. यु. डी. मोरे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिरीष रामदास सरोदे
१-बी-१३, विश्रांती नगर, विठ्ठलवाडी, अपीलकर्ता
पुणे सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे - ४११ ०५१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शिरीष रामदास सरोदे
१-बी-१३, विश्रांती नगर, विठ्ठलवाडी,
पुणे सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे - ४११ ०५१

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. साहेबराव दांडगे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १,<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

मंजूर केलेल्या इमारत ले-आऊटच्या अनुषंगाने आपण जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. तसेच त्यांच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची कर्तव्ये/अधिकार व ते पार पाडताना त्यांच्याबाबत ठरविण्यात आलेली मानके याची माहिती मागितली होती. परंतु दिलेली माहिती अपूर्ण व चुकीची आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शिरीष रामदास सरोदे यानी केली.

श्री. सरोदे यांच्या अर्जाला मुद्देनिहाय उत्तर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. हेमंत गोरे यानी दिले. गृहितावर आधारित असे प्रश्न विचारुन त्या अनुषंगाने उत्तरे त्यानी मागितली आहेत. अशी उत्तरे देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अभिलेखात उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रती देता येतील, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे व अपिलीय प्राधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग क्र. १, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. साहेबराव दांडगे यानी केले.

गृहितावर आधारित प्रश्नांच्या अनुषंगाने भाष्य/अभिप्राय/खुलासा/अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार कर्मचा-यांची/अधिका-यांची कर्तव्ये व अधिकार जाहीर करणे बंधनकारक आहे. मानके घोषित न केल्याचे जन माहिती अधिका-यांचे उत्तर माहितीबाबत वस्तुस्थितीनिदर्शक असले तरी त्याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रशासकीय प्रमुख म्हणून आयुक्त, महानगरपालिका, पुणे यानी त्याची दखल घेऊन पूर्तता करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १ फेब्रुवारी २०११**

प्रत, आयुक्त, महानगरपालिका, पुणे याना पुढील कारवाईसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप आदाप्पा कामत
प्लॉट नं.४५, नगरपालिका नोकर हौसिंग सोसायटी,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, जयसिंगपूर नगरपरिषद,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक, जयसिंगपूर
नगरपरिषद कार्यालय, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री.दिलीप आदाप्पा कामत
प्लॉट नं.४५, नगरपालिका नोकर हौसिंग सोसायटी,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, जयसिंगपूर नगरपरिषद,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्रीमती शिल्पा दरेकर

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक, जयसिंगपूर नगरपरिषद कार्यालय,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर तत्कालीन-श्री.मिलिंद वसंतराव जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सांडपाणी निचरा होण्यासाठी केलेल्या गटारांच्या संदर्भात योग्य माहिती जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक, जयसिंगपूर नगरपरिषद कार्यालय, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर देत नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दिलीप आदाप्पा कामत यानी केली.

श्री.कामत यानी मागणी केलेली माहिती सन १९९० मधील असून त्यावेळचे अभिलेख उपलब्ध होऊ शकले नाहीत. याबाबत वेळोवेळी त्यांच्या अर्जांना मुद्देनिहाय उत्तर मुदतीत दिले आहे व उपलब्ध माहितीही दिली आहे. तसेच गटाराबाबत त्यांच्या मुख्य मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्रीमती अमिता दगडे यानी व पदाधिका-यांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणीही केली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक, जयसिंगपूर नगरपरिषद कार्यालय, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.मिलिंद वसंतराव जाधव यानी केले. संबंधित कागदपत्रांच्या जतनाच्या कालावधीनुसार तपासणी करुन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यानी आवयकतेनुसार महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अन्वये कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक अर्जुन चव्हाण
श्री माऊली विद्यालय, तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्री माऊली विद्यालय, तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६६ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक अर्जुन चव्हाण
श्री माऊली विद्यालय, तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.दत्तात्रय शंकर पोवार

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री माऊली विद्यालय, तिलारीनगर, ता.चंदगड,
जि.कोल्हापूर श्री.तुळसाराम लक्ष्मण गावडे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

निलंबन कालावधीतील पगाराबाबतची माहिती आपण दोन अर्जांद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री माऊली विद्यालय, तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यानी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली नाही. शुल्क भरुन घेतले परंतु साध्या कागदावर त्याची पावती दिली. वेगवेगळया स्वरुपाची पत्रे देऊन माहिती देणे सातत्याने लांबविण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी करीत असतात, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक अर्जुन चव्हाण यानी केली.

सन १९९६ ते २००९ या कालावधीतील विविध स्वरुपाची माहिती श्री. चव्हाण यानी दि.६.८.२००९ च्या अर्जान्वये मागितली. दि.५.९.२००९ च्या पत्रान्वये त्याना शुल्क कळविले. दि.१७.८.२००९ च्या अर्जान्वये पुन्हा त्यानी माहिती मागितल्यानंतर दि.१९.९.२००९ च्या पत्रान्वये उत्तर पाठविले. परंतु त्यानी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. शुल्क भरल्यास उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती दिल्या जातील, असे तेव्हाही स्पष्ट केले. दि.४.१.२०१० रोजी त्यानी शुल्क भरल्यानंतर कागदपत्रांच्या प्रती दिल्या. या स्थितीत माहिती न मिळाल्याची त्यांची तक्रार योग्य नाही. श्री.चव्हाण शाळेतच वरिष्ठ लिपिक म्हणून काम करत असून कागदपत्रांबाबतची पूर्ण माहिती त्याना आहे. शाळेने त्यांच्याविरुध्द दिवाणी दावा दाखल केला असून त्रास देण्यासाठी ते अशा स्वरुपाचे अर्ज व अपिले करीत आहेत. पाठविलेली पत्रे ते स्वीकारत नाहीत, म्हणून रजिस्टर्ड टपालाने पत्रव्यवहार करावा लागतो, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री माऊली विद्यालय, तिलारीनगर, ता.चंदगड, जि.कोल्हापूर श्री.तुळसाराम लक्ष्मण गावडे यानी केले. अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती त्यानी सादर केल्या. माहिती देण्याचे आदेश आपण दिले होते. परंतु त्यानुसार माहिती दिली नसल्याची अपीलकर्त्यांची तक्रार आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.दत्तात्रय शंकर पोवार यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता उभय बाजूंची भूमिका माहिती मागण्याच्या व देण्याच्या संदर्भात सकारात्मक नाही. माहितीपेक्षा आरोप-प्रत्यारोपावर अधिक भर

आहे, असे दिसून येते. त्याबाबतची शहानिशा हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. अपीलकर्त्यास आवश्यक तर अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती सशुल्क प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. किशोर वासुदेव पुरोहित
पुरोहित लंच होम, मईन रोड, पांचगणी, अपीलकर्ता
ता. महाबळेश्वर, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जि. सातारा
उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख महाबळेश्वर, ता. महाबळेश्वर, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२९/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/११/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. किशोर वासुदेव पुरोहित<br>पुरोहित लंच होम, मईन रोड, पांचगणी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,<br>भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,<br>जि. सातारा श्री. सतीश यादवराव भोसले<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,<br>भूमि अभिलेख महाबळेश्वर, ता. महाबळेश्वर,<br>जि. सातारा श्री. सूर्यकांत लक्ष्मण मोरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गुजराती समाज धर्मशाळा या विश्वस्त संस्थेबाबत मागितलेली माहिती अपुरी व तीन महिन्यांनी मिळाली. विश्वस्तांची नेमणूक कोणी केली ? धर्मादाय आयुक्तांनी नावे का लावलेली नाहीत ? या बाबतचे स्पष्टीकरण मिळाले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. किशोर वासुदेव पुरोहित यानी केली.

अपीलकर्ता श्री. किशोर वासुदेव पुरोहित यानी केलेल्या पहिल्या अर्जात तपशील नसल्यामुळे समक्ष बोलावून व पत्राद्वारे तपशील मिळाल्यानंतर माहिती दिली. त्यानंतर याच संदर्भात माहिती मागणारा आणखी एक अर्ज त्यानी केला. विस्तृत स्वरुपाची ही माहिती त्यानी शुल्क भरल्यानंतर रजिस्टर्ड टपालाने पाठविली. सन १९६६ मध्ये विश्वस्तांची नोंद झाली असून धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून त्याची प्रत मिळवून श्री. पुरोहित याना दिली. मूळ कागदपत्रे दुय्यम निबंधकांकडे असून अपीलकर्त्यांना ती त्यांच्या कार्यालयाकडून घेता येतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, महाबळेश्वर, ता. महाबळेश्वर,जि. सातारा श्री. सूर्यकांत लक्ष्मण मोरे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जि. सातारा श्री. सतीश यादवराव भोसले यानी केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती सशुल्क घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रविण साळवे
नवमहाराष्ट्र पत्रकार संघ, ३९५, विष्णुछाया अपार्टमेंट, मंगळवार पेठ, पुणे-११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे-७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रविण साळवे
नवमहाराष्ट्र पत्रकार संघ, ३९५, विष्णुछाया अपार्टमेंट, मंगळवार पेठ, पुणे-११

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे डॉ.मा.ल.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे श्रीमती अरूणा वि.चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पुणे विद्यापीठाच्या स्थावर विभागाकडील माहिती आपण दि. १४.१.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याच्या कारणावरुन कागदपत्रांची तपासणी करण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यानी दि.१३.२.२०१० च्या पत्रान्वये कळविले. परंतु त्यानुसार संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधला असता त्यानी वेळ नसल्याचे सांगून माहिती दिली नाही. नंतर अभिलेखाचे अवलोकन करुन मागितलेली माहिती ४ दिवसात देण्याचे कबूल करुनही व यादी देऊनही कार्यकारी अभियंता यानी माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रविण साळवे यानी केली.

श्री.साळवे यानी अनेक विषयांबाबतची अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती ढोबळ मानाने व सरसकट मागितली होती. त्यामुळे नेमक्या कागदपत्रांच्या प्रती देणे शक्य नसल्यामुळे अभिलेख अवलोकनासाठी कळविले. संचिका पाहिल्यानंतर आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी देण्याची विनंती करुनही त्यानी ती दिली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे श्रीमती अरूणा वि.चव्हाण व कार्यकारी अभियंता, स्थावर विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.सी.ढवळे, उपअभियंता यानी केले. अजूनही यादी दिल्यास प्रती देण्याची तयारी असल्याचे त्यानी नमूद केले. त्यांचे प्रतिपादन रास्त असल्याचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे डॉ.मा.ल.जाधव यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्ता यानी अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यानी ती नाकारलेली नाही. अभिलेख अवलोकन करण्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यानीही दिला असून या अनुषंगाने विस्तृत विवेचन केले आहे. ते रास्त आहे. मात्र कार्यकारी अभियंता, स्थावर विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांची यादी दिल्याचे अपीलकर्त्यांचे म्हणणे असून त्याबाबत त्यांचा लेखी खुलासा जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यानी ३ दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.३०.१२.२०१० च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, स्थावर विभाग, पुणे

विद्यापीठ, पुणे श्री.आर.व्ही.पाटील यांच्या लेखी खुलाशासह अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे श्रीमती अरूणा वि.चव्हाण यानी सादर केला. कागदपत्र तपासणीनंतर हव्या असलेल्या प्रतींची यादी अपीलकर्त्यांनी सादर केली नसल्याचे श्री.आर.व्ही.पाटील यानी या खुलाशात म्हटले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबासाहेब सांब मुडके
२३९५, आडवा रस्ता, बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४९/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**विद्यमान अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
बार्शी, जि. सोलापूर श्री. व्ही. एन. भुजबळ

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा श्री. एस. व्ही. तळेकर

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. आर.जी.पवार

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा श्री. एस. व्ही. तळेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बाबासाहेब सांब मुडके यानी उपविभागीय, कृषि अधिकारी, कुर्डवाडी यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला होता. दि. १७.१.२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती तालुका कृषि अधिकारी, बार्शी, जिल्हा सोलापूर यांच्या कक्षेतील असल्यामुळे अर्ज आपल्याकडे वर्ग झाल्यानंतर दि. १३.२.२००९ रोजी माहिती तयार असल्याचे कळविले. 'मागणी केलेली माहिती मला वेळेत मिळाली असून आता माझी काहीही तक्रार नाही', असे अपीलकर्त्यांनी त्याच दिवशी लेखी दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. आर.जी.पवार व अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बार्शी, जि. सोलापूर श्री. व्ही. एन. भुजबळ यानी अपीलकर्त्यांच्या संदर्भित पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अंकुश सीताराम गायकवाड
३२३/७ उमा गृहनिर्माण संस्था, जुनी मिल कंपाऊंड, अपीलकर्ता
मुरारजी पेठ, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९७/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४/७/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अंकुश सीताराम गायकवाड
३२३/७ उमा गृहनिर्माण संस्था, जुनी मिल कंपाऊंड,
मुरारजी पेठ, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
सोलापूर सौ. विजया रो. मस्के

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

वैद्यकीय अभिलेखा ग्रंथपाल पदी आपल्याला पदोन्नती न देण्याच्या अनुषंगाने मागितलेली कोणतीही योग्य माहिति मिळाली नाही. देऊ केलेली माहिति गैरलागू व दिशाभूल करणारी होती. त्याबद्दल संबधितांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. अंकुश सीताराम गायकवाड यानी केली.

श्री.गायकवाड यांच्या दि. १७.१०.२००७ च्या अर्जाला दि. १३.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देऊन शुल्क कळविले. त्यानी शुल्क न भरल्यामुळे दि. १३.१२.२००७ रोजी स्मरणपत्र पाठविले. परंतु देण्यात येणारी माहिति आपण पाहिली असून ती गैरलागू व दिशाभूल करणारी असल्यामुळे घेण्यात स्वारस्य नाही, असे पत्र त्यानी दि. २४.१२.२००७ रोजी दिले. वैद्यकीय सेवा प्रवेश नियमावलीची प्रतही देऊ केली असता त्यानी घेतली नाही. पदोन्नतीच्या मागणीबाबतचा त्यांचा दावा मुंबई उच्च न्यायालयाने सन २००५ मध्ये फेटाळला आहे, असे प्रतिपादन जन माहिति अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर सौ. विजया रो. मस्के यानी श्री. गायकवाड याना देऊ केलेल्या माहितीच्या व पत्रव्यवहाराच्या प्रतींसह केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे. वैद्यकीय सेवा प्रवेश नियमावलीची प्रत अपीलकर्त्यास अद्यापही हवी असल्यास जन माहिति अधिकारी यानी निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिति आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुहास शंकर सावंत
डी-१०१, शिल्पा को.हौसिंग सोसायटी, एम.आय.टी.(इंजिनिअर),
कॉलेजजवळ, पौड रोड, कोथरूड, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (प्रशासन), आयुक्त,
दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य,
अब्दुल गफारखान मार्ग प्रशासकीय इमारत, वरळी सीफेस, मुंबई-१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (प्रशासन), कार्यालसन २०अ,
आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य,
अब्दुल गफारखान मार्ग प्रशासकीय इमारत, वरळी सीफेस, मुंबई-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.७.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुहास शंकर सावंत
डी-१०१, शिल्पा को.हौसिंग सोसायटी, एम.आय.टी.(इंजिनिअर),
कॉलेजजवळ, पौड रोड, कोथरूड, पुणे-३८

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (प्रशासन), कार्यासन २०अ, आयुक्त,
दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफारखान मार्ग
प्रशासकीय इमारत, वरळी सीफेस, मुंबई श्री.कुंडलिक भुजंगराव चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्रादेशिक दुग्धविकास कार्यालयाला मुख्यालय बदलीचे अधिकार आहेत काय, याचे उत्तर व त्या अनुषंगाने केलेल्या बदल्या याबाबतची खरी माहिती दुग्धविकास विभागाकडून-विशेषतः प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास कार्यालय, नाशिक यांच्याकडून दिली जात नाही. प्रादेशिक कार्यालयास मुख्यालय बदलीचे अधिकार नाहीत. मुख्यालय बदल करू नये, असे दुग्धविकास आयुक्त कार्यालयाचे आदेश आहेत. तरीही अनेक बदल्या अधिकार कक्षेबाहेर जाऊन केल्या आहेत. त्यात आर्थिक व्यवहार व भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर झाला आहे. तो उघड होऊ नये म्हणून माहिती दिली जात नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सुहास शंकर सावंत यानी केले.

उपलब्ध माहिती अपीलकर्त्यास वेळोवेळी देण्यात आली. श्री.सावंत यानी मागितलेली माहिती प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे व नाशिक व कार्यासन २० यांच्याशी संबंधित असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे विहित मुदतीत वर्ग करून माहिती देण्यास कळविले. त्या विभागांनीही माहिती दिल्याचे कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (प्रशासन), कार्यासन २०अ, आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफारखान मार्ग प्रशासकीय इमारत, वरळी सीफेस, मुंबई श्री.कुंडलिक भुजंगराव चव्हाण यानी केले.

नाशिक विभागाने माहिती दिल्याबाबत आठ दिवसांत खुलासा आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. दि.८.४.२०१० च्या पत्रान्वये श्री.सावंत याना माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्र.वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, प्रादेशिक दुग्धवयवसाय विकास कार्यालय, नाशिक श्री.जी.आर.गायकवाड यानी आयोगास अवगत केले. 'कर्मचाऱ्यांच्या मुख्यालयात बदल केलेले नसून कामकाजाच्या सोयीसाठी कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरूपात दुसऱ्या कार्यालयामध्ये काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्या कर्मचाऱ्यांचे वेतन ते ज्या आस्थापनेवर कार्यरत आहेत त्या आस्थापनेवरच काढण्यात येत आहे,'असे जन माहिती अधिकारी तथा प्र.वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, प्रादेशिक दुग्धवयवसाय विकास कार्यालय, नाशिक श्री.जी.आर.गायकवाड यांच्या दि.२४.११.२०१० च्या पत्रात म्हटले आहे. हा माहिती दडविण्याचा प्रकार आहे. याबाबत चौकशी व्हावी, अशी मागणी श्री.सावंत यानी दि.१.१२.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली आहे. त्यानी नोंदविलेले बदल्याविषयींचे आक्षेप, भ्रष्टाचार व बेकायदेशीर कार्यवाहीविषयीचे आरोप

आणि चौकशीची मागणी या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत. मात्र वस्तुस्थिती स्पष्ट होण्याच्या दृष्टीने, बदल्या केल्या की नाही, याचे नेमके उत्तर व बदल्या झाल्या असल्यास संबंधितांच्या नावांसह तद्‌विषयक आदेशाच्या प्रती अपीलकर्त्यास देणे पारदर्शकतेच्या दृष्टीने गरजेचे आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास कार्यालय, नाशिक येथील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबतची नेमकी माहिती (बदल्या झाल्या असल्यास संबंधितांची नावे, तारखा, बदलीच्या आदेशाच्या प्रती यासह) अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन), आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफारखान मार्ग प्रशासकीय इमारत, वरळी सीफेस, मुंबई यानी संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरवावी व अनुपालन अहवाल दि.२०.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.माधव श्रीधर दामले
प्लॉट क्र.७८, सर्व्हे क्र.८१, प्रज्ञानंद सोसायटी, शीतल हॉटेलसमोर,
वडगाव-मावळ, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९५४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१३.७.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माधव श्रीधर दामले
प्लॉट क्र.७८, सर्व्हे क्र.८१, प्रज्ञानंद सोसायटी, शीतल हॉटेलसमोर,
वडगाव-मावळ, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे श्री.सचिन बारवकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे तत्कालीन श्री.चंद्रकांत जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

नैसर्गिक आपत्तीबाबत दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारभूत कागदपत्रांची व पर्जन्यमानाची नोंद याच्या प्रती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे यांच्याकडून मिळाल्या नाहीत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.माधव श्रीधर दामले यानी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.किशोर घाडगे यांची बदली, अन्य अधिकाऱ्याकडे अतिरिक्त कार्यभार यामुळे उत्तर दिले गेले नाही व दहा दिवसांत माहिती देण्याचे आदेश प्रथम अपिलात देऊनही कार्यवाही झाली नाही. त्याच काळात लोकसभा निवडणुकीच्या कामकाजाचे पर्यवेक्षणाचे कामही संबंधित अधिकाऱ्यांकडे होते. या सर्व कामाच्या व्यापामुळेच विलंब झाला, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.चंद्रकांत जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.सचिन बारवकर यानी केले. त्याबाबतचे तपशीलवार निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.चंद्रकांत जाधव यानी सादर केले.

जन माहिती अधिकाऱ्यांचा कार्यकाल व माहिती देण्याबाबतची कार्यवाही याबाबतचा तपशीलवार अहवाल सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि असा अहवाल स्मरणपत्रानंतर सादर केल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे अनुक्रमे श्री.किशोर घाडगे व श्री.चंद्रकांत जाधव यांना समज देण्यात येत आहे. या अहवालात नमूद केलेली परिस्थिती लक्षात घेऊनही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे

श्री.चंद्रकांत जाधव यानी तसे अपीलकर्त्यास किमान कळविणे आवश्यक होते, याची जाणीव त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल दत्तात्रय मते
बी-२७, कैलास कुटी, २२, औंध रोड, पुणे-२० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे-७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.७.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे डॉ.मा.ल.जाधव<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्रीमती ए.व्ही.चव्हाण | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे विद्यापीठाच्या सन १९४९ पासून आजपर्यंतच्या जाहीर झालेल्या परीक्षा निकालांच्या संदर्भातील स्कॅनिंगचे कंत्राट देण्याविषयीच्या टिपण्यांची प्रत नियमबाह्य पध्दतीने नाकारली. या कामावर सुमारे एक

कोटी रूपये खर्च झाला असून हा सार्वजनिक निधी असल्यामुळे त्याबाबतची माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. खरेदी समितीने घेतलेल्या निर्णयांबाबतचा तपशीलही समाधानकारकरीत्या मिळाला पाहिजे. ही देयके व कार्यादेश हा विश्वासाश्रित संबंधाचा भाग असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांचे उत्तर चुकीचे आहे, असे अपीलकर्ता श्री.सुनिल दत्तात्रय मते यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात म्हटले आहे.

श्री.मते यानी विस्तृत स्वरूपाची माहिती दि.५.१२.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. विविध विभागांकडून ती प्राप्त करून घेऊन दि.४.१.२०१० रोजी उत्तर दिले. टिपण्या व शेरे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१)(इ) नुसार (विश्वासाश्रित संबंधामुळे) देता येत नसल्याचे कळविले. अन्य मुद्दयांची उत्तरे व माहिती दिली. अभिलेखांचे अवलोकन करण्याबाबत त्याना कळविले होते. त्यानुसार त्यानी अवलोकनही केले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्रीमती ए.व्ही.चव्हाण यानी केले.

सन १९४९ पासून सन २००७ पर्यंत झालेल्या परीक्षा निकालाचे स्कॅनिंग करण्याचा निर्णय प्रतिपृष्ठ रू.१.३५ दराने करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. नियमांच्या आधीन राहून त्यासाठी निविदा काढलेल्या नाहीत. परीक्षाविषयक माहिती संवेदनशील असून विपर्यस्त स्वरूपात ती मांडली गेल्यास विद्यापीठाच्या दृष्टीने हितावह नाही. तसे होण्याचे अनुभव आलेले आहेत. मात्र कोणतीही माहिती दडविण्याचा उद्देश असता, तर अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून दिले गेले नसते, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे डॉ.मा.ल.जाधव यानी केले.

परीक्षाविषयक माहितीची संवेदनशीलता व त्याचा यथार्थ परिप्रेक्ष्यातील वापर हा अपिलीय प्राधिकारी यांचा मुद्दा रास्त आहे. मागितलेल्या माहितीचा वापर करताना त्याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी अपीलकर्त्यांनी / नागरिकांनी घेणे अपेक्षित व आवश्यक आहे. तथापि स्कॅनिंगच्या कंत्राटाबाबतच्या निर्णयाविषयीच्या टिपण्या व शेरे ही माहिती विश्वासाश्रित संबंधाची नाही, तर प्रशासकीय व्यावहारिक निर्णयप्रक्रियेचा तो एक भाग असून त्याबाबत पारदर्शकता असणे आवश्यक आहे. अशा टिपणीच्या प्रती नाकारता येणार नाहीत, असे केंद्र सरकारच्या दि.२३ जून २००९ च्या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले असून महाराष्ट्र शासनाने दि.२६.१०.२००९ व दि.९.११.२००९च्या परिपत्रकान्वये सर्व विभागांना तसे स्पष्टपणे कळविले आहे. हे लक्षात घेता टिपण्या व शेरे यांच्या प्रती नाकारण्याचा जन

माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांचा निर्णय योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अभिलेखाच्या अवलोकनानंतर अपीलकर्त्यांनी विद्यापीठाच्या परीक्षा निकालविषयक स्कॅनिंगच्या कंत्राटासंबंधीच्या नस्त्यांमधील टिपण्या व शेरे यांची लेखी मागणी केल्यास त्याच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यानी निःशुल्क पुरवाव्यात.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

मेजर जनरल एस.सी.एन.जटार
अ-१०२, नील सदन, १४२६, सदाशिव पेठ, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (ज),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग प्रमुख, अतिरिक्त महापालिका
आयुक्त कार्यालय (वि), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | तक्रार क्रमांक | ६५/ २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** मेजर जनरल एस.सी.एन.जटार
अ-१०२, नील सदन, १४२६, सदाशिव पेठ, पुणे-३०

**जन माहिती अधिकारी** तथा विभाग प्रमुख, अतिरिक्त महापालिका आयुक्त कार्यालय (वि), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.संजीव हरिश्चंद्र मोरे
श्री.वि.बा.कुलकणी, अधीक्षक अभियंता, स्वारगेट विभाग
श्री.न.अ.जगताप, कार्यकारी अभियंता, स्वारगेट विभाग
श्री.वाय.जी.देशमुख, कार्यकारी अभियंता
श्री.न.श्री.साळुंके, कार्यकारी अभियंता

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

पाणीपुरवठा वितरण प्रकल्प व जलोत्सारण याच्या व्यवस्थेच्या पुनर्रचनेबाबत 'नागरिक चेतना मंच'च्या वतीने आपण महानगरपालिका आयुक्ताना निवेदन दिले होते. पुनर्रचनेच्या अनुषंगाने त्यात अनेक सूचना केल्या होत्या. त्यावरील कार्यवाहीबाबत मागितलेली माहिती समाधानकारक मिळाली नाही. नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने या सूचनांची दखल घेऊन कार्यवाही होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन तक्रारकर्ता मेजर जनरल एस.सी.एन.जटार यानी केले.

मेजर जनरल जटार यांच्या दि.९.२.२०१० च्या अर्जाला दि.१६.२.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. महानगरपालिका आयुक्तानी कार्यवाहीच्या संदर्भात दिलेल्या पत्राची प्रत त्याना दिली. तसेच अन्य संबंधित विभागांनाही कळविले. माहिती व प्रशासकीय कार्यवाहीविषयक सूचना असे श्री.जटार यांच्या पत्रव्यवहाराचे संमिश्र स्वरूप असल्यामुळे मुद्देसूद उत्तर देण्यास विलंब लागला. त्यांच्या मागणीचा विचार करून निर्णय घेण्यास नगर अभियंता, उपायुक्त (सर्वसाधारण) इत्यादींची समिती तयार करून एक ते दिड महिन्यात निर्णय घेण्यात येईल. याबाबत मेजर जनरल जटार यांच्याशी चर्चा झाली असून एकमत झाले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, अतिरिक्त महापालिका आयुक्त कार्यालय (वि), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.संजीव हरिश्चंद्र मोरे यानी केले. मेजर जनरल जटार यानी त्याला दुजोरा दिला.

नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने माहितीच्या पलीकडे जाऊन कार्यवाहीविषयक निर्णय घेण्याबाबत उभय बाजूंमध्ये एकमत झाले, ही बाब स्वागतार्ह आहे. उभय बाजूंनी संयुक्तरीत्या पुढीलप्रमाणे निवेदन आयोगाला सादर केले :

विषयांकित तक्रारीबाबत सुनावणीपूर्वी व सुनावणीदरम्यान अपीलदार व प्रतिवादी (माहिती अधिकारी व तांत्रिक अधिकारी) यांच्यामध्ये नागरिकांचे हित लक्षात घेऊन खाली नमूद केल्याप्रमाणे शिफारस करीत आहोत :

कामकाज व्यवस्थेबाबत विचार करण्यासाठी खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची तज्ज्ञ समितीची नेमणूक करून महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांजकडे सादर करण्यात येईल. समितीमध्ये खालीलप्रमाणे अधिकारी असतील:

| | | |
|---|---|---|
| (१) | श्री.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता,<br>पुणे महानगरपालिका | अध्यक्ष |
| (२) | अतिरिक्त नगर अभियंता, पाणीपुरवठा व जलोत्सारण | सदस्य |
| (३) | अधीक्षक अभियंता, स्वारगेट विभाग | सदस्य |
| (४) | अधीक्षक अभियंता, एस.एन.डी.टी. विभाग | सदस्य |
| (५) | अधीक्षक अभियंता, लष्कर विभाग | सदस्य |
| (६) | श्री.के.सी.कारकर, उपआयुक्त (ज),<br>पुणे महानगरपालिका | सदस्य |

वरील समितीमध्ये मेजर जन.एस.सी.एन.जटार हे निमंत्रित म्हणून सहभाग घेतील. वरील समितीचा अहवाल दि.१.३.२०११ पर्यंत महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे सादर करण्यात येईल.

हे निवेदन लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(२) निवेदनात नमूद केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उभय बाजूंनी एकत्रितपणे दि.१५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.छाया रामभाऊ गायकवाड
होळ, ता.फलटण, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण,
तहसील कार्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण,
तहसील कार्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०५ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.छाया रामभाऊ गायकवाड
होळ, ता.फलटण, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण,
तहसील कार्यालय, फलटण, जि.सातारा श्री.गजानन बाळासाहेब गुरव

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, तहसील कार्यालय, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा विद्यमान श्री.महादेव भोईटे, तत्कालीन-संभाजी हेरवाडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

वाटप पत्रावर सन १९९८ मध्ये तहसीलदार कार्यालयात सह्या झाल्या. तथापि त्या संदर्भातील कागदपत्रांच्या मूळ प्रती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, तहसील कार्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण, तहसील कार्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांच्याकडून मिळाल्या नाहीत. अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती छाया रामभाऊ गायकवाड यानी केली.

श्रीमती गायकवाड यांच्या मागणीनुसार कागदपत्रांचा कसून शोध घेऊनही ती उपलब्ध झाली नाहीत. संबंधित वाटप पत्र हे घरगुती स्वरुपाचे असून प्रतिज्ञापत्र केले आहे. त्याच्या छायाप्रती आहेत. या कागदपत्राच्या जतनाची मुदत १ वर्षाची आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, तहसील कार्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा अनुक्रमे श्री.महादेव भोईट व श्री.संभाजी हेरवाडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण, तहसील कार्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.गजानन बाळासाहेब गुरव यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनिल भिमराव भोसले
सावतामाळी मंदिर परिसर, मानस इमारतीजवळ, अंबिकानगर, इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, उत्कर्ष विद्या मंदिर,
कालठण नं.१, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनिल भिमराव भोसले
सावतामाळी मंदिर परिसर, मानस इमारतीजवळ, अंबिकानगर, इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या र. शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, उत्कर्ष विद्या मंदिर, कालठण नं.१,
ता.इंदापूर, जि.पुणे श्री.प्रकाश रामभाऊ ठाकूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९९४ ते २००८ या काळातील शिक्षक मान्यतेच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती अपुरी दिली. या काळात आपण सेवा केल्याचा पुरावा म्हणून ही माहिती मिळणे आवश्यक आहे. ती संस्थेकडे असल्याचे सांगून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उत्कर्ष विद्या मंदिर, कालठण नं.१, ता.इंदापूर, जि.पुणे नाकारत आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अनिल भिमराव भोसले यानी केले.

शाळेकडील उपलब्ध माहिती श्री.भोसले याना दिली आहे. संस्थेच्या सचिवांमार्फत मान्यतेचे प्रस्ताव पाठविले जात असल्यामुळे त्याबाबतचे अभिलेख संस्थेकडून मिळाल्याशिवाय देता येणार नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उत्कर्ष विद्या मंदिर, कालठण नं.१, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.प्रकाश रामभाऊ ठाकूर यानी केले. संबंधित प्रस्तावाची पोहच संस्थेकडे असते, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या र. शिंदे यानी नमूद केले.

संस्थेकडून मान्यता प्रस्तावांच्या प्रती प्राप्त करुन अपीलकर्त्यास देण्याचे मौखिक आदेश आयोगाने जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उत्कर्ष विद्या मंदिर, कालठण नं.१, ता.इंदापूर, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे याना दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे चिटणीस, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, इंदापूर, जि.पुणे श्री.जी.व्ही.शाह यानी दि.३१.१२.२०१०/४..१.२०११ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे याना कळवून संबंधित प्रतींसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जनार्दन सोपान पवार
मु.चिखलगोठण, ता.तासगाव, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
तासगांव विभाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०२ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जनार्दन सोपान पवार
मु.चिखलगोठण, ता.तासगाव, जि.सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
तासगांव विभाग, सांगली श्री.संग्रामसिंह निशाणदार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आपल्या अपरोक्ष गुन्हा दाखल करून संसारोपयोगी साहित्य पोलिसांनी कायद्याच्या कोणत्या कलमान्वये जप्त केले, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, तासगांव

विभाग, सांगली यानी दिली नाही. या कारवाईत आपल्या मौल्यवान वस्तू गायब झाल्या. त्याबाबत आपण व आपल्या पत्नीने केलेल्या तक्रारीची दखल पोलिसांनी घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.जनार्दन सोपान पवार यानी केली.

अपीलकर्त्यांचा भाऊ फिर्यादी असून अपीलकर्ता आरोपी आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती ते आपल्या कार्यालयाकडून मागत असून ती देणे शक्य नाही. आपल्या कक्षेतील माहिती दिली आहे. कायद्यातील कलमांचा अन्वयार्थ माहितीच्या अधिकारात देता येणार नाही. तो त्यानी स्वतः प्राप्त करून घ्यावा, असे स्प्ष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, तासगांव विभाग, सांगली श्री.संग्रामसिंह निशाणदार यानी केले.

अपीलकर्त्यांच्या तक्रारअर्जावर केलेली कार्यवाही व संसारोपयोगी साहित्य जप्त करण्याबाबतच्या नेमक्या कलमाची माहिती अपीलकर्त्यास दहा दिवसांत निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.३.११.२०१० च्या पत्रान्वये पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, तासगांव विभाग, सांगली यानी दि.२७.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. अतुल गोविंद बागुल
बी-१५, मकरंद पार्क, सिंहगड रोड, अपीलकर्ता
वडगांव बुद्रुक, पुणे - ४११ ०५१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड,
पुणे - ४११ ००७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** ,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड,
पुणे - ४११ ००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/७/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे डॉ. मा. ल. जाधव

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्री. ए. व्ही. चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

पुणे विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रातील (पी.आय.ओ./एन.आर.आय.) प्रवेशाबाबतच्या चौकशीसाठी विद्यापीठाने न्या. जे.ए.पाटील याची समिती नेमली होती. त्या समितीच्या अहवालाची प्रत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) (एच) नुसार नाकारल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. गुन्हेगारांचा तपास अथवा त्यांच्यावरील कारवाई या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल, अशी माहिती नाकारण्याची तरतूद या कलमात आहे. अहवालाची प्रत उपलब्ध करुन दिल्याने असा अडथळा कसा येईल हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी सिध्द केलेले नाही. अहवाल प्राप्त होऊन वर्ष झाल्यानंतरही तो जाहीर करण्यास नकार देणे कारभारातील पारदर्शकतेच्या दृष्टीने योग्य नाही. या केंद्राच्या आर्थिक बाबींची चौकशी करण्यासाठी मुंबईच्या एका लेखापाल संस्थेची नियुक्ती विद्यापीठाने एप्रिल २००८ मध्ये केली होती. काही काम केल्यानंतर पुढील काम करण्यास या संस्थेने असमर्थता दर्शविल्यानंतर हे काम ठप्प आहे . तसेच न्या. पाटील समितीच्या चौकशी अहवालाची प्रत दिल्याने या आर्थिक बाबींच्या चौकशीवर परिणाम होण्याचा संबंध नाही. म्हणून अहवालाची प्रत मिळाली पाहिजे, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता डॉ. अतुल गोविंद बागुल यानी केले आहे.

न्या. पाटील समितीचा अहवाल प्राप्त झाला असला तरी चौकशीचे कामकाज पूर्ण झालेले नाही. आर्थिक बाबींची चौकशी या चौकशीशी संबंधित असून ती पूर्ण व्हावयाची आहे. ती पूर्ण करण्यासाठी नव्याने विचारणा केलेल्यातील एका लेखापालाने होकार दिला असून त्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरु आहे. ती नियुक्ती झाल्यानंतर पुढील चौकशीचे कामकाज सुरु होईल. त्यामुळे अपीलकर्त्यांनी मागितलेला दस्तऐवज सध्या देता येणार नाही, असे तोंडी व लेखी प्रतिपादन जन माहिती अधिकारी पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्री. ए. व्ही. चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे डॉ. मा. ल. जाधव यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. तथापि न्या. पाटील समितीचा अहवाल व प्रवेशातील आर्थिक बाबींविषयीची चौकशी या दोन बाबी परस्परसंबंधित असल्या तरी चौकशी करणा-या दोन स्वतंत्र समित्या आहेत. तसेच एका समितीच्या अहवालावर दुस-या समितीचा अहवाल अवलंबून असल्याचे दिसत नाही व न्या. पाटील समितीचा अहवाल नागरिकांना उपलब्ध करुन देण्याने संभाव्य कारवाईवर

कशा प्रकारे परिणाम होईल, हे जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्री. ए. व्ही. चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे डॉ. मा. ल. जाधव यांच्या निवेदनांतून सिध्द होत नाही. आर्थिक बाबींविषयीची चौकशी समितीची प्रक्रियाही अद्याप पूर्ण झालेली नाही. या स्थितीत त्या पूर्ततेसाठी न्या. पाटील समितीचा अहवाल नागरिकांपासून गोपनीय ठेवणे समर्थनीय नाही.

न्या. पाटील समितीसमोर साक्ष देऊ नये यासाठी आपल्यावर दबाव आल्याचे अपीलकर्त्यांचे निवेदन व तद्नुषंगिक मुद्दे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२.पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रातील प्रवेशाबाबतच्या (पी.आय.ओ./ एन.आर.आय.) चौकशीसाठी विद्यापीठाने नेमलेल्या न्या.जे. ए. पाटील समितीच्या अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्री. ए. व्ही. चव्हाण यानी अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावी व अनुपालन अहवाल दि. २०.२.२०११ पर्यंत आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रविंद्र भानुदास जाधव
मु. पो. पांडे, ता. वाई, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
यशवंत शिक्षण संस्था, वीरबाग, सुरुर,
ता. वाई, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
यशवंत शिक्षण संस्था, वीरबाग, सुरुर,
ता. वाई, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०४/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रविंद्र भानुदास जाधव
मु. पो. पांडे, ता. वाई, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
यशवंत शिक्षण संस्था, वीरबाग, सुरुर,
ता. वाई, जि. सातारा यांचे प्रतिनिधी श्री.महेश बळवंत चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

यशवंत शिक्षण संस्था, वीरबाग, सुरुर, ता. वाई, जि. सातारा या शाळेच्या भाडेपट्टा कराराची प्रत व इमारतीचा ग्रामपंचायत नमुना नं. ८ चा सन १९८६ चा उतारा दिला जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रविंद्र भानुदास जाधव यानी केली.

माहिती संस्थेच्या कक्षेतील असून ती देण्याबाबत संस्थेला वेळोवेळी कळविले आहे व माहिती देण्यात आली असल्याचे संस्थेचे म्हणणे आहे. श्री. जाधव यांच्या मूळ अर्जात सन १९८६ चा उल्लेख नाही. त्यामुळे तो उतारा दिलेला नाही. अन्य माहिती दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, यशवंत शिक्षण संस्था, वीरबाग, सुरुर, ता. वाई, जि. सातारा यांचे प्रतिनिधी श्री.महेश बळवंत चव्हाण यानी केले.

अपीलकर्त्यांना हवा असलेला सन १९८६ चा इमारतीचा ग्रामपंचायत नमुना नं. ८ चा उतारा द्यावा. मूळ अर्जाव्यतिरिक्त माहितीची मागणी अपिलात व अन्य पत्राद्वारे अपीलकर्त्यांनी केली असून त्याची दखल घेतली जाणार नाही, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

श्री. जाधव याना वेळोवेळी रजिस्टर्ड टपालाने माहिती देण्यात आली असून नमुना नं. ८ चा उतारा ग्रामपंचायतीकडून घेणे शक्य असूनही न घेता संस्थेला त्रास देण्यासाठी संस्थेकडून मागणी केली आहे, तरीही सन १९८६ च्या उता-याची प्रत पुन्हा पाठविली, असा अहवाल संस्थेचे चिटणीस ॲड. अरविंद चव्हाण यानी दि. ७.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश विष्णु घाडगे
मु. पो. भुईज, ता. वाई, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभाग, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभाग, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८५/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभाग, सातारा श्री. अनिल दिनकर कुलकर्णी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम पश्चिम विभाग, सातारा श्री.प्रताप दत्तात्रय कदम | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. प्रकाश विष्णु घाडगे यानी दि. १७.१२.२००९ च्या अर्जान्वये २५,०४२ पृष्ठे होतील एवढी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. अभिलेख अवलोकन करुन आवश्यक असलेल्या

प्रती घ्याव्यात, असे त्याना दि. ३१.१२.२००९ च्या पत्रान्वये कळवूनही ते आले नाहीत. आपण दारिद्रय रेषेखाली असल्याचे त्यानी नमूद केले असले तरी तसा पुरावा सोबत जोडलेला नव्हता. तसेच माहितीचा अधिकार अधिनियिम, २००५ मधील तरतुदीनुसार दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना माहिती निःशुल्क द्यावयाची असून एवढा निधी वर्ग करता येणार नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम पश्‍चिम विभाग, सातारा श्री. प्रताप दत्तात्रय कदम व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम पश्‍चिम विभाग, सातारा श्री. अनिल दिनकर कुलकर्णी यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अजित गणपतराव पवार
रा. पिरवाडी, पो. कृष्णानगर — अपीलकर्ता
ता. जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
खेड, ता. जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७०/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अजित गणपतराव पवार
रा. पिरवाडी, पो. कृष्णानगर, ता. जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, जि. सातारा श्री. चंद्रकांत निवृत्ती गार्डे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
खेड, ता. जि. सातारा श्री. गोविंद भगवान माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

<u>**विवेचन**</u>

ग्रामपंचायतीच्या एका वसुली लिपिकाने केलेल्या भ्रष्टाचाराबाबत माहिती मागितली असता दोन लिपिकांनी केलेल्या वसुलीच्या पावत्या दिल्या. गरज नसलेली अतिरिक्त माहिती देऊन विनाकारण जादा शुल्क आकारले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अजित गणपतराव पवार यानी केली.

श्री. पवार यांच्या दि. २३.१२.२००९ च्या अर्जाला दि. १३.१.२०१० रोजी उत्तर पाठविले. दि. ९.२.२०१० रोजी त्यानी शुल्क भरल्यानंतर माहिती दिली. ग्रामपंचायत कर्मचा-यांनी एकाच पावती पुस्तकातील पावत्या केल्या होत्या. त्यामुळे त्याच्या प्रती दिल्या. दोन कर्मचा-यांनी केलेल्या पावत्यांची स्वतंत्र विभागणी नंतर करण्यात आली. कोणतीही माहिती लपविलेली नाही. गेल्या दिड वर्षात श्री. पवार यानी असे १५ अर्ज केले असून सर्व कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध असताना केवळ आपल्याला त्रास देण्याच्या उद्देशाने असे अर्ज केले जात आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, खेड, ता. जि. सातारा श्री. गोविंद भगवान माने यानी केले. श्री. पवार यांच्या मागणीनुसार जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली असून अतिरिक्त माहिती न देण्याबाबत प्रथम अपिलाच्या निर्णयात त्याना सूचना देण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती सातारा, जि. सातारा श्री. चंद्रकांत निवृत्ती गार्डे यानी नमूद केले.

अपीलकर्ता यानी रु. २९४ शुल्क भरले असून त्यात नको असलेल्या ४६ प्रती असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या माहितीची रु. २/- प्रतिपृष्ठ प्रमाणे होणारी शुल्काची रु. ९२/- ही रक्कम जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, खेड, ता. जि. सातारा श्री. गोविंद भगवान माने यानी अपीलकर्त्यास परत करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सिकंदर सहदेव बेलोसे
मु. रुईधर पो. भिलार, ता. जावली, अपीलकर्ता
जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६२/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सिकंदर सहदेव बेलोसे
मु. रुईधर पो. भिलार, ता. जावली, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सातारा श्री. राजेंद्र हणमंत बाबर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सातारा श्री. एम. के. गोंधळी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आपल्याला मुख्याध्यापक पदी रुजू करुन घेण्याचे आदेश शाळा न्यायाधिकरणाने दिले. उच्च न्यायालयाने त्याला स्थगिती दिलेली नाही. तरीही शाळा न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार आधीच्या मुख्याध्यापकांची मान्यता रद्द होऊन आपली नियुक्ती केली जाणे आवश्यक आहे. ती का केली जात नाही, याचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून मिळालेले नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सिकंदर सहदेव बेलोसे यानी केले.

श्री. बेलोसे याना हजर करुन घेण्याची कार्यवाही शिक्षण संस्थेने करावयाची असून शैक्षणिक सेवा केंद्र, हातगेघर, ता. जावली, जि. सातारा या संस्थेला तसे कळवून श्री. बेलोसे याना त्याची प्रत दिली .त्यानुसार कार्यवाही न केल्यामुळे संस्थेचे अनुदान बंद करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून संस्थेला कारणे दाखवा नोटीस दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सातारा श्री. एम. के. गोंधळी व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा श्री. राजेंद्र हणमंत बाबर यानी केले.

अपीलकर्त्याची तक्रार व स्पष्टीकरणाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि : ४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनिल विश्राम रेवणकर
गुरुप्रसाद फलॅट नं. ३४, रामनगर कॉलनी, अपीलकर्ता
पुणे ┯ ४११ ०२१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी सल्लागार,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्र. विधी सल्लागार,
विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/७/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. अनिल विश्राम रेवणकर
गुरुप्रसाद फलॅट नं. ३४, रामनगर कॉलनी, पुणे - ४११ ०२१

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका मिळकतीच्या संदर्भात विधी कार्यालयाकडे पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने मागितलेली माहिती आढळ होत नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले. कायदाविषयक अभिप्राय मागितला असून माहिती देण्याचे तोंडी कबूल करुनही दिलेली नाही. विधी खात्याशी बाब संबंधित नसल्याचे सांगितले जाते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. अनिल विश्राम रेवणकर यानी केले.

श्री. रेवणकर यांच्या अर्जाला जन माहिती अधिकारी तथा प्र. विधी सल्लागार, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड. मंजुषा इधाटे यानी उत्तर दिले असून संबंधित संचिका बांधकाम नियंत्रण विभागाकडे अभिप्रायासह परत पाठविण्यात आली असल्याची माहिती तपशिलासह दिली आहे. कागदपत्रे आढळ होत नसल्याचे अथवा बाब विधी खात्याशी संबंधित नसल्याचे कोठेही म्हटलेले नाही.

कायदेशीर अभिप्राय देण्याची व दिलेला अभिप्राय तपासण्याची अपीलकर्त्यांची मागणी असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी तथा प्र. विधी सल्लागार, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड. मंजुषा इधाटे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र अधिनियमातील विहित मुदतींचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक असल्याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.ज.पां.वाघ
जयराज, फ्लॅट नं.२, **अपीलकर्ता**
प्लॉट नं.७२, रामबाग कॉलनी,
स.नं.१२१+१२२, पौड रोड,
कोथरुड, पुणे-४११ ०३८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता (बांधकाम/विकास योजना),**
नगर अभियंता विभाग, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगर अभियंता (बांधकाम/विकास योजना),**
नगर अभियंता विभाग, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९०/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि.९.२.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दि.६.३.२००९ व दि.१९.६.२००७ रोजी दिलेल्या पत्रावरील कार्यवाहीबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.ज.पां.वाघ यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९.२.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. ‘नगर उप अभियंता (बांधकाम/विकास योजना), नगर अभियंता विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडून उपलब्ध माहिती मला कळविण्यात

आली आहे. त्यामुळे सुनावणीची आवश्यकता नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.वाघ यानी दि.३.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ४ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रशांत प्रभाकर जाखलेकर
१४७, रेल्वे लाईन धननीळ को. ऑप. हौ. सोसायटी, अपीलकर्ता
जुन्या आरटीओ ऑफिसजवळ, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/७/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. प्रशांत प्रभाकर जाखलेकर<br>१४७, रेल्वे लाईन धननीळ को. ऑप. हौ. सोसायटी,<br>जुन्या आरटीओ ऑफिसजवळ, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. बी.एस. कटकदौंड<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. एस. डी. काटे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

श्री याज्ञवल्क्य नागरी सहकारी पतसंस्थेच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यानी चुकीची दिली. त्यांच्या कार्यालयाकडे माहिती नसल्यास ५ दिवसात अर्ज संबंधितांकडे वर्ग करणे आवश्यक होते. अपिलीय प्राधिका-यांनी अपील मान्य करुनही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. प्रशांत प्रभाकर जाखलेकर यानी केली. याच विषयाबाबत अपील क्र. ८७३/ २०१०/सोलापूर आपण केले असल्याचे त्यानी नमूद केले.

श्री. जाखलेकर यांच्या दि. १४.९.२००९ च्या अर्जाला दि. ७.१०.२००९ रोजी उत्तर दिले. मार्च २०१० मध्ये संबंधित पतसंस्थेवर प्रशासक नेमण्यात आले असून या कार्यकालातील माहिती दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. एस. डी. काटे यानी केले. अपीलकर्त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ ते ३ ची चौकशी होऊन प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. बी.एस. कटकदौंड यानी नमूद केले.

अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास जन माहिती अधिकारी यानी अभिलेखांचे अवलोकन करु द्यावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची लेखी मागणीनुसार सशुल्क पुर्तता करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विश्वनाथ विष्णु गायकवाड
मु. पो. कांडगांव, ता. करवीर, अपीलकर्ता
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरपंच/ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कांडगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१०/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विश्वनाथ विष्णु गायकवाड
मु. पो. कांडगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, जि. कोल्हापूर श्री. ओमराज किसन गहाणे

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** श्री. व्ही. जी. भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा सरपंच/ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कांडगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर सौ. मनिषा तानाजी निकम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

ग्रामपंचायतीचा घरठाण उतारा देण्याची मागणी आपण केली होती. परंतु त्यानुसार उतारा दिला नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर तो दिला, असे प्रतिपादन अपिलाकर्ता श्री. विश्वनाथ विष्णु गायकवाड यानी केले.

अपीलकर्त्यांकडे घरभाडयाची थकबाकी होती. थकबाकी भरल्याशिवाय उतारा/दाखला देऊ नये, असा ग्रामपंचायतीचा ठराव असल्यामुळे त्यानुसार पूर्तता करण्यास श्री. गायकवाड याना तोंडी सांगितले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कांडगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर सौ. मनिषा तानाजी निकम यानी केले.

उतारा/दाखला देण्याची अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यानी लेखी उत्तर दिले पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी तथा सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कांडगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर सौ. मनिषा तानाजी निकम याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि : ४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.आ.बा.पाटील
कमला-५/बी, कृषी सहकारी गृहरचना संस्था, गोखलेनगर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस (महसूल शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.आ.बा.पाटील
कमला-५/बी, कृषी सहकारी गृहरचना संस्था, गोखलेनगर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे प्रतिनिधी श्री.उदय भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस (महसूल शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे प्रतिनिधी श्री.संजय शेटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

कृषी खात्यातील कर्मचा-यांसाठी घरे बांधण्याकरिता शासनाने दिलेल्या जमिनीवरील गृहनिर्माण संस्थेत शासकीय आदेश डावलून अन्य व्यक्तींना सभासदत्व देण्यात आल्याच्या संदर्भातील खोटी माहिती जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे यानी दिली व त्याबाबतच्या तक्रारीची अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे यानी दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ.आ.बा.पाटील यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती श्री.पाटील याना आधीच दिल्या असून संस्थेच्या अध्यक्षांकडून सभासदांची यादी प्राप्त करुन घेऊन तीही दिली आहे. कृषी विभागातील नसलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशील वेगळा दिला, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे श्री.उदय भोसले व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे श्री.अनिल पवार यानी लेखी निवेदनात नमूद केले. त्याचाच पुनरूच्चार जन माहिती अधिकारी तथा चिटणीस (महसूल शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.संजय शेटे यानी केला.

अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन करुन आणखी कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास प्राप्त करुन घेता येतील. नियमबाह्य सभासदत्वाबाबतची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ५ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रितेश किसन परदेशी
डेक्कन कॉलेज, कॅम्पस येरवडा, अपीलकर्ता
पुणे - ६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र. २, पुणे महानगरपालिका,पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग-२, पुणे महानगरपालिका,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/७/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रितेश किसन परदेशी
डेक्कन कॉलेज, कॅम्पस येरवडा, पुणे - ६

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय क्र. २, पुणे महानगरपालिका,पुणे श्री.भानुदास जी.माने

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग-२,
पुणे महानगरपालिका,पुणे श्री. गणपत काशिनाथ साळुंके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मौजे धानोरी येथील आपल्या मालकीच्या जागेतील २० भूखंडांची लांबी-रुंदी, त्यावरील बांधकाम आदि तपशिलासह माहिती विशिष्ट नमुन्यात मिळण्याची मागणी आपण केली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती मिळाली नाही. कनिष्ठ अभियंत्यांना भेटून माहिती घेण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. परंतु त्यांच्याकडेही ती माहिती मिळाली नाही. त्यानी संचिका अवलोकनासाठी देऊ केल्या. परंतु आपण मागितलेली माहिती संकलित करुन हव्या असलेल्या नमुन्यात जन माहिती अधिकारी यानी दिली पाहिजे, तशी ती न देणा-या अधिका-यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. रितेश किसन परदेशी यानी केली.

सन १९८९ मधील व्यवहाराच्या अनुषंगाने श्री. परदेशी माहिती मागत आहेत. सन १९९७ मध्ये धानोरी भाग महानगरपालिकेत समाविष्ट झाला. अपीलकर्त्यांनी नमूद केलेल्या नगर भूमापन क्रमांकाच्या संदर्भात अनेक संचिका आहेत. त्यातून निवडून संकलित करुन विशिष्ट नमुन्यात माहिती देणे शक्य नाही. तसेच भूखंडवार, मालकनिहाय तपशिलासह माहिती स्वतंत्रपणे उपलब्ध नाही. म्हणून संचिकांचे अवलोकन करण्याबाबत त्याना कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग-२, पुणे महानगरपालिका,पुणे श्री. गणपत काशिनाथ साळुंके व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र. २, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. भानुदास जी.माने यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित संचिकांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या माहितीच्या प्रती सशुल्क प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ५ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संदिप प्रभाकर इथापे
स्टाफ सातारा जिल्हा कारागृह, वर्ग-२,
सातारा शहर पोलीस ठाणेशेजारी, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, एस.आर.पी.एफ.,
परिक्षेत्र पुणे, ग्रुप-१, रामटेकडी, हडपसर, पुणे -२२ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,
एस.आर.पी.एफ., परिक्षेत्र पुणे, ग्रुप-१, रामटेकडी, हडपसर, पुणे -२२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८५६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.७.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संदिप प्रभाकर इथापे
स्टाफ सातारा जिल्हा कारागृह, वर्ग-२, सातारा शहर पोलीस ठाणेशेजारी, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, एस.आर.पी.एफ.,
परिक्षेत्र पुणे, ग्रुप-१, रामटेकडी, हडपसर, पुणे प्रतिनिधी श्री.संजय बॅनर्जी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,
एस.आर.पी.एफ., परिक्षेत्र पुणे, ग्रुप-१, रामटेकडी, हडपसर, पुणे श्री.अनिल वामन देशमुख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१५.७.२०१० रोजी घेण्यात आली.

तुरुंग रक्षक म्हणून प्रशिक्षण घेताना आपल्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. त्या अनुषंगाने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, एस.आर.पी.एफ., परिक्षेत्र पुणे, ग्रुप-१, रामटेकडी, हडपसर, पुणे यानी विहित मुदतीत दिली नाही. त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संदिप प्रभाकर इथापे यानी केली.

माहिती संकलित करण्याच्या सूचना संबंधित कर्मचा-यांना देण्यात आल्या होत्या. परंतु राज्य राखीव पोलिस बलाच्या प्रशिक्षणविषयक सन १९९९ पासूनची माहिती श्री. इथापे यानी मागितली होती. तिचे संवेदनशील स्वरुप लक्षात घेता आवश्यक त्या प्रशासकीय मान्यता घेणे गरजेचे होते. त्यामुळे विलंब झाला. त्यानंतर कळविलेले शुल्क श्री. इथापे यानी भरले नाही. व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी माहिती देऊ केली असता त्यानी ती घेतली नाही. प्राप्त झाली तसतशी माहिती श्री.इथापे याना रजिस्टर्ड टपालाने पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, एस.आर.पी.एफ., परिक्षेत्र पुणे, ग्रुप-१, रामटेकडी, हडपसर, पुणे श्री.अनिल वामन देशमुख यानी पूरक कागदपत्रांसह केले.

देऊ केलेली माहिती नाकारण्याची आपीलकर्त्याची कृती योग्य नाही. अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क द्यावी. तसेच श्री. इथापे यांच्या मूळ अर्जावरील कार्वाहीबाबतचा, विलंबविषयक, जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे खुलासे व त्यांच्यावरील कारवाई यासह अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, एस.आर.पी.एफ., परिक्षेत्र पुणे, ग्रुप-१, रामटेकडी, हडपसर, पुणे श्री.अनिल वामन देशमुख यानी दि.२२.७.२०१० च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. माहिती देण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची चौकशी पोलीस अधीक्षक, शस्त्र निरीक्षण शाखा यांच्याकरवी करण्यात आली. त्याचा तपशील संबंधितांच्या खुलाशासह अहवालात नमूद केला असून तत्कालीन वरिष्ठ श्रेणी लिपिक

सौ.एम.एम.काळे, व कार्यालयीन अधीक्षक श्रीमती पी.पी.शेलटकर यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कसुरीबद्दल कारवाई करण्याची शिफारस चौकशी अहवालात केल्याचे नमूद केले आहे. सौ.काळे यांच्याविरुध्द विभागीय चौकशी आदेशित करण्याबाबत कारवाई सुरु असल्याचेही अहवालात म्हटले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत झालेल्या विलंबाविषयी वरिष्ठ श्रेणी लिपिक सौ. एम.एम.काळे, व कार्यालयीन अधीक्षक श्रीमती पी.पी.शेलटकर यांच्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, एस.आर.पी.एफ., परिक्षेत्र पुणे, ग्रुप-१, रामटेकडी, हडपसर, पुणे यानी दि. २०.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ५ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नागय्या शिवलिंगय्या स्वामी
रविदर्शन, बी-४०२,पुणे सोलापूर रोड, हडपसर, पुणे-२८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक (आत्मा),
जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, सोलापूर

(२)**जन माहिती अधिकारी** तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, कुर्डुवाडी,
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.७.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नागय्या शिवलिंगय्या स्वामी
रविदर्शन, बी-४०२,पुणे सोलापूर रोड, हडपसर, पुणे-२८

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर
श्री.दशरथ लिंबाणप्पा तांभाळे

(१)**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक (आत्मा),
जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.वैभव तांबे

(२)**जन माहिती अधिकारी** तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी,
कुर्डूवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.जी.जी.लामतुरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

रु ९९४०/- चा अपहार केल्याचा दोषारोप आपल्यावर करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात आपला या अपहाराशी काहीही संबंध नसून त्याला जबाबदार असणाऱ्यांचा भ्रष्टाचार उघड होणे आवश्यक आहे. कागदपत्रावरुन ते स्पष्ट होते. सन २००१ पासून या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होण्यासाठी आपण प्रयत्न करीत असून हा गैरव्यवहार उघड होऊ नये म्हणून माहिती दिली जात नाही. माहिती अचूक व मुदतीत न दिल्याबद्दल संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.नागय्या शिवलिंगय्या स्वामी यानी केली.

श्री.स्वामी यांनी मागितलेली उपविभागीय कृषी अधिकारी, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर यांच्या कक्षेतील असल्यामुळे दि.४.११.२००८ चा हा अर्ज दि.१०.११.२००८ च्या पत्रान्वये त्यांच्याकडे वर्ग करण्यात आला. माहिती विहित मुदतीत देण्याच्या सूचना तेथील जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर याना दिल्या व त्याची प्रत श्री.स्वामी याना पुरविली. तथापि अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे माहिती शोधण्यास विलंब लागला. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक (आत्मा), जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.वैभव तांबे यानी केले. दि.१७.११.२००८ च्या पत्रान्वये माहिती देण्याबाबतच्या सूचना सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा लिपिक, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.जी.एन.होनमुटे याना दिल्या. परंतु श्री.स्वामी याना माहिती दिली गेली नाही, असे प्रतिपादन उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी येथील जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.जी.जी.लामतुरे यानी केले. त्या त्या वेळच्या जन माहिती अधिकाऱ्यांना वेळोवेळी कळवूनही व कारवाईची जाणीव देऊनही मुदतीत व पूर्ण माहिती दिली नाही. असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर श्री.दशरथ लिंबाणप्पा तांभाळे यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

श्री.स्वामी यानी अर्ज व अन्य पत्रव्यवहारात अनेक मुद्दयांवर भाष्य केले असून त्या अनुषंगाने खुलासा/स्पष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणाही केली आहे. अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही. तथापि मूळ विषयाच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती त्याना विहित मुदतीत दिली जाणे आवश्यक होते. त्यानुसार कार्यवाही झालेली नाही. संबंधित माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयातसुध्दा उपलब्ध असून आपल्याला बोलाविल्यास एक तासात माहिती काढून देऊ, असे श्री.स्वामी यानी दि.१३.१२.२००८ व दि.१२.७.२०१० च्या पत्रामध्ये म्हटले आहे. मूळ रकमेच्या संदर्भात श्री. होनमुटे यानी दिलेल्या खुलाशाची पडताळणी केली गेलेली नाही. लेखा परीक्षणातही त्याचा ऊहापोह झालेला नाही, अशी तक्रारही श्री.स्वामी यानी केली आहे. तथापि या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत. मात्र संपूर्ण माहिती दाखवून देण्यास अपीलकर्ता तयार असल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर यानी त्याना बोलावून माहितीची पूर्तता करणे अधिक योग्य ठरले असते. यानुसार कार्यवाही केलेली नाही, व माहितीही दिलेली नाही. या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर यानी माहिती देण्याबाबतच्या संपूर्ण कार्यवाहीचा अहवाल, विलंबास जबाबदार असणाऱ्या जन माहिती अधिकाऱ्यांच्या अभिप्रायासह आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर श्री.डी.एल.जाधव यानी दि.२६/३१.८.२०१० च्या पत्रान्वये तपशीलवार अहवाल सादर केला. श्री.स्वामी यांनी मागितलेली माहिती देण्याबाबत पाठपुरावा करुनही जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.जी.जी.लामतुरे यानी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच 'श्री.स्वामी यांच्या मागणीतील संपूर्ण माहिती श्री. होनमुटे, लिपिक यांच्या ताब्यात आहे, ही बाब मुद्दाम निदर्शनास आणून देत आहे,' असे श्री.जाधव यानी अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे. हा अहवाल, उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यांत आलेली कागदपत्रे विचारात घेता संबंधित माहिती न देण्यास सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा लिपिक, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.जी.एन.होनमुटे हे जबाबदार असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० मधील तरतुदीनुसार ते शास्तीस पात्र ठरतात. जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.जी.जी.लामतुरे यानी

प्रशासकीय अधिकारात श्री.होनमुटे यांच्याकडून कागदपत्रे ताब्यात घेण्याची कारवाई करणे आवश्यक होते. ते न केल्याबद्दल त्याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा लिपिक, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.जी.एन.होनमुटे यांच्या ताब्यात संपूर्ण माहिती असतानाही त्यानी ती अपीलकर्ता श्री.नागय्या शिवलिंगय्या स्वामी याना दिली नाही. यास्तव त्याना रू.२५००० शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती त्याना मार्च २०११, एप्रिल २०११, मे २०११, जून २०११ व जुलै २०११ मध्ये मिळणाऱ्या फेब्रुवारी २०११, मार्च २०११, एप्रिल २०११, मे २०११, जून २०११ या महिन्यांच्या वेतनातून पाच हप्त्यांत वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर यानी करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.जी.जी.लामतुरे यानी अपीलकर्ता याना निःशुल्क माहिती पुरवावी व दि. २०.२.२०११ पर्यंत त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

(४) अपीलकर्त्यांच्या निवेदनाप्रमाणे आवश्यक तर अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सोलापूर यानी अपीलकर्त्यास कार्यालयात बोलावून माहिती काढून देण्यास अनुमती देऊन त्यानुसार पूर्तता करून घ्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ५ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.संदीप मोहनराव यादव
४६९-बी/३, शनिवार पेठ, मोहिते हॉस्पिटलशेजारी, फेडरल बँकेच्या वर,
कराड, ता.कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व
औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६७ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.संदीप मोहनराव यादव
४६९-बी/३, शनिवार पेठ, मोहिते हॉस्पिटलशेजारी, फेडरल बँकेच्या वर,
कराड, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई श्री.के.व्ही.पंडित

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,
मुंबई विद्यमान श्री.प.प्र.वाकडे, तत्कालीन श्री.प्र.ज.मुळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

डीएमएलटी पदवीधारकांनी चालविलेल्या पॅथोलॉजी लॅबोरेटरीजच्या संदर्भात आपण १२/१३ अर्ज केले होते. परंतु योग्य उत्तर व माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता डॉ.संदीप मोहनराव यादव यानी केली.

डॉ.यादव यांचा अर्ज दि. ३१.७.२००९ चा असून या विषयाच्या संदर्भात १३ ऑगस्टला मंत्रिमंडळाचा निर्णय झाला. परंतु निवडणूक आचार संहितेमुळे नोव्हेंबर महिन्यामध्ये संचिका सादर करण्यात आली असून अद्यापही निर्णय झालेला नाही. डॉ.यादव यांना त्याबाबत कळविले आहे, असे प्रतिपादन तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई, अनुक्रमे श्री.प्र.ज.मुळे व श्री.प.प्र.वाकडे यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यानी अपीलकर्त्यास एक आठवडयात माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने दिले. याबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई श्री.प.प्र.वाकडे यानी दि. २५.२.२०११ पर्यंत आयोगास सादर करावा. यानुसार कार्यवाही न झाल्यास ते शास्तीस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.जॉर्ज मॅन्युअल बोर्जीस
१८४, ई वॉर्ड, नागाळा पार्क, **अपीलकर्ता**
डॉ.पिसाळ रेसिडेन्सी शेजारी,
कोल्हापूर-४१६ ००३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक (माध्यमिक),**
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
शिक्षण उपसंचालक कार्यालय (माध्यमिक),
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६०/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि. २२.२.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मूळ सेवापुस्तक मिळणेबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.जॉर्ज मॅन्युअल बोर्जीस यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मला जन माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय (माध्यमिक), कोल्हापूर यांच्याकडून दरम्यानच्या काळात माहिती मिळाली

असल्याने प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीची गरज राहिली नाही, अपील निकाली काढण्यास हरकत नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.बोर्जीस यानी दि.१.२.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ७ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय ऊर्फ वसंत मधुसूदन फडके
बिल्व, फ्लॅट नं.३८, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद,
ता.मावळ, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी आरोग्य निरीक्षक, तळेगाव दाभाडे
नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.६.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय ऊर्फ वसंत मधुसूदन फडके
बिल्व, फ्लॅट नं.३८, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद,
ता.मावळ, जि.पुणे श्री.एस.के.देसाई

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी आरोग्य निरीक्षक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ,
जि.पुणे विद्यमान श्री.प्रमोद लालचंद फुले, तत्कालीन-श्री.रविंद्र दा. शिंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एफ,आय, व जे ) मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या संज्ञेत बसत नसल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी आरोग्य निरीक्षक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे यानी नाकारली. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे यानी ते योग्य ठरविले. कलमांचा चुकीचा अर्थ लावला असून माहिती नाकारण्याचा निर्णय अयोग्य आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.दत्तात्रय ऊर्फ मधुसूदन फडके यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केले आहे.

श्री.फडके यानी दि. १०.७.२००९ च्या (प्राप्त दि. १४.७.२००९ ) अर्जान्वये १४मुद्दयांची उपमुद्दयांसह माहिती मागितली होती. त्यात अनेक विषयांवर भाष्य केले असून त्या अनुषंगाने स्पष्टीकरण/खुलासा/निर्णय इ.ची मागणी व काही सूचनाही केल्या आहेत. त्यामुळे या बाबी 'माहिती'च्या संज्ञेत येत नसल्याचे व मोघम स्वरुपाची विचारणा असल्याचे कळविले, असे प्रतिपादन विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी आरोग्य निरीक्षक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे अनुक्रमे श्री.प्रमोद लालचंद फुले व श्री.रविंद्र दा. शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे श्री.एस.के.देसाई यानी केले.

श्री. फडके यानी विस्तृत स्वरुपाची विचारणा केली असून त्यातील अनेक मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाहीत, हे म्हणणे रास्त आहे. तथापि आरोग्य विभाग प्रमुखांचे नाव, कर्मचाऱ्यांची संख्या अशा स्वरुपाचा तपशील देणे शक्य होते.त्यासाठी अर्जातील मुद्दयांचे काळजीपूर्वक विश्लेषण करुन शक्य तेवढी माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन होणे आवश्यक आहे, याची समज विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी आरोग्य निरीक्षक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे अनुक्रमे श्री.प्रमोद लालचंद फुले व श्री.रविंद्र दा. शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे श्री.एस.के.देसाई यांना देण्यात येत आहे.

कागदपत्रांच्या आधारे ज्या मुद्दयांची माहिती देणे शक्य आहे ती ७ दिवसांत देण्यात येईल, असे लेखी निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रभारी आरोग्य निरीक्षक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे श्री.प्रमोद लालचंद फुले यानी दिले व त्यानुसार दि. २४.६.२०१० रोजी मुद्देनिहाय उत्तर

दिले. परंतु आपल्या अनेक सूचनांवर कार्यवाही केली जात नाही व नगर परिषद प्रशासनाकडून अपेक्षित असलेल्या सेवा प्रदान केल्या जात नाहीत, हे त्यातून स्पष्ट होते. त्यामुळे आमच्या सूचनांची कार्यवाही निश्चित कालावधीत करावी, अशी मागणी श्री.फडके यानी दि.१२.८.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. प्रशासकीय कार्यवाही करण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. तथापि श्री. फडके हे ज्येष्ठ नागरिक (वय ८० वर्षे) असून नागरी हितासाठी माहिती-मागणीचे अर्ज व पत्रव्यवहार करीत असतात. हे लक्षात घेता त्यांच्या अर्जांवरील कार्यवाहीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रभारी आरोग्य निरीक्षक, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे अनुक्रमे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे यानी अधिक सकारात्मक भूमिका घेणे उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.यशवंत सरवदे
स.नं.४८/२, धनलक्ष्मी सोसायटी, **अपीलकर्ता**
गणेशनगर, वडगांवशेरी,
पुणे-४११ ०१४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मध्यवर्ती शासकीय इमारत,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मध्यवर्ती शासकीय इमारत,
पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि.९.२.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.ज.धों.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता यांचा कार्यकालावधी, तक्रारी, केलेली कामे तदनुषंगिक एकूण १० मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.यशवंत सरवदे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९.२.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. ‘जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी

अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यानी आवश्यक असलेली माहिती मला दिली असून माझा अपील अर्ज निकाली काढण्यात यावा', असे निवेदन अपीलकर्ता श्री.सरवदे यानी दि.५.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रुद्रकुमार धोंडीराम चोपडे
मेन रोड करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह. संचालक,
साखर विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि.
आदिनाथनगर, शेलगाव-भाळवणी,
पो. जेउर, ता. करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७४ + १५४१/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रुद्रकुमार धोंडीराम चोपडे
मेन रोड करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह. संचालक,
साखर विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजी नगर, पुणे श्री.डी.आर.घोडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि. आदिनाथनगर, शेलगाव-भाळवणी, पो. जेउर, ता. करमाळा, जि. सोलापूर या साखर कारखान्याने आपल्या गटातून नेलेल्या उसाबाबतची माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली नाही. तसेच ऊस तोडणीच्या कायदेशीर पध्दतीबाबतची योग्य माहिती दिली नाही. अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रुद्रकुमार धोंडीराम चोपडे यानी केली.

श्री.चोपडे यांच्या दि. १३.४.२००९ च्या अर्जानुसार दि. २६.४.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. अपिलीय प्राधिका-याच्या निर्णयानंतर पुन्हा त्याबाबत स्पष्टीकरण दिले. त्यानी माहिती मागितलेल्या विषयाच्या संदर्भात करमाळा येथे विभागीय न्यायालयात दावा चालू आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, श्री आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि. आदिनाथनगर, ता. करमाळा, जि. सोलापूर श्री. अरविंद एस. पाटील यानी केले.

श्री. चोपडे यांच्या मुळ अर्जातील मुद्दा क्र. ३ मध्ये विचारणा केल्यानुसार गळीतासाठी ऊस घेण्याबाबतच्या कायदेशीर तरतुदीची माहिती जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास त्वरित द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मोहन खंडेराव गायकवाड
रा. ब्लॉक नं. ११३, विसावा सहकारी गृहनिर्माण संस्था, अपीलकर्ता
शहीद भगतसिंग मार्केट चौक, उत्तर , सदर बझार, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सेक्रेटरी,
विसावा सहकारी गृहनिर्माण संस्था, ब्लॉक नं. ९,
शहीद भगतसिंग मार्केट चौक, उत्तर , सदर बझार, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६२/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मोहन खंडेराव गायकवाड
रा. ब्लॉक नं. ११३, विसावा सहकारी गृहनिर्माण संस्था,
शहीद भगतसिंग मार्केट चौक, उत्तर , सदर बझार, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. आर. आर. ठोंबरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मासिक सभांच्या व वार्षिक सर्वसाधारण सभांच्या इतिवृत्तांच्या प्रती व अन्य माहितीची मागणी आपण सेक्रेटरी डॉ.सौ.ए.सी.परकरवार यांच्याकडे केली होती. परंतु ती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मोहन खंडेराव गायकवाड यानी केली.

माहिती सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भातील असून संस्थेने वेळोवेळी श्री. गायकवाड याना माहिती व उत्तर दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते. सहकारी गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिला आहे. आपल्या कार्यालयाच्या स्तरावरील माहिती हवी असल्यास अपीलकर्त्यास देता येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर श्री. एस.एस.राऊत यानी केले. ही माहिती अपिलीय प्राधिकारी यानी अपीलकर्त्यास एक आठवडयाचे आत द्यावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बबन गंगाधर ठुबे
मु.पो.आळे (शेरीमळा), **अपीलकर्ता**
ता.जुन्नर, जि.पुणे-४१२ ४११

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक,**
उच्च शिक्षण विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
उच्च शिक्षण विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग,
पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**<br>उच्च शिक्षण विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग,<br>पुणे-४११ ००१ श्री.विलास दगडूजीराव मारणे (सहाय्यक लेखाधिकारी)<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक,**<br>उच्च शिक्षण विभाग, १७, डॉ.आंबेडकर मार्ग,<br>पुणे-४११ ००१<br>डॉ.नरेंद्र मारोतराव कडू | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पुणे विभागातील महाविद्यालयांना दिलेले वेतन अनुदान व वेतन निर्धारण यांची माहिती |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.बबन गंगाधर ठुबे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती सहसंचालक, शिक्षण विभाग यांच्या कार्यालयाकडून मला मिळालेली आहे. तरी त्याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. कृपया, माझा अपील अर्ज दप्तरी दाखल करावा', असे अपीलकर्ता श्री.ठुबे यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे डॉ.नरेंद्र मारोतराव कडू यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १० फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर
व्दारा 'अँकार' प्लॉट नं. ३१, अपीलकर्ता
अंजली कॉलनी गेंडामाळ, शाहूपूरी, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषि सहसंचालक,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषि सहसंचालक (क.क)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३२/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर
व्दारा 'अँकार' प्लॉट नं. ३१,
अंजली कॉलनी गेंडामाळ, शाहूपूरी, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषि सहसंचालक,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. बी.एम.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा कृषि सहसंचालक (क.क)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. अे. बी. देसाई

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण मागितलेल्या माहितीसाठी शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिकारी यांचे उत्तर एक महिन्यानंतर मिळाले असल्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. शिवाजी जगन्नाथ वाडेकर यानी केली.

श्री. वाडेकर यांचा दि. ९.११.२००९ चा अर्ज दि. १६.११.२००९ रोजी प्राप्त झाला. ४१३७/- रुपये शुल्क त्याना दि. ९.१२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. ते पत्र त्याना दि. १६.१२.२००९ रोजी मिळाल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्याना द्यावयाची माहिती अन्य खात्यांकडून दि. १८.११.२००९ च्या पत्रान्वये मागितली व त्याची प्रतही त्याना पाठविली. सन १९९२ पासूनची माहिती शोधणे व अन्य कार्यालयांकडून प्राप्त करुन घेणे यामुळे उत्तर ३० दिवसांच्या मुदतीअखेरीस दिले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कृषि सहसंचालक (क.क), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. अे. बी. देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा कृषि सहसंचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. अे.बी.कवचाळे यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर पाठविले. परंतु अपीलकर्त्यास ते १ दिवस विलंबाने मिळाले, असे दिसते. मात्र त्यामुळे माहिती निःशुल्क देण्याची अपीलकर्त्याची मागणी मान्य करता येणार नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास टपालखर्च आदीची रक्कम वगळता रु. ३५००/- शुल्क भरुन त्यानी माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अशोक बाळकृष्ण लांबटकर
रा. चोभे पिंपरी, पो. ढवळस, अपीलकर्ता
ता. माढा, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
ग्रामीण कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठाण,
उजनी (टे), ता. माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८९/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अशोक बाळकृष्ण लांबटकर
रा. चोभे पिंपरी, पो. ढवळस, ता. माढा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर श्री. बप्पासाहेब भिमराव नेमाने

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
ग्रामीण कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठाण,
उजनी (टे), ता. माढा, जि. सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. धनंजय दिनकर पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मार्च २००४ ते मार्च २००८ या काळातील बचतगटाचे अनुदान आदि संदर्भातील माहिती आपण मागितली होती. ती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. अशोक बाळकृष्ण लांबटकर यानी केली.

श्री. लांबटकर यांच्या दि. ६.११.२००८ रोजीच्या अर्जाला दि. २४-२६/११/२००८ च्या पत्रान्वये उत्तर देऊन कार्यालयाकडील माहिती पुरविली, व ऊर्वरित माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे ती देण्याबाबत ग्रामीण कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठाण, उजनी (टे), ता. माढा, जि. सोलापूर या संस्थेला कळविले. त्याची प्रत श्री. लांबटकर याना पाठविली. संस्थेने माहिती न दिल्यामुळे श्री. लांबटकर यानी अपील केले. बहुतांश माहिती मिळाली असल्याचे श्री. लांबटकर यानी सुनावणी दरम्यान मान्य केले व उर्वरित माहिती १५ दिवसांत देण्याचे संबंधित संस्थेच्या प्रतिनिधींनी मान्य केले. ही संस्था न्यास असून तिला त्या त्या कामाच्या स्वरुपानुसार त्यापुरते अनुदान मिळाते, कायमस्वरुपी शासकीय अर्थसहाय्य वा अनुदान नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर श्री. बप्पासाहेब भिमराव नेमाने यानी केले.

कामाच्या संदर्भात न्यासाला मिळणारे अनुदान लक्षात घेता त्या त्या कामापुरती माहिती संस्थेने देणे आवश्यक आहे. ती आठ दिवसांत निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गोरख रामचंद्र बोत्रे
मु. पो. नातेंपुते, ता. माळशिरस, अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५२/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. गोरख रामचंद्र बोत्रे<br>मु. पो. नातेंपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री. आबासाहेब मारुती सूर्यवंशी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री. शिवाजी वामन चंदनशिवे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

प्राथमिक शिक्षकांना निवड श्रेणी लागू करण्याबाबतची सन १९८९ पासूनची माहिती आपण जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. शुल्क भरण्यासाठी गटशिक्षण अधिका-यांकडे आपण गेलो

असता शुल्क भरुन घेतले नाही व माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. गोरख रामचंद्र बोत्रे यानी केली.

अपीलकर्ता यानी सन १९८९ पासूनची व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. शुल्क भरण्याबाबत त्याना विहित मुदतीत कळविले होते. त्यांच्या सोयीसाठी आपल्या कार्यालयाकडे येणे शक्य नसल्यास गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती, माळशिरस यांच्या कार्यालयात शुल्क भरावे, असे कळविले होते. त्यानी शुल्क भरले नाही. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीलाही ते उपस्थित राहिले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. शिवाजी वामन चंदनशिवे यानी केले. चलन भरण्यासाठी बोलाविले असता देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करुन नंतर चलन भरण्याची भूमिका त्यानी घेतली, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. आबासाहेब मारुती सूर्यवंशी यानी नमूद केले.

जन माहिती अधिकारी यानी माहिती नाकारलेली नाही. तसेच मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. मात्र ती देण्याबाबत अधिक काटेकोर व्यवस्था जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. शिवाजी वामन चंदनशिवे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. आबासाहेब मारुती सूर्यवंशी यांनी करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास अभिलेखांचे अवलोकन करु देऊन देय माहितीतील आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या ५० पृष्ठांपर्यंतच्या प्रती निःशुल्क पुरवाव्या.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अनिल साहेबराव माने
म. पो. मारापूर, ता. मंगळवेढा, अपीलकर्ता
जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. आबासाहेब मारुती सूर्यवंशी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. शिवाजी वामन चंदनशिवे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री. अनिल साहेबराव माने यानी जानेवारी १९९८ ते फेब्रुवारी २०१० या कालावधीतील विस्तृत माहिती १२ तक्त्यांच्या स्वरुपात संकलित करुन मागितली होती. त्याचा आढावा घेण्यास विलंब लागला. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यानुसार तक्त्यांमध्ये माहिती तयार ठेवली होती, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. शिवाजी वामन चंदनशिवे यानी केले.

अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची व अनेक तक्त्यांमध्ये संकलित करुन माहिती देण्याची मागणी केली आहे. अशा प्रकारे माहिती संकलित करुन विशिष्ट नमुन्यात देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. तथापि अपीलकर्त्यास तसे विहित मुदतीत कळविणे आवश्यक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. शिवाजी वामन चंदनशिवे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शिरीष गौतम पंडित
प्लॉट नं.२८४, जयसिंगराव पार्क, **अपीलकर्ता**
कागल, ता.कागल,
जि.कोल्हापूर-४१६ २१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
जिल्हा परिषद, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
कागल नगरपरिषद, शिक्षण मंडळ,
कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५११/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**<br>कागल नगरपरिषद, शिक्षण मंडळ,<br>कागल, जि.कोल्हापूर श्री.शांताराम खोराटे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**<br>जिल्हा परिषद, कोल्हापूर<br>श्री.शरद शंकर गिरी गोसावी | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कागल नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळाची कामकाज पध्दती, मुख्याध्यापकांचे अधिकार व कर्तव्ये, बदली व नियुक्त्यासंदर्भातील निकष तदनुषंगिक एकूण १६ मुद्दे |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.शिरीष गौतम पंडित यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१०.११.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मागणी केलेली माहिती मला प्राप्त झाली', असे अपीलकर्ता श्री.पंडित यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, कागल नगरपरिषद, शिक्षण मंडळ, कागल, जि.कोल्हापूर श्री.आनंदराव गोपाळ खोराटे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुनिल प्रभाकर औटे
सुयोग निवास, सरपंच वस्ती, **अपीलकर्ता**
गोपाळवाडी, ता.दौंड, जि.पुणे-४१३ ८०१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहा.अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
कार्यालय दौंड, ता.दौंड, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
दौंड शहर, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दौंड शहरातील दि.२७.१२.२००७ रोजीच्या अतिक्रमण हटाव मोहिमेवेळी वीज कनेक्शन बंद करुन मीटर काढून नेलेसंदर्भातील माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुनिल प्रभाकर औटे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. ‘मी मगणी केलेली माहिती मला लेखी स्वरुपात दिल्यामुळे

आयोगाकडे अपीलकामी मला कोणतेही म्हणणे मांडण्याचे नाही. तसेच माझी कोणतीही तक्रार नसल्याने अपील रद्द करण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री.औटे यांनी दि.२०.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कासम हसन कुरैशी
जामे मशिदशेजारी, खाटीक गल्ली, **अपीलकर्ता**
ता.बारामती, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
बारामती नगरपरिषद,
ता.बारामती, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक,**
बारामती नगरपरिषद,
ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९२/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन १९९५-२००९ या कालावधीतील बारामती नगरपरिषदेच्या बिफ मार्केट बाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.कासम हसन कुरैशी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९.२.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार जन माहिती अधिकारी तथा आरोग्य निरीक्षक, बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे यानी संबंधित विभागाकडील

अभिलेख विनाशुल्क पाहावयास दिले. माहितीने माझे पूर्ण समाधान झाल्याने मी अपील माघारी घेत आहे', असे निवेदन अपीकर्ता श्री.कुरैशी दि.३.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>ाहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नारायण बाबुराव सुतार
राजेंद्रनगर, १००५/३, म.न.पा. कॉलनी, **अपीलकर्ता**
शिवगौरी सोसायटी, पुणे-४११ ०३०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता (विकास योजना),**
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे-४११००५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (विकास योजना),**
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.नारायण बाबुराव सुतार<br>राजेंद्रनगर, १००५/३, म.न.पा. कॉलनी,<br>शिवगौरी सोसायटी, पुणे-४११ ०३०<br><br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (विकास योजना),**<br>पुणे महानगरपालिका,<br>पुणे-४११००५<br>श्री.रामकृष्ण वारे | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता (विकास योजना),**<br>पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५<br>श्री.हेमंत देवधर |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** नगर रचना योजनेतील भूखंड क्र.३५ च्या ताब्यासंदर्भातील माहिती व कागदपत्रे |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.नारायण बाबुराव सुतार यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला मिळाली असून सदर-बाबत माझी कोणतीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.सुतार यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण **अपीलकर्ता**
अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर,
इंदापूर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),
पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२२/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण<br>अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर,<br>इंदापूर, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**<br>सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), | |

| | |
|---|---|
| | पुणे-४११ ००१<br>श्री.सु.आ.चौधरी |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व), पुणे या कार्यालयामार्फत ठेकेदारांना देण्यात आलेली कामे, कामाबाबतच्या तक्रारी व दक्षता व गुणनियंत्रण विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'माझ्या अर्जातील माहितीबाबत तक्रार नसल्याने अपील निकाली काढावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.चव्हाण यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर )**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११** **राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गोकुळ ज्ञानोबा होले
मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग
परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे-३७ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग
परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोकुळ ज्ञानोबा होले
मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग
परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे प्रतिनिधी श्री.एस.पी.काकडे

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग
परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे श्री.व्ही.वाय.रावळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

विवाहासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस नेण्यात आल्याबद्दल भरलेली रक्कम आदि तपशिलाची माहिती न देता संबंध नसलेल्या खोटया दस्तऐवजाच्या प्रती दिल्या. अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गोकुळ ज्ञानोबा होले यानी केली.

गाड्या डेपोबाहेर काढतांना नोंद केली जाते. तसेच त्या संदर्भातील सर्व तपशील नोंदविलेला असतो. त्यानुसार माहिती दिली. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे श्री.व्ही.वाय.रावळ व अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे प्रतिनिधी श्री.एस.पी.काकडे यानी केले.

अभिलेखानुसार माहिती दिल्याबाबत अपीलकर्त्यास शंका असल्यास मूळ अभिलेखांचे अवलोकन जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे यानी करु द्यावे व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.किशोर ठकसेन भिडे
स.नं.४७, प्लॉट नं.९०२,
वॉर्ड नं.३, सुनितानगर,
वडगांवशेरी, पुणे-४११ ०१४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
अहमदनगर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-१,**
जागतिक बँक प्रकल्प उपविभाग,
अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२२/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-१,**<br>जागतिक बँक प्रकल्प उपविभाग, अहमदनगर<br>श्री.अजयकुमार भोसले<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर<br>श्री.सुरेश राजगुरु | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर अंतर्गत सर्व उपविभागांच्या १.४.२००६ ते ३१.३.२००८ या कालावधीतील कामांची माहिती |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.किशोर ठकसेन भिडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.९.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मगितलेली माहिती मला मिळालेली आहे. माझी कुठलीही तक्रार नाही. माझे अपील निकाली काढण्यात यावे',असे अपीलकर्ता श्री.भिडे यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्रेणी-१, जागतिक बँक प्रकल्प उपविभाग, अहमदनगर श्री.अजयकुमार भोसले व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर श्री.सुरेश राजगुरु यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र नारायण भैरवकर
मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग
परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे-३७ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग
परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६० / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र नारायण भैरवकर
मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग
परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे प्रतिनिधी श्री.एस.पी.काकडे

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग
परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे श्री.व्ही.वाय.रावळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका वाहकाची नियुक्ती व ते करीत असलेले काम या संदर्भातील खोटी माहिती दिली. त्यांना दिलेल्या नेमक्या कामांच्या कागदपत्रांच्या प्रती पुरविल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.राजेंद्र नारायण भैरवकर यानी केली.

आगारात वाहतूक पर्यवेक्षक कमी असल्यामुळे वाहतूक नियोजनाच्या कामासाठी संबंधित वाहकाचा वापर करण्यात येत असल्याचे व ही प्रशासकीय बाब असल्याचे श्री.भैरवकर याना विहित मुदतीत कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे श्री.व्ही.वाय.रावळ यानी नमूद केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. प्रशासकीय कार्यवाहीची योग्यायोग्यता ठरविणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित संचिकेचे अवलोकन जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेट रोड, स्वारगेट, पुणे यानी करु द्यावे व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निशुल्क पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ९ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय बाबुराव पवार
मु.पो.मेढा, ता.जावली, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
मेढा, ता.जावली, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मेढा, ता.जावली, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११२+१२७९ /२०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय बाबुराव पवार<br>मु.पो.मेढा, ता.जावली, जि.सातारा<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,<br>मेढा, ता.जावली, जि.सातारा श्री.मिलिंद सुधाकर टांकसाळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जावली तालुका औद्योगिक विकास कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संस्था मर्यादित, मेढा, ता.जावली, जि.सातारा या संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या खर्चाची माहिती आपण मागितली होती. सहा वर्षे आपण या संस्थेचे अध्यक्ष होतो. १२५ रूपये सभासद वर्गणी असून शासनाचे अनुदान व आर्थिक सवलती आहेत. एका जागेच्या निवडणुकीसाठी स्टेशनरी, मानधन आदिंवर ३५००० रूपये खर्च झाल्याचे

दर्शविले असल्यामुळे त्याचा तपशील मिळणे आवश्यक आहे,अशी मागणी अपीलकर्ता श्री.दत्तात्रय बाबुराव पवार यानी केली.

श्री.पवार यानी अर्ज केला तेव्हा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हा कार्यभार एकाच अधिकाऱ्यांकडे होता. आता स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. श्री.पवार यानी मागणी केलेला तपशील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे असून ते तो तयार करून संस्थेला देतात. श्री.पवार संस्थेकडून ही माहिती घेऊ शकतात. आपल्या कार्यालयाच्या अभिलेखात ही कागदपत्रे नसतात. त्यांच्या १०.३.२०१० च्या अर्जाला तसे उत्तर दि.१२.३.२०१० रोजी दिले. निवडणूक विषयक कागदपत्रे सील करून सचिवांच्या ताब्यात दिलेली असतात. निवडणुकीसंदर्भात वाद न्यायालयात गेल्यास न्यायालयाच्या आदेशानेच ती पाहता येतात, असे श्री.पवार याना स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मेढा, ता.जावली, जि.सातारा श्री.मिलिंद सुधाकर टांकसाळे यानी केले.

अपीलकर्त्यास हवा असलेला स्टेशनरी, कर्मचाऱ्यांचे मानधन यावरील खर्चाचा तपशील संस्थेकडून प्राप्त करून घेऊन एक आठवड्यात अपिलीय प्राधिकारी यानी अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावा. मतदाराच्या सह्या असलेल्या मतदान नोंदवहीच्या प्रती देऊ नयेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक भगवान सूर्यवंशी
मु.पो.दिवशी बु., ता.पाटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
मेढा, ता.जावली, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक लि.सातारा
मुख्य कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५९ / २०१० /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक लि.सातारा<br>मुख्य कार्यालय, सातारा प्रतिनिधी श्री.एन.ए.माळी | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९९४ ते १९९८ या काळात अपीलकर्ता श्री.अशोक भगवान सूर्यवंशी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सेवेत होते. एका प्रकरणी त्याना जन्मठेपेची शिक्षा झाली असून सध्या ते तुरूंगात आहेत. भविष्य निर्वाह निधी वगैरे संदर्भात त्यानी दि.१४.२.२०१० च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीबाबत दि.१०.३.२०१० रोजी उत्तर दिले. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहाकरी बँकेला कोणतेही शासकीय भाग-भांडवल वा अनुदान नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील च्या कलम २ (एच)मधील तरतुदीनुसार बँक 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही व म्हणून बँकेला हा अधिनियम लागू होत नाही. ही भूमिका कायम ठेवूनही बँक माहिती देत आली आहे. तसेच श्री.सूर्यवंशी यानी विहित नमुन्यात बँकेकडे अर्ज केल्यास व येणे-देणे रकमांचा हिशोब पूर्ण केल्यास रक्कम देण्याबाबत बँक योग्य तो निर्णय घेईल, असे सरव्यवस्थापक, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक लि.सातारा, मुख्य कार्यालय, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.एन.ए.माळी यानी लेखी निवेदन सादर केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त व उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संजय मनोहर गुटाळ
मु.पो.पांगरे, ता.करमाळा, **अपीलकर्ता**
जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था, करमाळा,
जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
पांगरे विकास सेवा सहकारी संस्था,
पांगरे, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४६/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची नियोजित तारीख | दि.२३.२.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००४-०९ या कालावधीतील पांगरे विकास सेवा सहकारी संस्थेच्या निवडणुका, विद्यमान सदस्य, अध्यक्ष, सभासद, कर्जदार, तदनुषंगिक एकूण ५ मुद्दयांची विस्तृत माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संजय मनोहर गुटाळ यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३.२.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मला जन माहिती अधिकारी तथा सचिव, पांगरे विकास सेवा सहकारी संस्था, ता.करमाळा, जि.सोलापूर यांच्याकडून पूर्ण माहिती मिळालेली आहे. माझी संस्थेविषयी कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. तरी मी केलेले अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री.गुटाळ यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सचिव, पांगरे विकास सेवा सहकारी संस्था, ता.करमाळा, जि.सोलापूर यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १० फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय निवृत्ती पाटील
मु.पो.काले, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड,
ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७६ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजय निवृत्ती पाटील
मु.पो.काले, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा, जि.सातारा श्री.अरूण पांडुरंग काकडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड,
ता.कराड, जि.सातारा प्रतिनिधी श्री.पी.ए.बगले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

करड मर्चंट क्रेडिट सहकारी पतसंस्था मर्यादित, कराड, ता.कराड, जि.सातारा व महिला मर्चंट नागरी सहकारी पतसंस्था, कराड, ता.कराड, जि.सातारा या दोन नागरी सहकारी पतसंस्थांनी सन १९९९ ते फेब्रुवारी २०१० या काळात महाराष्ट्र सहकार कायदा कलम १०१ नुसार दाखल केलेले दावे व भरलेले मुद्रांक शुल्क या संदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड, ता.कराड, जि.सातारा यानी दिली नाही. कोणतेही उत्तर पाठविले नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विजय निवृत्ती पाटील यानी केले.

श्री.पाटील यानी नागरी सहकारी पतसंस्थांच्या संदर्भातील व अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती दि.१८.२.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. हा कालावधी व माहितीची व्याप्ती लक्षात घेता कार्यालयाचे कार्यस्त्रोत व्यस्त प्रमाणात वळवावे लागणार असल्यामुळे विहित मुदतीत माहिती देणे शक्य होणार नाही. उपलब्ध झाल्यानंतर कळविण्यात येईल, असे दि.१०.३.२०१० च्या पत्रान्वये त्याना कळविले. माहिती जुनी व गुंतागुंतीच्या स्वरूपाची आणि संकलित करून द्यावी लागणार असल्यामुळे उपलब्ध होईल तसतशी दिली जात आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा, जि.सातारा श्री.अरूण पांडुरंग काकडे यानी केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्णयानुसार नागरी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नाही, असेही त्यानी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड, ता.कराड, जि.सातारा अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा, जि.सातारा यानी माहिती नाकारलेली नाही, देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष गंगाधर पन्हाळे
द्वारा व्यवस्थापक मिलन लॉज, १९, विल्सन गार्डन, पुणे स्टेशन, पुणे-१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय),
पुणे पोलीस आयुक्तालय, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),
पुणे पोलीस आयुक्तालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९९१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.७.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय),<br>पुणे पोलीस आयुक्तालय, पुणे श्री.राजेश बनसोडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१५.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१५.७.२०१० रोजी घेण्यात आली.

आजारपणाच्या रजेचा कालावधी निश्चित होऊन रजेचे वेतन मिळण्याची मागणी आपण सातत्याने करुनही योग्य कार्यवाही झाली नाही व माहितीही विलंबाने आणि चुकीची दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुभाष गंगाधर पन्हाळे यानी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व लेखी निवेदनात केली आहे. तसेच आपल्यावर अन्याय झाला असून तो दूर व्हावा, अशी मागणीही त्यानी केली आहे.

आपण दोन प्रकरणे एकत्र करुन आयोगाकडे अपील केले होते. तसेच पोलिस आयुक्त कार्यालयाकडेही स्वतंत्र अर्ज प्रलंबित आहे. या दोन्हीबाबत स्वतंत्रपणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये तक्रार अर्ज दाखल केला असून अपील रद्द करावे, असे श्री. पन्हाळे यानी १८.५.२००९ च्या अर्जान्वये आयोगास कळविले. तथापि अपील व तक्रार-अर्ज या दोन्हीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन), पुणे पोलीस आयुक्तालय, पुणे यांच्याकडून लेखी अहवाल मागविले. आयोगाच्या निदेशानुसार वेळोवेळी अहवाल सादर करण्यात आले असून माहिती उशिरा मिळाल्याची श्री.पन्हाळे यांची तक्रार आहे. तथापि प्रशासकीय कार्यवाही व माहिती अशा संमिश्र मागणीचे त्यांचे अर्ज असून पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असतानाच्या त्यांच्या निरनिराळया कसुरींसाठी त्याना शिक्षा झालेल्या असल्यामुळे त्या संदर्भातील निर्णय, पत्रव्यवहार, प्रशासकीय कार्यवाही आदि तपासून वेगवेगळ्या कार्यालयांमधून तपशील घेणे आवश्यक होते. त्यामुळे विलंब झाला. मात्र वेळोवेळी त्यांना उत्तरे देण्यात आली, व आजारपणाच्या रजेच्या कालावधी निश्चित करुन त्यानुसार वेतनही अदा करण्यात आले, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय), पुणे पोलीस आयुक्तालय, पुणे श्री.राजेश बनसोडे यानी पूरक कागदपत्रांसह केले. विषय गुंतागुंतीचा आहे, हे त्यांचे म्हणणे रास्त असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जांवर अधिनियमातील तरतुदींनुसार विहित मुदतीत कार्यवाही होणे बंधनकारक आहे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन), पुणे पोलीस आयुक्तालय, पुणे

श्री.एस.जी.सोनवणे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), पुणे पोलीस आयुक्तालय, पुणे श्री.अे.बी.रोकडे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० फेब्रुवारी २०११**

7

58

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अब्दुलगणी करीमसाो मुल्ला
मु.पो.वडणगे, ता.करवीर,
जि.कोल्हापूर -४१६ २२९ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद, कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** गट विकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, ता.करवीर,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४७/२००९/कोल्हापूर |
| २. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता**<br>श्री.अब्दुलगणी करीमसाो मुल्ला<br>मु.पो.वडणगे, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती करवीर, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर श्री.ओमराज किसन गहाणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |



F

## विवेचन

श्री.अब्दुलगणी करीमसो मुल्ला यानी अपील क्र.२४३/कोल्हापूर मधील राज्य माहिती आयोगाच्या दि.१६.६.२००८ च्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती करवीर, ता.करवीर, यांनी न दिल्याने आयोगाकडे अपील आयोगाकडे दाखल केले आहे. सदर अपिलाची सुनावणी दि.१७.११.२००९ रोजी घेण्यात आली.

अपील क्र.२४३/कोल्हापूर प्रकरणी आयोगाच्या दि.१६.६.२००८ च्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.एल.बी.मिसाळ यांच्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास निःशुल्क उपलब्ध करुन देऊन त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा व माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाचे तारीखवार स्पष्टीकरण जन माहिती अधिका-यांनी आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात आयोगास सादर करावे. सदर अहवाल आयोगास मुदतीत सादर न झाल्यास शास्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे आदेशित करण्यात आले होते.

जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.ओमराज किसन गहाणे यानी दि.१७.११.२००९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या निवेदनातील मुद्दा ब अन्वये ' चौकशी अधिकारी श्री.मिसाळ यानी केलेल्या चौकशीचा अहवाल त्यांचे पत्र क्र.आस्था / कवशी / ६९८ /०९ दि.११.५.२००९ या पत्रान्वये अपीलकर्त्यास समक्षः दिला आहे' व मुद्दा क अन्वये 'विलंबाबाबतचे स्पष्टीकरण आयोगास क्र.पसक / पंचायत / वशि / ३११०३७ /०८ दि.९.७.२००८ ने सादर केले असून त्याची प्रत अपीलकर्ता यांना पसक / पंचायत / वशि / ५ / १०९१ / ०९ दि.१७.८.२००९ अन्वये दिली आहे', असे अभिप्राय दिले आहेत.

सदर अपील प्रकरणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर यानी सादर केलेले निवेदन पाहता जन माहिती अधिकाऱ्यानी अपील क्र.२४३ / कोल्हापूर वरील आयोगाच्या दि.१६.६.२००८ च्या आदेशाचे विहित मुदतीत पालन केले नाही. तसेच जन माहिती अधिका-यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध असताना विलंबाने दिल्याचे स्पष्ट होते. सबब सदर प्रकरणी आयोगाच्या आदेशाचे विहित कालावधीत पालन केले नाही व अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती दिली नाही, याबद्दल जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर हे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती करवीर, जि.कोल्हापूर श्री.ओमराज किसन गहाणे याना सदर प्रकरणी झालेल्या विलंबाबद्दल रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत असून ही शास्ती त्यांच्या फेब्रुवारी २०११, मार्च २०११ व एप्रिल २०११ या महिन्यांच्या मार्च २०११, एप्रिल २०११ व मे २०११ मध्ये देय असणाऱ्या वेतनातून वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६० इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशीर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी करुन याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**स्थळ : पुणे**
**दि.** 10 FEB 2011

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आनंद शशिकांत जोशी
बी-८/२, पोस्टल कॉलनी, होटगी रोड, अपीलकर्ता
सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/६/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. आनंद शशिकांत जोशी
बी-८/२, पोस्टल कॉलनी, होटगी रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. जे.टी.खंडागळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता हजर राहू न शकल्यामुळे अपिलाची सुनावणी दि. २३.६.२०१० रोजी घेण्यात आली.

कुमारी गितांजली अशोक ताठे यांच्या नियुक्तीच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली नाही. प्रथम अपिलिय प्राधिकारी यानी अपिलाची दखल घेतली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. आनंद शशिकांत जोशी यानी केले.

विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री. जे. टी. खंडागळे यानी प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर श्री. सिध्देश्वर रामचंद्र सगरे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर श्री. मनोहर नामा वीर यांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन मुद्दा क्र. १, २ व ७ ची माहिती अपीलकर्त्यास द्यावी. मुद्दा क्र. ३ ते ६ खुलासा वजा विचारणेच्या स्वरुपातील असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

त्यानुसार अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांच्याशी चर्चा करुन ठरल्यानुसार माहिती देण्यात आल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर श्री. मनोहर नामा वीर यानी दि. २२.७.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमाकांत बजरंग यादव
मु. वानेवाडी, पो. कुसळंब, अपीलकर्ता
ता. बार्शी, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
न्यु हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५००/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रमाकांत बजरंग यादव
मु. वानेवाडी, पो. कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.जी.आंबेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
न्यु हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. पी. एम. सारंग

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

न्यु हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर या प्रशालेमधील सन १९९४ ते २००८ या काळातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांच्या मान्यतेच्या व शैक्षणिक प्रमाणपत्राच्या प्रती आपणास जन माहिती अधिकारी यानी दिल्या नाहीत. ही शाळा चालविणा-या ट्रस्टमध्ये चुकीच्या पध्दतीने नेमणुका केल्या असल्यामुळे ही माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. रमाकांत बजरंग यादव यानी केले.

श्री. यादव यानी मागितलेली माहिती कर्मचा-यांची वैयक्तिक असल्यामुळे विचारणा केली असता 'माहिती देऊ नये' असे कर्मचा-यांनी लेखी कळविले. तसे श्री. यादव याना कळविले. त्यानंतर त्यानी संपर्क साधला नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. पी. एम. सारंग यानी केले.

अनुदानित शाळेतील शिक्षकांची मान्यतापत्रे व त्यांच्या शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे ही माहिती व्यक्तिगत स्वरुपाची नसून सार्वजनिक स्वरुपाची आहे. त्यामळे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री.पी. एम. सारंग यानी ती देणे आवश्यक आहे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, न्यू हायस्कूल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुसळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री.पी.एम.सारंग यानी अनुपालन अहवाल दि. २५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १० फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रंगराव रामचंद्र काटकर
१२४, ब गुरुवार पेठ, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
पुनर्वसन कार्यालय, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
पुनर्वसन कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००३/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४/१/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. रंगराव रामचंद्र काटकर<br>१२४, ब गुरुवार पेठ, सातारा<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,<br>पुनर्वसन कार्यालय, सातारा प्रशांत शांताराम आवटे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

कोयना पुनर्वसित पोटखातेदारांना जानेवारी, फेब्रुवारी १९७३ मध्ये दिलेल्या कब्जेपट्टीवरुन नोंदी झाल्या असल्या तरी ७/१२ उता-यासह आपले नाव लागले नाही. व वाटप यादीची प्रत आदि कागदपत्रे कायमस्वरुपी ठेवणे आवश्यक असूनही उपलब्ध नसल्याचे उत्तर दिले जाते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. रंगराव रामचंद्र काटकर यानी केले.

संबंधित कागदपत्रे सन १९७३ मधील असून जतनाचा कालावधी १० ते १५ वर्षांचा आहे. तसेच अभिलेख कक्षातील कागदपत्रे वाळवीने खाल्लेली आहेत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुनर्वसन कार्यालय, सातारा श्री. प्रशांत शांताराम आवटे यानी केले. अशा प्रकरणी सन १९८७ पर्यंतच जमीन देण्याची मुदत असल्याचे त्यानी नमूद केले.

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अधिकारी, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियान, ओरियन बिल्डिंग, कोरेगाव पार्क, पुणे श्री.नंदकिशोर लक्ष्मणराव कराळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सायकल ट्रॅकबाबत माहिती मागणारा अर्ज इ-मेल द्वारे आपण केला होता. परंतु त्याच्या निविदा आदि कागदपत्रांसह माहिती मिळाली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४(१)ए, बी, सी, डी नुसार संबंधित माहिती जाहीर करणे आवश्यक असताना ती केली नाही व पूर्वसूचना देऊन अवलोकनासाठी गेलो असता माहिती पहावयास मिळाली नाही, अशी तक्रार श्री.पार्थसारथी बिस्वास यानी केली.

श्री.बिस्वास यांचे पूर्वसूचनेचे पत्र मिळाले नव्हते. त्याविषयीच्या त्यांच्या तक्रार अर्जाची प्रत राज्य माहिती आयोगाकडून विचारणा झाल्यानंतर आयोगाच्या कार्यालयाकडून प्राप्त करून घेतली व त्याना उत्तर देण्यात आले. त्यानी मागितलेल्यातील काही माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून सायकल ट्रॅकच्या कामाबाबत स्वतंत्रपणे निविदा काढल्या जात नाहीत. कामाची देयके मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे ती संकेतस्थळावर न देता प्रत्यक्ष दाखविता येतील, असे स्पष्ट केले. अभिलेखांचे अवलोकन त्यानी केले आहे. ठेकेदारांना दंड करणे आदिविषयक त्यांचे मुद्दे प्रशासकीय कार्यवाहीचे असून माहितीच्या अधिकारात येत नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियान, ओरियन बिल्डिंग, कोरेगाव पार्क, पुणे श्री.नंदकिशोर लक्ष्मणराव कराळे व अपिलीय प्राधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियान, ओरियन बिल्डिंग, कोरेगाव पार्क, पुणे श्री.विनय सुधाकर देशपांडे यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियान, ओरियन बिल्डिंग, कोरेगाव पार्क, पुणे यानी तक्रारकर्त्यास आवश्यक असलेले सर्व अभिलेख अवलोकनासाठी तीन दिवसांत उपलब्ध करून द्यावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.बिस्वास याना दि.३०.९.२०१० रोजी संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून दिल्या. काही कागदपत्रांच्या प्रतींची मागणी त्यानी केली. त्यासाठीचे शुल्क त्याना कळविण्यात आले असून माहिती तयार आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियान, ओरियन बिल्डिंग, कोरेगाव पार्क, पुणे यानी दि.२४.११.२०१० च्या पत्रानवये आयोगाला सादर केले. तथापि माहिती देण्याबाबतची एकूण कार्यवाही लक्षात घेता तक्रारकर्त्यास माहिती नि:शुल्क दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(२) तक्रारकर्ता श्री.पार्थसारथी बिस्वास यानी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी, जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियान, ओरियन बिल्डिंग, कोरेगाव पार्क, पुणे यानी निःशुल्क पुरवून दि.२८.२.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बुऱ्हान बाबासाहेब नाईकवाडी
आर.एस.नं.८३१, प्लॉट नं.२४, साई पार्क, ई वॉर्ड,
भोसलेवाडी, बावडा रोड, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६३ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बुऱ्हान बाबासाहेब नाईकवाडी
आर.एस.नं.८३१, प्लॉट नं.२४, साई पार्क, ई वॉर्ड, भोसलेवाडी, बावडा रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३५ श्रीमती एस.एस.कादरी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झालेल्या संस्थांची यादी व अनुषंगिक माहिती आपण मागितली होती परंतु जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्या पातळीवरुन माहिती मिळाली नाही. संकेत स्थळावर माहिती उपलब्ध असल्याचे कळविले असले तरी मुद्रित स्वरुपातील प्रती मिळाव्यात, अशी मागणी अपीलकर्ता श्री.बुऱ्हान बाबासाहेब नाईकवाडी यानी केली.

अल्पसंख्यांक संस्थांची यादी व हा दर्जा काढून घेतलेल्या संस्थांची माहिती श्री.नायकवाडी यानी मागितली होती. यादी संकेत स्थळावर असल्याचे कळविले. एकाही संस्थेचा दर्जा रद्द केलेला नाही. तसेच सेंट झेव्हियर्स प्राथमिक/माध्यमिक शाळा, कोल्हापूर या प्रशालेबाबत केलेल्या विचारणेनुसार दर्जा शाळांना दिला जात नाही संस्थांना दिला जातो, हेही जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यानी कळविले. त्यानी दिलेले उत्तर योग्य असल्याचा निर्णय प्रथम अपिलात दिला, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्रीमती एस.एस.कादरी यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यानी केलेली कार्यवाही रास्त आहे. सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडूनच मिळाली पाहिजे, असे बंधन घालता येणार नाही. तथापि प्रत्येक व्यक्तीला संगणकसुविधा उपलब्ध असेलच असे नाही, हे लक्षात घेता अपीलकर्त्याला मुद्रित स्वरुपातील प्रती हव्या

असल्यास योग्य ते शुल्क आकारून जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यानी पुरविणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किरण बाबुराव थोरवडे
६१, बुधवार पेठ, कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
सातारा, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५४ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किरण बाबुराव थोरवडे
६१, बुधवार पेठ, कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा
श्री.सतीश यादवराव भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
ता.कराड, जि.सातारा प्रतिनिधी श्री.हिंदूराव भागोजी धनसरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९८० मधील हिस्सेवारी प्रकरणातील संचिकेच्या प्रती आपण मागितल्या होत्या. त्यानुसार प्रती व माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.किरण बाबुराव थोरवडे यानी केली.

सन १९८० मधील ती संचिका अभिलेखात उपलब्ध होत नसल्याचे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले. दहा दिवसात माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा यानी दिल्यानंतर पुन्हा शोध घेऊनही संचिका उपलब्ध झाली नाही, असे प्रतिपादन सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, ता.कराड, जि.सातारा श्री.हिंदूराव भागोजी धनसरे यानी केले.

सन १९८१ मधील नोंद व संबंधित अपील शासनाकडे आहे. अपीलकर्त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे कायम स्वरूपी जतनाची आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा श्री.सतीश यादवराव भोसले यानी नमूद केले.

संदर्भित अभिलेखांच्या जतनाचा कालावधी लक्षात घेता, या प्रकरणातील अन्यत्र झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने सर्व संबंधित कार्यालयांना शोध घेण्याबाबत अपिलीय प्राधिकारी यानी कळवावे व १५ दिवसांत अभिलेख उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये संबंधितांवर फौजदारी गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, ता.कराड, जि.सातारा याना सूचना दिल्याच्या दि.११.१.२०११ च्या पत्राची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा यानी आयोगास सादर केली. तथापि केवळ पत्रव्यवहार एवढी कार्यवाही पुरेशी नाही. अभिलेख उपलब्ध होण्याबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार कागदपत्रांचा शोध व अनुषंगिक कारवाई याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा यानी दि.२८.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश मुगुटराव जाधव
मु.पो.खराडे, ता.कराड, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह्याद्री साखर कारखाना लि.यशवंतनगर,
ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४५ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर),
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.डी.आर.घोडे

**जन माहिती अधिकारी** तथा सह्याद्री साखर कारखाना लि.यशवंतनगर,
ता.कराड, जि.सातारा श्री.चारूदत्त नारायण अहिरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सह्याद्री साखर कारखाना लि., यशवंतनगर, ता.कराड, जि.सातारा साखर कारखान्याच्या मयत सभासदाच्या दोन मुलांच्या नावे शेअर्स वर्ग केल्याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता श्री.प्रकाश मुगुटराव जाधव यानी दि.११.११.२००९ च्या अर्जान्वये मागितल्या होत्या. दि.१६.११.२००९ रोजी माहिती पाठविली. ती न मिळाल्याच्या कारणावरून त्यानी प्रथम अपील केले. त्यानंतर पुन्हा रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. परंतु त्याची पोहोच आलेली नाही. माहिती त्याना न मिळण्याची व्यवस्था कोणीतरी करीत असेल किंवा माहिती मिळूनही आपल्याला त्रास देण्याच्या उद्देशाने अपीलकर्ता आरोप करीत असतील अशी शक्यता आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सह्याद्री साखर कारखाना लि.यशवंतनगर, ता.कराड, जि.सातारा श्री.चारूदत्त नारायण अहिरे यानी केले. माहिती देण्याबाबत त्यानी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शब्बीर गणी इनामदार
५२/१, पंताचा गोट, सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा रजा राखीव तहसीलदार, सातारा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२५ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा श्री.सोनाप्पा यमगर

**जन माहिती अधिकारी** तथा रजा राखीव तहसीलदार, सातारा,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा
विद्यमान श्री.विकास जयसिंग खरात, तत्कालीन-श्री.एन.एल.कुंभारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शब्बीर गणी इनामदार यानी फेब्रुवारी १९६२ मधील बिनशेती आदेशाच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली होती. परंतु गाव, सर्व्हे नंबर आदी तपशील दिला नव्हता. तथापि शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी महसूल शाखेतील आठपैकी चार लिपिकांची पदे रिक्त होती व संबंधित लिपिकपदाचा त्यात समावेश होता. त्यामुळे व भरती प्रक्रिया आदि कामामुळे उत्तर देण्यास विलंब झाला. उत्तरात कळविल्याप्रमाणे त्यानी अद्यापही तपशील दिला नसल्यामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही व आदेशाची प्रतही आपल्या कार्यालयाच्या अभिलेखात न मिळाल्यामुळे तहसीलदार, महसूल यांच्याकडे शोधून तहसीलदार, सर्वसाधारण यांच्याकडे अर्ज पाठवून शोध घेण्यात विलंब झाला, असे प्रतिपादन तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा रजा राखीव तहसीलदार, सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा अनुक्रमे श्री.एन.एन.कुंभारे व श्री.विकास जयसिंग खरात यानी केले. त्यानी सादर केलेले विस्तृत लेखी निवेदन लक्षात घेता विलंब क्षमापित करण्यात येत असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्जांवर विहित मुदतीत कार्यवाही केली जाणे आवश्यक असल्याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विष्णू आश्रुबा सरपते
गांधीनगर, बौध्दविहाराजवळ, पिंपरी, पुणे-८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी,पुणे यांचे कार्यालय, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे-४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.९.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सरपते विष्णू आश्रुबा
गांधीनगर, बौध्दविहाराजवळ, पिंपरी, पुणे-८

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांचे कार्यालय, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.डी.बी.जवंजाळ

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे श्रीमती लैला दावल शेख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दारिद्रय रेषेखालील व्यक्तींच्या संदर्भात स्वस्त धान्य दुकानातील धान्य वाटपाबाबत दि. ७.२.२०१० च्या अर्जाला दि. १३.५.२०१० रोजी उत्तर दिले, व दि. २५.५.२०१० रोजी माहिती मिळाली.

एकाच पानाची ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे यानी केलेल्या विलंबाबद्दल दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विष्णू आश्रुबा सरपते यानी केली.

श्री. आश्रूबा यांचा अर्ज सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे श्रीमती एम.एम.ठकार यानी आपल्या निदर्शनास आणला नाही. तसेच नोंदवहीत नोंदविला नाही. सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी,पुणे यांचे कार्यालय, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे यांच्याकडील सुनावणीच्या सूचनेचे पत्रही सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे यानी निदर्शनाला आणले नाही. दि.७.२.२०१० ते २२.४.२०१० या कालावधीत सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे व संबंधित लिपिक यानी अर्ज आपल्या निदर्शनाला आणून न दिल्यामुळे माहिती मुदतीत देता आली नाही. दि. २२.४.२०१० रोजी सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे यानी अर्ज आपल्याकडे दिल्यानंतर दि. १३.५.२०१० रोजी श्री.सरपते याना यूपीसीने उत्तर पाठविले व दि.२५.५.२०१० रोजी त्यानी समक्ष माहिती प्राप्त करुन घेतली. श्री.सरपते यानी आतापर्यंत एकूण ५ वेळा आपल्याकडून माहिती घेतली असून त्यांच्या प्रस्तुत अपिलातील अर्ज वगळता अन्य सर्व अर्जांना विहित मुदतीत उत्तर व माहिती देण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे श्रीमती लैला दावल शेख यानी माहिती अधिकाराच्या नोंदवहीच्या छायांकित प्रतीसह केले.

प्रथम अपिलाच्या सुनावणीला जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे गैरहजर होत्या. माहिती तत्काळ देण्याचे आदेश आपण दि. ३०.४.२०१० रोजी दिले, असे सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांचे कार्यालय, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.डी.बी.जवंजाळ यानी नमूद केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यास १०७ दिवस विलंब झाला आहे. तो नेमका कोणत्या पातळीवर व त्याला जबाबदार कोण हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे श्रीमती लैला दावल शेख यांच्या खुलाशात नमूद केल्याप्रमाणे दि. २२.४.२०१० रोजी त्याना अर्ज प्राप्त झाला, हे मान्य केले तरी आधीच झालेला विलंब लक्षात घेता व मर्यादित स्वरुपाची माहिती असताना त्यानी त्वरित उत्तर न देता तीन आठवडयांचा अवधी घेतला आहे व

तेव्हाही माहिती न पाठविता केवळ उत्तर पाठविले आहे. ही बाब माहिती देण्याबाबतच्या तत्परतेची निदर्शक नाही.

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.विष्णू आश्रुबा सरपते याना माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, अ विभाग, निगडी, पुणे यानी केलेल्या खुलाशाची तपासणी करुन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांचे कार्यालय, शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे यानी शास्तीबाबतच्या स्पष्ट अभिप्रायासह अहवाल दि. २८.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. त्यानंतर शास्तीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १४ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सतीश नरसू मोरे
सिध्दार्थनगर, मु. पो. पेठ वडगांव, अपीलकर्ता
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर - ४१६ ११२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, २०४/ख/ई, न्यू शाहुपुरी, उत्तरवादी
भू-विकास बँक इमारत, ३ रा मजला,
हॉटेल पर्लजवळ, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, हातकणंगले
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९१/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सतीश नरसू मोरे
सिध्दार्थनगर, मु. पो. पेठ वडगांव,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर - ४१६ ११२

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, २०४/ख/ई, न्यू शाहुपुरी,
भू-विकास बँक इमारत, ३ रा मजला,
हॉटेल पर्लजवळ, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. धनाजी रा. पोवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री. सतीश नरसू मोरे यानी मागितलेली माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भातील असून आपल्या कार्यालयाच्या अभिलेखातील नाही. अपीलकर्त्यांचे याच संस्थेबाबतचे अपील क्र. १७६७/२०१०/कोल्हापूर मध्ये आयोगाने निर्णय देऊन अपील फेटाळले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. दिनेश अ. चंदेल यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. जी. एम. सौदागर
१५०/१७, रविवार पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. जी. एम. सौदागर
१५०/१७, रविवार पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. आबासाहेब मारुती सूर्यवंशी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. शिवाजी वामन चंदनशिवे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मदरसा मकतब बाबतची आपण मागितलेली माहिती विलंबाने व अपुरी मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. जी. एम. सौदागर यानी केली.

माहिती अनेक संस्थांच्या स्तरावरील असल्यामुळे संस्थेकडून घेण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. परंतु माहिती आपल्याकडूनच मिळाली पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. माहिती प्राप्त करुन घेतली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर श्री. शिवाजी वामन चंदनशिवे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर श्री. आबासाहेब मारुती सूर्यवंशी यानी सांगितले.

त्या त्या संस्थेकडील माहिती अपीलकर्त्यांनी त्या त्या संस्थेकडून घेतली पाहिजे. एकाहून अधिक सार्वजनिक प्राधिकरणांकडे माहिती-मागणीचे अर्ज वर्ग करणे जन माहिती अधिका-यांवर बंधनकारक नसल्याचे महाराष्ट्र शासनाने सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२, शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००८/प्र.क्र.९३/०८/ सहा (मा.अ.) दि. ६ सप्टेंबर २००८ च्या परिपत्रकान्वये स्पष्ट केले आहे. तथापि जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, सोलापूर श्री. शिवाजी वामन चंदनशिवे यानी आयोगापुढे सादर केलेली संकलित माहिती अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शिरीष गौतम पंडित
प्लॉट नं.२८४, जयसिंगराव पार्क, **अपीलकर्ता**
कागल, ता.कागल,
जि.कोल्हापूर-४१६ २१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
जिल्हा परिषद, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
कागल नगरपरिषद, शिक्षण मंडळ,
कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५११/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**<br>कागल नगरपरिषद, शिक्षण मंडळ,<br>कागल, जि.कोल्हापूर श्री.शांताराम खोराटे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**<br>जिल्हा परिषद, कोल्हापूर<br>श्री.शरद शंकर गिरी गोसावी | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कागल नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळाची कामकाज पध्दती, मुख्याध्यापकांचे अधिकार व कर्तव्ये, बदली व नियुक्त्यासंदर्भातील निकष तदनुषंगिक एकूण १६ मुद्दे |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.शिरीष गौतम पंडित यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१०.११.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मागणी केलेली माहिती मला प्राप्त झाली', असे अपीलकर्ता श्री.पंडित यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, कागल नगरपरिषद, शिक्षण मंडळ, कागल, जि.कोल्हापूर श्री.आनंदराव गोपाळ खोराटे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १५ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बबन विठ्ठल कुचेकर
मु.पो.नातेपुते, ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३० / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे सुनावणीला गैरहजर होते. कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याच्या दि.१९.९.२००९ च्या अर्जाला जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर यानी दि.२९.९.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले असून ते योग्य आहे. सरकारने विशिष्ट कागदपत्रांच्या नकलांसाठी शुल्क निर्धारित केले असल्यास अशा प्रती दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये असलेल्या सवलती अंतर्गत मागता येणार नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पोपट भिमराव जाधव
मु.पो.चिणके, ता.सांगोला, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, प्राथमिक आश्रमशाळा,
सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०४ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पोपट भिमराव जाधव
मु.पो.चिणके, ता.सांगोला, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, प्राथमिक आश्रमशाळा,
सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली प्रतिनिधी श्री.सुनील बाळासाहेब नरदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आश्रमशाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात सुस्पष्ट माहिती मागितली असतानाही ती संदिग्ध असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्राथमिक आश्रमशाळा, सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली यानी नाकारली. अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली यानी आदेश दिला नाही. न्यायालयीन कामासाठी ही कागदपत्रे आपल्याला मिळणे आवश्यक आहे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.पोपट भिमराव जाधव यानी केली.

श्री.जाधव हे सिध्देवाडी प्राथमिक आश्रमशाळेत सहाय्यक शिक्षक असून त्यांच्या संदर्भातील प्रकरणे कोल्हापूरच्या शाळा न्यायाधिकरणात व मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. तसेच ते अन्य कर्मचाऱ्यांची हजेरीपत्रके इ. माहिती मागत आहेत, ती देता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्राथमिक आश्रमशाळा, सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री.सुनील बाळासोब नरदे यानी सादर केले.

माहिती नाकारण्याचा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्राथमिक आश्रमशाळा, सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली यांचा निर्णय व त्याबाबतचे समर्थन योग्य नाही. मात्र अपीलकर्त्यांनी शाळेच्या मान्यतेपासून आजतागायत अशा स्वरूपाची सरसकट व विस्तृत माहिती मागितली असून स्वतःच्या संदर्भात काही मुद्दयांची कारणे विचारली आहेत. खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही. तसेच प्रदीर्घ कालावधीची व विस्तृत स्वरूपाची माहिती हवी असल्यास अपीलकर्त्याने अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती घेतल्या पाहिजेत. नेमक्या कालावधीची हजेरीपत्रकांच्या प्रती आदि माहिती त्यानी मागितल्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्राथमिक आश्रमशाळा, सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली यानी दिली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यानी मर्यादित स्वरूपाचा नेमका कालावधी नमूद करून माहिती मागितल्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्राथमिक आश्रमशाळा, सिध्देवाडी, ता.मिरज,

जि.सांगली यानी त्वरित द्यावी. प्रदीर्घ कालावधीची व विस्तृत स्वरूपाची माहिती अपीलकर्त्यास हवी असल्यास जन माहिती अधिकारी यानी त्याना अभिलेखाचे अवलोकन करू देऊन ५० पृष्ठांपर्यंतची माहिती निःशुल्क व त्याहून अधिक माहिती हवी असल्यास सशुल्क द्यावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १५ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.निवास गणपती पवार
मु.पो.शेरे, ता.कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नवीन प्रशासकीय इमारत चौथा मजला, एस.टी.स्टँडमागे, सातारा, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ५६, शनिवार पेठ, कराड, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०२ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.निवास गणपती पवार
मु.पो.शेरे, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नवीन प्रशासकीय इमारत चौथा मजला, एस.टी.स्टँडमागे, सातारा, जि.सातारा श्री.अरूण पांडुरंग काकडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, ५६, शनिवार पेठ, कराड, ता.कराड, जि.सातारा श्री.बी.ए.बगले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

कराड तालुक्यातील पतसंस्थांबाबतची सन १९९९ ते २००९ या काळातील वर्गीकरणासह तपशीलवार माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड, ता.करा़ड, जि.सातारा यानी ती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.निवास गणपती पवार यानी केली.

श्री.पवार यांच्या दि.३०.११.२००९ च्या अर्जाला दि.३.१२.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, करा़ड, ता.करा़ड, जि.सातारा यानी मुद्देनिहाय उत्तर दिले. कळविलेले शुल्क त्यानी भरले नाही. तसेच व्यापक स्वरूपाची व कार्यालयाच्या अभिलेखात नसलेली माहिती संकलित करून देता येणार नाही असेही स्पष्ट केले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नवीन प्रशासकीय इमारत चौथा मजला, एस.टी.स्टँडमागे, सातारा, जि.सातारा श्री.अरूण पांडुरंग काकडे यानी पूरक कागदपत्रांसह केले. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, करा़ड, ता.करा़ड, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नवीन प्रशासकीय इमारत चौथा मजला, एस.टी.स्टँडमागे, सातारा, जि.सातारा यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शब्बीर हमजेखान देसाई
मु.पो.गोटे, ता.कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
पाटण, ता.पाटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५४ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा श्री.अरूण पांडुरंग काकडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पाटण,
ता.पाटण, जि.सातारा विद्यमान-श्री.एल.टी.भोसले, तत्कालीन-श्री.पी.एम.बर्गे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि कराड जनता सहकारी बँक लि., शाखा ढेबेवाडी, ता.पाटण, जि.सातारा या बँकेकडून त्रयस्थ व्यक्तीने घेतलेल्या कर्जप्रकरणाच्या संदर्भातील माहिती अपीलकता श्री.शब्बीर हमजेखान देसाई यानी मागितली होती. माहिती देण्याबाबत बँकेला कळविले. नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असे नमूद करून बँकेने माहिती दिली. अपीलकर्त्यांना ती मिळाल्याची पोहोच दप्तरी आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पाटण, ता.पाटण, जि.सातारा श्री.पी.एम.बर्गे व विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पाटण, ता.पाटण, जि.सातारा श्री.एल.टी.भोसले यानी अपीलकर्त्यांच्या पोहोचदर्शक स्वाक्षरी असलेल्या पत्राच्या प्रतीसह नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे. त्रयस्थ व्यक्तीच्या कर्ज प्रकरणासंदर्भातील माहिती त्यांच्या संमतीशिवाय अपीलकर्त्यांना देणे योग्य नाही. तसेच श्री.भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ (रीट पिटीशन क्र.५२९४ / २००८, दि.२८.४.२००९) या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, तरीही बँकेने माहिती दिली, हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्ता सखाहरी ताड
मु.एकलास, ता.पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२४ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्ता सखाहरी ताड
मु.एकलास, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.चंद्रशेखर जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.अविनाश हरिपंत देशपांडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पंचायत समितीने खरेदी केलेल्या शेतीविषयक साहित्याबाबतची दि.३.६.२००९ च्या अर्जान्वये आपण मागितलेली माहिती अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही मिळाली नाही. दिड वर्ष उलटूनही पूर्ण माहिती दिली गेलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दत्तात्रय सखाहरी ताड यानी केली.

श्री.ताड याचा अर्ज दि.४.६.२००९ रोजी प्राप्त झाला. त्याच दिवशी तो शेती अधिकारी, पंचायत समिती पंढरपूर श्री.एस.एन.चौगुले यांच्याकडे वर्ग करण्यात आला. माहिती देण्यास विलंब झाल्यास त्याना जबाबदार धरण्यात येईल, याची स्पष्ट कल्पना त्याना देण्यात आली होती. तरीही त्यानी विहित मुदतीत माहिती न दिल्याने दि.१.७.२००९ रोजी स्मरणपत्र दिले. दंडात्मक कारवाईची, तसेच शिस्तभंगाच्या कारवाईची जाणीव त्यात दिली होती. पुन्हा दि.४.७.२००९ रोजी स्मरणपत्र देऊन विलंबाची जबाबदारी त्यांच्यावर निश्चित करण्यात येत असल्याचे कळविले. तरीही त्यानी माहिती दिली नाही. दि.२९.७.२०१० रोजी अपीलकर्त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर यांच्याकडे अपील केले. दि.१०.८.२००९ रोजी सुनावणी झाली. दि.१४.८.२००९ पर्यंत माहिती देण्याचे श्री.चौगुले यानी तेव्हा कबूल केले व दि.२१.८.२००९ रोजी त्यानी माहिती तयार केली. विलंबाबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण त्यानी दिलेले नाही. अद्यापही परिपूर्ण माहिती मिळाली नसल्याची अपीलकर्त्याची तक्रार आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.अविनाश हरिपंत देशपांडे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.चंद्रशेखर जगताप यानी श्री.चौगुले याना दिलेल्या पत्रांच्या छायाप्रतींसह केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २०० च्य कलम५(५) मधील तरतुदीनुसार शेती अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.एस.एन.चौगुले हे जन माहिती अधिकारी ठरतात. श्री.चौगुले यानी दि.२१.८.२००९ रोजी माहिती सादर केल्याचे लक्षात घेता ५० दिवस विलंबाने त्यानी कार्यवाही केली आहे. जबाबदारीची जाणीव अनेकदा देऊनही हा विलंब त्यानी केला असल्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात. तयार झाल्यानंतर देऊ केलेली माहिती न घेण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. अपीलकर्त्यास ती माहिती दिल्याचे, अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.चंद्रशेखर जगताप यानी दि.१५.११.२०१० च्या पत्रान्वये आयोगास

अवगत केले. 'सर्व माहिती मिळाली काही तक्रार नाही,' अशा अपीलकर्त्याच्या स्वाक्षरी असलेल्या निवेदनाच्यी छायाप्रत त्यानी सोबत सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) जबाबदारीची जाणीव देऊनही शेती अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.एस.एन.चौगुले यानी माहिती देण्यासाठी ५० दिवस विलंब केला असल्यामुळे ते (५०x२५०) रू.१२०५०/- शास्तीस पात्र ठरतात. ही शास्ती त्याना मार्च २०११, एप्रिल २०११ व मे २०११ मध्ये मिळणाऱ्या फेब्रुवारी २०११, मार्च २०११ व एप्रिल २०११ या महिन्यांच्या वेतनातून तीन हप्त्यांत वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर यानी करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संभाजी दत्तात्रय दिवेकर
मु. पो. वरवंड, ता. दौंड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत-वितरण कंपनी मर्या.केडगाव,
ता. दौंड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत-वितरण कंपनी मर्या.केडगाव,
ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. संभाजी दत्तात्रय दिवेकर<br>मु. पो. वरवंड, ता. दौंड, जि. पुणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

विद्युत-वितरण कंपनीने बसविलेला नवीन ट्रान्सफार्मर दोन दिवसांत जळाला. आपल्या उपविभागातील अशा सर्व डी.पी. बाबतची माहिती दि. ३०.१२.२००८ च्या अर्जान्वये आपण मागितली होती. ती दि. १६.६.२००९ रोजी मिळाली. दि. १८.६.२०१० च्या अर्जान्वये शेती पंपाच्या विज जोडणीच्या

आपल्या प्रलंबित मागणीबाबत मागितलेली माहिती मिळाली व कुठलीही तक्रार नसल्याचे आपण लिहून दिले, असे प्रतिपादन अपिलकर्ता श्री. संभाजी दत्तात्रय दिवेकर यानी केले.

धडक मोहिमेमुळे सुनावणीला उपस्थित राहता येत नसल्याचे पूर्व परवानगी घेणारे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. सोमनाथ केरबा माने व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. संतोष गंगाराम मोरे यांनी सादर केले. तसेच अपीलकर्त्यास माहिती देण्यात आल्याचे नमूद केले. तथापि त्यानी सादर केलेली कागदपत्रे लक्षात घेता अपीलकर्त्याच्या दि. ३०.१२.२००८ च्या अर्जानुसार माहिती देत असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत-वितरण कंपनी मर्या.केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. सोमनाथ केरबा माने यानी दि. १०.६.२००९ च्या पत्रान्वये म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये विहित केलेल्या ३० दिवसांच्या मुदतीपेक्षा १३२ दिवस विलंबाने कळविले आहे, असे दिसते. या विलंबाचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. सोमनाथ केरबा माने व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. संतोष गंगाराम मोरे यांनी दिलेले नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास माहिती देण्यास झालेल्या १३२ दिवसांच्या विलंबाबाबत व प्रथम अपिलावर केलेल्या कार्यवाहीबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. पी. एन. विडोलकर व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. संतोष गंगाराम मोरे यानी तारीखनिहाय खुलासा करावा. शास्तीबाबतचे म्हणणे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत-वितरण कंपनी मर्या. केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. सोमनाथ केरबा माने यानी नमूद करावे व त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अभिप्राय अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय अभियंता,

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. संतोष गंगाराम मोरे यानी द्यावा. दि. ५.३.२०११ पर्यंत यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विष्णू आनंदा माने
मु. गोटेवाडी, विसापूर, ता. तासगाव, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, तासगांव, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
पंचकोटी ग्रामपंचायत गोटेवाडी, तासगांव, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४२/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विष्णू आनंदा माने
मु. गोटेवाडी, विसापूर, ता. तासगाव, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, तासगांव, जि. सांगली श्री. संजय कृष्णा चिल्लाळ

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
पंचकोटी ग्रामपंचायत गोटेवाडी, तासगांव,
जि. सांगली श्री. पांडुरंग तुकाराम चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आपल्या वडिलोपार्जित जागेच्या नोंदीमध्ये बेकायदेशीर फेरफार करण्यात आले असून त्याची दुरुस्ती केली जात नाही. सन २०००पर्यंत आपल्या नावाची नोंद असून सन २००० मध्ये मिळकतीचे स्वयंमूल्यमापन नमुना प्रपत्र आपण भरलेले नाही व त्यावर आपण स्वाक्षरीही केलेली नाही. आपली खोटी सही करुन खोटया कागदपत्रांद्वारे फसवणूक करण्यात आली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विष्णू आनंदा माने यानी केली.

श्री. माने यानी दोन अर्जांद्वारे मागितलेली माहिती विहित मुदतीत दिली. अभिलेखानुसार कागदपत्रांच्या प्रती दिल्या. काही मुद्दयांचे स्पष्टीकरण, खुलासा अशी विचारणा त्यानी केली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकरी तथा ग्रामसेवक,पंचकोटी ग्रामपंचायत गोटेवाडी, तासगांव, जि. सांगली श्री. पांडुरंग तुकाराम चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तासगांव, जि. सांगली श्री. संजय कृष्णा चिल्लाळ यानी केले.

जागेच्या फेरफाराविषयीच्या नोंदी हा माहितीचा मूळ स्त्रोत असून त्यात बदल झाले असल्यास ते कशाच्या आधारे झाले, याची माहिती व त्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास मिळणे आवश्यक आहे. या नोंदींच्या कायदेशीरपणाची तपासणी, त्याबाबतचे स्पष्टीकरण या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाहीत. तथापि खोटया सहयांच्या आधारे माहितीच्या मूळ स्त्रोतात बदल केला आहे, ही अपीलकर्त्याची तक्रार विचारात घेऊन तसा अर्ज त्यांच्याकडून घेऊन उपरोक्त प्रपत्रातील संबंधित लेखनाच्या व सहयांच्या सत्यासत्यतेबाबत पोलिसांकडे फिर्याद नोंदवून शहानिशा करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. माने यानी दि. १.११.२०१० रोजी दिलेल्या अर्जानुसार दि. २.२.२०११ रोजी तासगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तासगांव,

जि. सांगली श्री. संजय कृष्णा चिल्लाळ  यानी दि. ३.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाहुबली कबाडगे
प्लॉट नं. ८, शिवाजी कॉलनी, अपीलकर्ता
नोमीनाथनगर, सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०३/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. बाहुबली कबाडगे
प्लॉट नं. ८, शिवाजी कॉलनी नोमीनाथनगर, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
श्री. दत्तात्रय कवितके

**जन माहिती अधिकारी** तथा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
श्री. बी. बी. वड्ड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जिल्हा पुरवठा अधिका-यांकडे मागितलेली माहिती विलंबाने, अपुरी व चुकीची मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. बाहुबली कबाडगे यानी केली.

श्री. कबाडगे यानी मागितलेल्यापैकी देय माहिती तात्काळ देण्याबाबत संबंधित लिपिक श्री. सचिन पानसांडे याना त्याच दिवशी अर्जावर शेरा मारुन निर्देश दिले होते. त्यानी पुढील कार्यवाही न केल्यामुळे अर्ज दुर्लक्षित राहिला. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीची व निर्णयाचीही लेखी अथवा तोंडी समज आपल्याला मिळालेली नव्हती. आयोगाकडील अपिलाच्या सुनावणीची सूचना मिळाल्यानंतर आपण श्री. पानसांडे यांच्याकडून मूळ संचिका मागवून घेऊन श्री. कबाडगे याना दि. २६.१०.२०१० रोजी स्पीड पोस्टाने माहिती पाठविली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी,जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. बी. बी. वड्ड यानी केले. शेरा मारुन संबंधित लिपिकास सूचना दिलेल्या अर्जाची प्रत त्यानी सादर केली.

दि. २६.१०.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. बी. बी. वड्ड यानी अपीलकर्त्यास दिलेले मुद्देनिहाय उत्तर योग्य आहे. तथापि दि. ३.४.२०१० च्या अर्जानुसार दि. २६.१०.२०१० रोजी म्हणजे ६ महिने २७ दिवस विलंबाने माहिती दिली आहे. ही बाब शास्तीस पात्र आहे. जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत संबंधित लिपिकास सूचना दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. त्या स्थितीत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (५) मधील तरतुदीनुसार संबंधित लिपिक हे जन माहिती अधिकारी ठरतात. तपासणी अंती विलंबास ते जबाबदार असल्याचे निष्पन्न झाल्यास ते शास्तीस पात्र ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची तपासणी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यानी करावी. लिपिक श्री. सचिन पानसांडे यांचे विलंबाबाबतचे व शास्तीबाबतचे लेखी म्हणणे घेऊन, तसेच तत्कालीन

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. ज्योतीबा पाटील यानी सुनावणीची पूर्वसूचना व निकालाची समज न दिल्याच्या जन माहिती अधिकारी तथा पुनर्वसन अधिकारी, जिल्हा पुनर्वसन कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री. बी. बी. वड्ड यांच्या निवेदनाबाबत तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यांचा लेखी अहवाल प्राप्त करुन घेऊन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दि. ५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सोमनाथ जगन्नाथ कांबळे
मु. पो. लासुर्णे, ता. इंदापूर, अपीलकर्ता
जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१२/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सोमनाथ जगन्नाथ कांबळे
मु. पो. लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी
श्री. डी. के. सोनटक्के

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण दि. १८.१२.२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यानी स्मरणपत्रानंतरही विहित मुदतीत दिली नाही. दिनांक २४.१२.२०१० रोजीच्या पत्रान्वये त्यानी माहिती पाठविली. अपिलीय प्राधिकारी यानी अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सोमनाथ जगन्नाथ कांबळे यानी केली.

श्री. कांबळे यांचा दि. १८.१२.२००९ चा अर्ज दि. २३.१२.२००९ रोजी आपल्या कार्यालयाला प्राप्त झाला. दि. २४.१२.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने त्याना माहिती पाठविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री. डी. के. सोनटक्के यानी सादर केले. विलंबाबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण त्यात नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यानी तीन दिवसांत लेखी खुलासा आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद डॉ. बी. एस. गायकवाड यानी दि. ३०.१२.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला.

'श्री. कांबळे यानी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळणेबाबत केलेला जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडील अर्ज, तसेच अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे केलेल्या अपिलाबाबतचा अर्ज संबंधित शाखेचे कनिष्ठ सहाय्यक श्री. आर. बी. माने यानी प्रलंबित ठेवलेला असून तो जन माहिती अधिकारी, सहाय्यक जन माहिती अधिकारी, कक्ष अधिकारी किंवा अधीक्षक यांचे निदर्शनास न आणता प्रलंबित ठेवलेला आहे. यास सर्वस्वी कनिष्ठ सहाय्यक श्री. आर. बी. माने हे जबाबदार आहेत. त्याबाबत संबंधित कनिष्ठ सहाय्यक, श्री. आर. बी. माने यानी दि. २७/१२/२०१० रोजीच्या अर्जाव्दारे मे २०१० मधील बदल्यांचे कामकाज, तसेच एप्रिल २०१० मधील भरती व इतर अनुषंगिक कामे असल्यामुळे प्रलंबित राहिलेला आहे, अशी लेखी विनंती केलेली आहे. संबंधितांविरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही अनुसरण्यात येत आहे', असे डॉ. गायकवाड यानी खुलाशात नमूद केले आहे. माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद डॉ. बी. एस. गायकवाड यानी कोणता पाठपुरावा केला व संबंधित कनिष्ठ सहाय्यक श्री. आर. बी. माने यांच्यावर कोणती प्रशासकीय कारवाई केली जात आहे, हे

त्यात स्पष्ट नाही. माहिती देण्यास झालेला विलंब शास्तीस पात्र आहे व त्याबाबतची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत कोणता पाठपुरावा केला, याचा सप्रमाण खुलासा जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद डॉ. बी. एस. गायकवाड यानी शास्तीविषयक म्हणण्यासह दि. ५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. मूळ अर्ज व प्रथम अपिलाचा अर्ज याबाबत योग्य कार्यवाही न केल्याबद्दल कनिष्ठ सहाय्यक श्री. आर. बी. माने यांच्यावर केलेल्या/करण्यात येत असलेल्या प्रशासकीय कारवाईविषयीचा अहवाल विलंब व शास्तीविषयक स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद यानी दि ५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. श्री. आर.बी.माने यांच्या शास्तीविषयक लेखी म्हणण्याचाही त्यात समावेश आवश्यक आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. समाधान सोबा होवाळ
मु. पो. संगेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(ग्रामपंचायत विभाग), जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
(ग्रामपंचायत विभाग), जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५३/२०१०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(ग्रामपंचायत विभाग), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. परमेश्वर राऊत

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
(ग्रामपंचायत विभाग), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. अर्जुन सिध्दप्पा मंगरुळे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** सौ. संगिता सिध्दाराम सुलगडले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. समाधान सोबा होवाळ यानी तत्कालीन ग्रामसेविकेबद्दलची माहिती दि. १५.४.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. आपल्या कार्यालयाच्या स्तरावरील माहिती दि. ७.५.२०१० च्या पत्रान्वये दिली. ऊर्वरित माहिती सांगोला पंचायत समितीशी संबंधित असून त्यांच्याकडून घ्यावी, असे कळविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते उपस्थित राहिले नाहीत. देऊ केलेली माहिती घेण्यास ते तयार नव्हते. आपल्या कार्यालयाकडील माहितीबरोबरच सांगोला पंचायत समितीकडील माहितीही आता प्राप्त करुन घेतली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, (ग्रामपंचायत विभाग), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. अर्जुन सिध्दप्पा मंगरुळे व अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत विभाग), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. परमेश्वर राऊत यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मंदार पद्माकर पूर्णपात्रे
फ्लॅट नं.५, २०३२, सदाशिव पेठ, अपीलकर्ता
श्रीनिवास व्हेस्टा अपार्टमेंट, पुणे -४११ ०३०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
डेक्कन कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट,
येरवडा, पुणे - ४११ ००६

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
डेक्कन कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट,
येरवडा, पुणे - ४११ ००६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५/२००९/पुणे + तक्रार क्र. ४१९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मंदार पद्माकर पूर्णपात्रे
फ्लॅट नं.५, २०३२, सदाशिव पेठ,
श्रीनिवास व्हेस्टा अपार्टमेंट, पुणे -४११ ०३०

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

डेक्कन कॉलेजने विद्या परिषदेच्या सभेचे इतिवृत्त गोपनीय असल्याचे कळविले. गोपनीय नसलेली इतिवृत्तातील माहिती देण्याचे मान्य करुनही कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन मिळाली नाही. त्याबद्दल संबंधितावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. मंदार पद्माकर पूर्णपात्रे यानी केली.

परीक्षकांची नेमणुकीची नावे, रिक्त पदे भरण्यासंदर्भातील तज्ज्ञांची नावे, व परीक्षकांनी सादर केलेले परीक्षांसंदर्भातील गोपनीय अहवाल या तीन बाबी वगळून इतिवृत्ताची प्रत देण्यास तयार असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, डेक्कन कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, येरवडा, पुणे श्री. एन. एस. गवारे यानी आयोगास कळविले होते. तसेच श्री. पूर्णपात्रे यानाही कळविल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. श्री. पूर्णपात्रे यांच्या अर्जातील अनेक मुद्दे खुलासा, स्पष्टीकरण, अभिप्राय मागणारे आहेत. (उदा.ए, बी, डी, एफ, आय). अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि देय माहिती अपीलकर्त्यास दिली गेली पाहिजे. विद्या परिषद व व्यवस्थापन परिषद यांच्या सभेच्या इतिवृत्ताबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी नमूद केलेल्या ३ बाबींची गोपनीयता योग्य असून त्याव्यतिरिक्तची इतिवृत्ताची प्रत अपीलकर्त्यास दिली गेली पाहिजे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज व अपीलावरील कार्यवाही अधिनियमात नमूद केलेल्या तरतुदीनुसार झाली पाहिजे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, डेक्कन कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, येरवडा, पुणे श्री. एन.एस. गवारे व अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, डेक्कन कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, येरवडा, पुणे डॉ. व्ही.एस.शिंदे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील क्र. ९५/२००९/पुणे व तक्रार क्र. ४१९/२००९/पुणे निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. मंदार पद्माकर पूर्णपात्रे यांच्या अर्जातील देय माहिती व विद्या परिषदेच्या

बैठकीतील वर नमूद केलेल्या ३ गोपनीय बाबी वगळता अन्य इतिवृत्ताची प्रत जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, डेक्कन कॉलेज, पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, येरवडा, पुणे श्री. एन.एस.गवारे यानी अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी व अनुपालन अहवाल दि. ५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सचिन जगन्नाथ पोवार
२४/१५९, दत्तनगर, शहापूर, इचलकरंजी, अपीलकर्ता
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, हातकणंगले यांचे कार्यालय,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक,
उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१०/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, हातकणंगले यांचे कार्यालय,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. धनाजी रा. पोवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

बाजी प्रभु नागरी सहकारी पतसंस्थेतील भविष्य निर्वाह निधीची रक्कम न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री. सचिन जगन्नाथ पोवार यानी तक्रार व माहितीची मागणी संस्थेकडे केली होती. भविष्य निर्वाह निधीची रक्कम परत मिळाली असल्यामुळे संस्थेविरुध्दची तक्रार मागे घेत असल्याचे निवेदन दि. २८.१.२०१० रोजी अपीलकर्त्याने दिले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक सहकारी संस्था, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. बी.एस. पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांचे कार्यालय, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. दिनेश अ. चंदेल यानी अपीलकर्त्यांच्या पत्राच्या छायाप्रतीसह लेखी नमूद केले. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १७ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवलिंग तुकाराम कटारे
उज्वल हौसिंग सोसायटी अंतर्गत पेठ सोलापूर, ३ मोरारजी पेठ, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, अक्कलकोट,
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६६ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवलिंग तुकाराम कटारे
उज्वल हौसिंग सोसायटी अंतर्गत पेठ सोलापूर, ३ मोरारजी पेठ, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर
विद्यमान-श्री.ए.एस.खाडे, तत्कालीन-श्री.आर.एस.माळी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या शेताच्या जमीन सपाटीकरणाच्या संदर्भात आपण केलेल्या माहिती-मागणी अर्जाला जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यानी उत्तर दिले नाही. जवळजवळ १४ महिने उलटून गेल्यानंतरही परिपूर्ण माहिती दिली नाही. आयोगापुढील सुनावणीची सूचना प्राप्त झाल्यानंतर, काल काही माहिती आणून दिली. अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यानी अपिलाची व स्मरणपत्राचीही दखल घेतली नाही. म्हणून त्यांच्या वरिष्ठांकडे केलेल्या तक्रारीचीही दखल घेतली गेली नाही. माहिती मागितली तेव्हा संबंधित काम चालू असल्यामुळे त्वरित माहिती देणे शक्य होते. परंतु तसे न करणे संशयाला वाव देणारे आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.शिवलिंगप्पा तुकाराम कटारे यानी केले.

माहिती देण्यास विलंब झाल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.आर.एस.माळी यानी मान्य केले. माहितीचे स्वरूप पाहता सहजगत्या उपलब्ध असणारी व मर्यादित पृष्ठसंख्येची अशी ही माहिती असून ती देण्यास विलंब होण्याचे कोणतेही कारण दिसत नाही व त्याबाबतचे स्पष्टीकरण तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.आर.एस.माळी देऊ शकले नाहीत. दि.५.६.२००९ च्या अर्जानुसार दि.११.११.२०१० रोजी त्यानी माहिती दिली आहे. हे लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.आर.एस.माळी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० मधील तरतुदीनुसार शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास माहिती देण्यास एक वर्षाहून अधिक काळ विलंब झाला असून त्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,

अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.आर.एस.माळी याना रू.२५००० शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती त्याना एप्रिल २०११, मे २०११, जून २०११, जुलै २०११ व ऑगस्ट २०११ मध्ये मिळणाऱ्या मार्च २०११ व एप्रिल २०११, मे २०११, जून २०११ व जुलै २०११ या महिन्यांच्या वेतनातून पाच हप्त्यांत वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यानी करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) प्रथम अपिलाची दखल न घेतल्याबद्दल व अपीलकर्त्यास माहिती प्राप्त करून देण्याची दक्षता न घेतल्याबद्दल तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.एस.व्ही.जोशी याना समज देण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.शकुंतला शांताराम दहितुले
मु.पो.वडगाव-कांदळी, ता.जुन्नर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर, जि.अहमदनगर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री भगवान माध्यमिक व उच्च
माध्यमिक विद्यालय बालमटाकळी, ता.शेवगाव, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७ ५४+२७५५+१७६५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.शकुंतला शांताराम दहितुले
मु.पो.वडगाव-कांदळी, ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर, जि.अहमदनगर श्री.गोविंद बाबू खुरंगे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री भगवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय
बालमटाकळी, ता.शेवगाव, जि.अहमदनगर श्री.रमेश बाजीराव कांजुणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आपल्या सेवानिवृत्तीशी संबंधित अशी माहिती श्री रंगदासस्वामी शिक्षण विकास मंडळ संचलित श्री भगवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बालमटाकळी, ता.शेवगाव, जि.अहमदनगर या शाळेकडून, तसेच अहमदनगर जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयाकडूनही वारंवार मागणी करूनही दिली जात नाही. राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त काही मुद्दयांची चर्चा झाली. परंतु दोन-तीन वर्षे होऊनही शुल्क कळविले जाते व परिपूर्ण माहिती दिली जात नाही. शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून कबूल करूनही माहिती न दिल्यामुळे व आपल्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्यामुळे गेली चार वर्षे आपल्याला सेवानिवृत्तीच्या व आर्थिक लाभापासून वंचित रहावे लागले आहे, अशी तक्रार अपीलकर्त्या सौ.शकुंतला शांताराम दहितुले यानी केली.

संपूर्ण पगारबिलाच्या प्रती, शाळा समितीचे इतिवृत्त, त्यांच्या स्वतःच्या रजा, बदली इ. संदर्भातील विस्तृत स्वरूपाची माहिती श्रीमती दहितुले विविध अर्जांद्वारे सातत्याने मागत असतात. दोन अर्जांनुसार कळविलेले शुल्क त्यानी भरलेले नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री भगवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बालमटाकळी, ता.शेवगाव, जि.अहमदनगर श्री.रमेश बाजीराव कांजुणे यानी केले.

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर, जि.अहमदनगर श्री.अनिल सदावर्ते हे सेवानिवृत्त झाले असून माहिती व अपिलावरील कार्यवाहीबाबतचा तपशील संचिकेत आढळत नाही, असे निवेदन विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर, जि.अहमदनगर श्री.गोविंद बाबू खुरंगे यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्या सौ.शकुंतला शांताराम दहितुले व श्री रंगदासस्वामी शिक्षण विकास मंडळ यांच्यात वाद व परस्परांवर आरोप-प्रत्यारोप असल्याचे दिसून येते. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विचाराची नाही. तथापि अभिलेखातील माहिती अपीलकर्त्यांना मिळाली पाहिजे. शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या कार्यालयात याची संचिकाच उपलब्ध न होणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत संबंधित कार्यालयात अनास्था असल्याची निदर्शक आहे.

त्याबाबत दक्षता घेण्याची समज अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर, जि.अहमदनगर श्री.गोविंद बाबू खुरंगे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) अपीलकर्त्या सौ.शकुंतला शांताराम दहितुले व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री भगवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बालमटाकळी, ता.शेवगाव, जि.अहमदनगर याना एकत्र आणून शिक्षणाधिकारी कार्यालयातील तसेच श्री रंगदासस्वामी शिक्षण विकास मंडळ या संस्थेकडील संबंधित अभिलेखांचे अवलोकन करू देण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर, जि.अहमदनगर यानी करावी, अपीलकर्त्यांच्या लेखी मागणीनुसार हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून पुरवाव्यात व दि.५.३.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.परमेश्वर दत्तात्रय तळेकर
मु.पो.केम, ता.करमाळा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी, बाशी, ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३७ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बाशी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.सुधाकर किशनराव दरबस्तवार | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शेतीपंपासाठी दिलेल्या वीज जोडणीच्या संदर्भातील माहिती अपूर्ण व विलंबाने मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.परमेश्वर दत्तात्रय तळेकर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.तळेकर यानी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. अपुरा कर्मचारी वर्ग, वीज पुरवठाविषयक तातडीची कामे व माहितीचे विस्तृत स्वरूप यामुळे माहिती देण्यास विलंब झाल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर यानी प्रथम अपिलाच्या सुनावणीत नमूद केले व त्यावेळी काही माहिती दिली. तथापि ती अपूर्ण असल्याची अपीलकर्ता यांची तक्रार असल्यामुळे परिपूर्ण माहिती देण्याचे आदेश दिले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता केली, असे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.सुधाकर किशनराव दरबस्तवार यानी नमूद केले.

माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर यानी दहा दिवसांत खुलासा सादर करावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले, परंतु त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी कार्यवाही केली नाही. त्याबाबत स्मरण दिल्यानंतर दि.३०.११.२०१० च्या पत्रान्वये त्यानी खुलासा सादर केला. अपुरा कर्मचारी वर्ग व तातडीची कामे यामुळे, तसेच विस्तृत व संदिग्ध स्वरूपाची माहितीची मागणी असल्यामुळे माहिती संकलित करण्यास विलंब लागेल याची कल्पना अपीलकर्त्यास दिली होती. दर वेळी ते विस्तृत स्वरूपाची माहिती मागत असतात, असे प्रतिपादन खुलाशात केले असून विलंब क्षमापित करण्याची विनंती केली आहे.

दि.३०.६.२००९ च्या अर्जानुसार दि.२४.९.२००९ रोजी पूर्ण माहिती दिली असल्याचे उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यावरून दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.पी.एस.जोशी यांच्या खुलाशातील कारणे लक्षात घेऊनही विलंबाचा पूर्ण कालावधी क्षमापित करण्यासाठी समर्थनीय नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.पी.एस.जोशी यानी

दि.३०.६.२००९ च्या अर्जावर प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दि.२४.९.२००९ रोजी माहिती दिली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील ३० दिवसांची विहित मुदत वजा जाता ५४ दिवस विलंब झाला आहे. श्री.जोशी यानी नमूद केलेली कारणे लक्षात घेऊन त्यातील ३० दिवस क्षमापित करण्यात येत असून ऊर्वरित २४ दिवसांसाठी श्री.जोशी याना प्रतिदिन रूपये २५०/- प्रमाणे रूपये ५३००/- शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती त्याना एप्रिल २०११ व मे २०११ मध्ये मिळणाऱ्या मार्च २०११ व एप्रिल २०११ या महिन्यांच्या वेतनातून दोन हप्त्यांत वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बाशी, ता.बार्शी, जि.सोलापूर यानी करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीकांत विनायक ढोले
४५, गिरीजा सोसायटी, एम. आय. टी. जवळ, अपीलकर्ता
कोथरुड, पुणे ४११ ०३८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह निबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग,पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग,पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह निबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग,पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. सुनिल पवार

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग,पुणे यांचे कार्यालय,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. विनायक विठ्ठलराव कोकरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

वैदही सहकारी गृहरचना संस्थेविरुध्दच्या तक्रारी संदर्भात तत्कालीन विभागीय उपनिबंधक, सह संस्था, पुणे शहर (१) श्री. विनायक कोकरे यानी केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यासाठी अपीलकर्ता श्री. श्रीकांत विनायक ढोले यानी परवानगी मागितली होती. ती नाकारल्याबाबत त्यानी विचारणा केल्यानुसार माहिती दिली. तसेच श्री. विनायक कोकरे, श्री.सुनिल देशमुख, व श्री. जाधव यांच्या विरुध्दच्या तक्रारी अपु-या माहितीमुळे होत्या. 'त्याचे निरसन झाले आहे म्हणून त्याबाबत कोणतीही तक्रार उरलेली नाही',असे अपीलकर्ता व त्यांचे वकील यानी दि. १७.९.२०१० रोजी लेखी दिले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग,पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. विनायक विठ्ठलराव कोकरे व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. सुनिल पवार यांनी उपरोक्त पत्राच्या प्रतीसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय दिनानाथ साळी
वृंदावन हौसिंग कॉम्प्लेंक्स, सेक्टर डी, अपीलकर्ता
फ्लॅट बी- १३, पौड रोड, कोथरुड, पुणे- ४११ ०३८.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
सेंट्रल बिल्डिंग, पुणे - ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
सेंट्रल बिल्डिंग, पुणे - ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**विद्यमान अपिलीय प्राधिकारी** तथा अपर निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
सेंट्रल बिल्डिंग, पुणे श्री. डी. ए. चौगुले

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,
सेंट्रल बिल्डिंग, पुणे श्री. विलास राजाराम काटकर

| | |
|---|---|
| | **तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. सदानंद क. वुईके |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय दिनानाथ साळी यानी नमूद केलेला माहिती-मागणीचा अर्ज आपल्या कार्यालयाला मिळाला नसल्याचे त्यांच्या प्रथम अपिलानंतर तपासणी केल्यावर निष्पन्न झाले. तसे नमूद करुन त्यांचा प्रथम अपिलाचा अर्ज परत पाठविण्यात आला, असे जन माहिती अधिकारी तथा निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डिंग, पुणे श्री. विलास राजाराम काटकर व अपिलीय प्राधिकारी तथा निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डिंग, पुणे श्री. डी. ए. चौगुले यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

अपीलकर्त्यांच्या दि. २१.४.२००९ रोजीच्या अपिलावरील निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, सेंट्रल बिल्डिंग, पुणे श्री.डी. ए. चौगुले यानी दि. २५.९.२००९ च्या पत्रान्वये कळविल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या मुदतीत प्रथम अपिलावर कार्यवाही होणे आवश्यक असल्याची समज तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. श्रीराम डी. मून याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सोनेश्वर प्रभाकर भिडे
जी-१, शत्रुंजय को-ऑप.हौसिंग सोसायटी लि. — अपीलकर्ता
४७५/सी, महर्षीनगर, पुणेक ४११ ०३७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सोनेश्वर प्रभाकर भिडे
जी-१, शत्रुंजय को-ऑप.हौसिंग सोसायटी लि.
४७५/सी, महर्षीनगर, पुणे ४११ ०३७

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे श्री. महावीर माने

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

|   |   |
|---|---|
|   | १७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे श्री. एस.एन.पांढरे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या पाल्याच्या पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परिक्षा, २००९ मध्ये उत्तरपत्रिकांच्या प्रती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नाकारल्या. त्या मिळाव्यात अशी मागणी अपीलकर्ता श्री. सोनेश्वर प्रभाकर भिडे यानी केली.

तपासलेल्या उत्तरपत्रिका या गोपनीय असून त्याच्या सत्यप्रती देऊ नयेत असा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा निर्णय आहे. विविध न्यायालयांनी व केंद्रीय, तसेच राज्य माहिती आयोगाने दिलेले निकालही त्यावर शिक्कामोर्तब करणारे आहेत. शिष्यवृत्ती परीक्षांना बसणा-या विद्यार्थ्यांची मोठी संख्या लक्षात घेऊन मर्यादित यंत्रणेमध्ये उत्तरपत्रिकांच्या प्रतीसारखी मागणी पुरविता येणार नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे श्री. एस.एन.पांढरे व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे श्री. महावीर माने यांनी केले. अपील क्र. ३९७/पुणे मध्ये दि. ५.७.२००८ रोजी आयोगाच्या पुणे खंडपीठाने अशाच संदर्भात निर्णय दिला असून अपील फेटाळले असल्याचे त्यानी नमूद केले. वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. बाळकृष्ण दत्तात्रय दसरे
आशिर्वाद बंगला, प्लॉट नं. ३, अपीलकर्ता
वैदेही सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
एम. आय. टी. जवळ, कोथरुड, पुणे ४११ ०३८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (१), ५८२ डी गुलटेकडी,
मार्केटयार्ड, पुणे - ४११ ०३७.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे<br>यांचे प्रतिनिधी श्री. विजयसिंह गवळी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, पुणे शहर (१), ५८२ डी गुलटेकडी,<br>मार्केटयार्ड, पुणे श्री. किरण अ. सोनवणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## **विवेचन**

वैदेही सहकारी गृहरचना संस्थेवरील प्रशासक नियुक्ती व प्रशासकांना कागदपत्रे देण्याच्या आदेशासंदर्भात अपीलकर्ता डॉ. बाळकृष्ण दत्तात्रय दसरे यानी मागितलेली माहिती विहित मुदतीत दिली. तसेच प्रशासक नियुक्तीचा आदेशही आता रद्द झाला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१), ५८२ डी गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे श्री. किरण अ. सोनवणे यानी केले. माहिती बाबत त्यानी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. सुजाता संजय कचरे
मु. खंडाळा गावठाण, पो. खंडाळा, अपीलकर्ता
ता. मावळ, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा धर्मादाय उप आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
वाडीया कॉलेज समोर, ४५-२,
कै. बाळकृष्ण सखाराम ढोले-पाटील मार्ग, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
वाडीया कॉलेज समोर, ४५-२,
कै. बाळकृष्ण सखाराम ढोले-पाटील मार्ग, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७६/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. सुजाता संजय कचरे
मु. खंडाळा गावठाण, पो. खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,

| | |
|---|---|
| | सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,<br>वाडीया कॉलेज समोर, ४५-२,<br>कै. बाळकृष्ण सखाराम ढोले-पाटील मार्ग, पुणे श्री. सी.ए.पाटील |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या मागणीनुसार माहिती मिळाली असून तक्रार राहिलेली नाही, असे निवेदन अपीलकर्त्या सौ. सुजाता संजय कचरे यानी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विवेक गोविंद हिंगे
समृध्दी कॉम्प्लेक्स, सराई पेठ, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे -४११ ००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे -४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विवेक गोविंद हिंगे
समृध्दी कॉम्प्लेक्स, सराई पेठ, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे श्री.महावीर माने

**जन माहिती अधिकारी** तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे श्री.एस.एन.पांढरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्राथमिक शिक्षण सेवक भरतीपूर्व केंद्रिय निवड परीक्षेतील आपल्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत आपण मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे यानी काही माहिती दिली परंतु उत्तरपत्रिका गोपनीय असल्याच्या कारणावरून प्रत नाकारली. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण मंडळ एका विषयाच्या उत्तरपत्रिकेच्या प्रतीसाठी ५०० रूपये शुल्क आकारून उत्तरपत्रिकेच्या प्रती देते. त्याचप्रमाणे योग्य ते शुल्क आकारून महाराष्ट्र राज परीक्षा परिषदेनेही उत्तरपत्रिकांच्या प्रती द्याव्यात, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विवेक गोविंद हिंगे यानी केली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेतल्या जाणाऱ्या सुमारे वीस परीक्षांना अंदाजे तीस लाख विद्यार्थी / उमेदवार बसतात. परिषदेकडे स्वतंत्र इमारत नाही व अत्यंत अपुरा कर्मचारीवर्ग आहे. तसेच उत्तरपत्रिकेच्या प्रती न देण्याचा परिषदेच्या तदर्थ समितीचा निर्णय आहे. त्यामुळे श्री.हिंगे याना तसे उत्तर दिले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे श्री.एस.एन.पांढरे यानी केले.

परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची/उमेदवारांची संख्या लक्षात घेता उत्तरपत्रिकांच्या प्रती दिल्या जात नाहीत. तथापि या संदर्भातील वारंवार होणाऱ्या मागणीचा विषय परीक्षा परिषदेच्या विचाराधीन आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे श्री.महावीर माने यानी केले.

प्राथमिक शिक्षण सेवकांची भरती हा सार्वजनिक हिताचा व सार्वजनिक सेवक नियुक्तीचा विषय आहे. त्याबाबतची परीक्षा पध्दतीही पारदर्शक असली पाहिजे. वस्तुतः अशा परीक्षेतील सर्व उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांसह सर्व तपशील सर्वांना उपलब्ध असला पाहिजे. परंतु त्याची व्यापकता, त्यातून उद्‌भवू शकणाऱ्या अनेक प्रश्नांची गुंतागुंत व यंत्रणेची उपलब्धता आदि संदर्भ लक्षात घेता ते बंधनकारक मानले नाही, तरी संबंधित विद्यार्थ्याला/उमेदवाराला त्याच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकेची प्रत दिली गेली पाहिजे. तपासलेल्या उत्तरपत्रिकेबाबतचे स्पष्टीकरण, पुनर्मूल्यांकन या मागण्यांचा त्यात समावेश होत नाही व विचार करता येणार नाही. तसेच गोपनीयतेच्या व विश्वासाश्रित संबंधाच्या कारणामुळे उत्तरपत्रिका तपासणाऱ्यांची ओळख पटेल असा कोणताही तपशील दिला जाता कामा नये.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.विवेक गोविंद हिंगे याना प्राथमिक शिक्षणसेवक भरतीपूर्व केंद्रिय निवड परीक्षा-२०१० या परीक्षेतील त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत योग्य ते शुल्क आकारून जन माहिती अधिकारी तथा उपायुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे यानी पुरवावी व अनुपालन अहवाल दि.५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आण्णासोा पांडुरंग सुर्यवंशी
मु. पो. लासुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह संचालक,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी कार्यकारी संचालक,
श्री छत्रपती शिवाजी साखर कारखाना लि.
भवानीनगर, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह संचालक,<br>साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. डी. आर. घोडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी कार्यकारी संचालक,<br>श्री छत्रपती शिवाजी साखर कारखाना लि.<br>भवानीनगर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. अशोक नारायण मोरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री. आण्णासोा पांडुरंग सुर्यवंशी यानी सन २००१ पासूनची विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. ती संकलित करुन देण्यास विलंब झाला. सर्व माहिती दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी कार्यकारी संचालक, श्री छत्रपती शिवाजी साखर कारखाना लि. भवानीनगर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. अशोक नारायण मोरे यानी माहितीच्या प्रतींसह केले. अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सह संचालक, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. डी. आर. घोडे यानी त्याला दुजोरा दिला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती सीमा शास्त्री
१०/४२५, शास्त्री भवन, खलासी लाईन, — अपीलकर्ता
कानपूर (उत्तर प्रदेश)

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून हॉस्पिटल, पुणे -४११ ००१.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
ससून हॉस्पिटल, पुणे-४११ ००१.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,<br>ससून हॉस्पिटल, पुणे डॉ. रेणू भारव्दाज<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,<br>ससून हॉस्पिटल, पुणे श्री. रमेश एन. जगताप | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती सीमा शास्त्री यानी पतीच्या मरणोत्तर तपासणी अहवालाची माहिती मागितली होती. न्यायवैद्यकविषयक प्रकरण असल्यामुळे असे अहवाल तपासासाठी पोलिसांकडेच पाठविले जातात. पोलिसांकडूनच त्याची मागणी करणे योग्य ठरेल असे त्याना विहित मुदतीत कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, ससून हॉस्पिटल, पुणे श्री. रमेश एन. जगताप व अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून हॉस्पिटल, पुणे डॉ. रेणू भारव्दाज यांनी पूरक कागदपत्रांसह केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.गोपाळकृष्ण तुकाराम धोपाडे
कामधेनु, घर नं.८१७/३ ए, **अपीलकर्ता**
प्लॉट नं.४, बळवंतराव मराठे हायस्कूल जवळ,
शिवाजीनगर, मिरज, जि.सांगली-४१६ ४१०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९०/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मिरज शहरातील सि.स.नं.४१७३/१-अ व ४१७३/१-ब मधील धोकादायक इमारतीसंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.गोपाळकृष्ण तुकाराम धोपाडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

इमारत धोकादायक झाल्याबद्दलचे पत्र आपल्याऐवजी अन्य व्यक्तीला दिले. त्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीची धारिका हरविली असल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यानी दिले. आठ दिवसांत कार्यवाही करुन अहवाल देण्याबाबत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेश देऊनदेखील मला अद्याप माहिती दिलेली नाही. नगररचनाकार यांच्याकडे दिलेले नकाशे परत मिळावे परवानगी दिलेली असताना त्याची प्रत उपलब्ध करुन न दिल्यामुळे रु.२५०००/- विकास शुल्क भरावे लागले, ते परत मिळण्यासाठी सदरची कागदपत्रे आवश्यक आहेत, असे अपीलकर्ता श्री.धोपाडे यानी सांगितले.

अपीलकर्त्यानी मागणी केलेली कागदपत्रे ही सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका अस्तित्वात येण्यापूर्वीची मिरज नगरपालिकेतील असून ती सापडत नाहीत. अपीलकर्ता म्हणतात तशी नोटीस दिलेली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांचे प्रतिनिधी श्री.आर.व्ही.काकडे, प्रभारी नगररचनाकार व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांचे प्रतिनिधी श्री.वाय.बी.माळी, अतिरिक्त आयुक्त यानी केले. अपीलकर्त्याने मागणी केल्याप्रमाणे मुद्देनिहाय खुलासा व बांधकाम परवाना इ.उपलब्ध असणारी माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली आहे, असे त्यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रमेश पांडुरंग जाधव
जुना समडोळी रोड, अमर महाराष्ट्र चौक, **अपीलकर्ता**
सांगलीवाडी, ता.मिरज, जि.सांगली-४१६ ४१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण संचालक (उच्च शिक्षण),**
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
डेक्कन एज्युकेशन सोसायटी,
फर्ग्युसन कॉलेज आवार, पुणे-४११ ००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३७/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे या संस्थेच्या संलग्न शाळा व महाविद्यालयामध्ये नेमणूक केलेल्या तृतीय श्रेणीतील कर्मचाऱ्यांची नावे व शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.रमेश पांडुरंग जाधव यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीस अपीलकर्ता श्री.जाधव हे अनुपस्थित होते.

संस्थेत भरती केलेल्या उमेदवारांच्या व्यावसायिक पात्रतेबाबतची माहिती अर्जदाराने मागितली आहे. तथापि स्टँडर्ड कोड प्रमाणे व्यावसायिक पात्रता घेणे गरजेचे नाही, असे अपीलकर्त्यास कळविले आहे. श्री.जाधव यानी आत्तापर्यंत या संदर्भात चार माहिती-मागणी अर्ज केलेले असून केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने ते अर्ज करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे यांच्या प्रतिनिधी श्रीमती सुरेखा कुलकर्णी यानी केले.

सन २००२ ते २००८ या कालावधीमध्ये संस्थेने भरती केलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची यादी अपीलकर्त्यास दिलेली आहे. परंतु अन्य कागदपत्रे दिलेली नसल्याने अपीलकर्ता श्री.जाधव यानी संस्थेच्या अध्यक्षांकडे अपील करणे आवश्ययक होते. तथापि त्यानी तसे न करता शिक्षण संचालनालयाकडे अपील केले आहे. संस्थेवर कारवाई करण्याची अपीलकर्त्याची मागणी असून ते अधिकार शिक्षण खात्याला नसून धर्मादाय आयुक्तांना आहेत, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.ए.डी.गावडे, प्रशासन अधिकारी यानी केले.

वरील निवेदन व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुभाष व्रजलाल व्होरा
द्वारा ॲड.बाळासाहेब मधुकर पाटील **अपीलकर्ता**
१५३६, शकुंतला निवास, गणेशनगर,
सांगली-४१६४१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था,आटपाडी,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३०/सांगली |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.सुभाष व्रजलाल व्होरा यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. माणगंगा सहकारी साखर कारखान्याच्या खात्यात सन २००१-२००७ या कालावधीत जमा करण्यात आलेल्या धनादेशांची सविस्तर माहिती, रजिस्टरचा उतारा इ. आवश्यक असणारी माहिती न देताच माझा अर्ज निकाली काढला. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम

६ (३) अन्वये माहिती-मागणी अर्ज संबंधितांकडे हस्तांतरित करणे आवश्यक असताना तसे केले नाही केवळ संबंधितांकडे संपर्क साधा असे कळविले, असे अपीलकर्त्याच्या वतीने ॲड.बाळासाहेब मधुकर पाटील यानी सुनावणीच्या वेळी सांगितले.

अपीलकर्ता श्री.व्होरा याना आवश्यक असणारी माहिती ही सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व माणगंगा सहकारी साखर कारखाना मर्यादित, सोनारसिध्दनगर, ता.आटपाडी, जि.सांगली यांच्याशी संबंधित असल्यामुळे अपीलकर्त्याने माहिती-मागणी अर्ज संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे करणे आवश्यक आहे, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आटपाडी, जि.सांगली यानी दि.१५.५.२००८ च्या पत्रान्वये कळविले, ते सेवानिवृत्त झाले आहेत, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्य्क निबंधक, सहकारी संस्था, आटपाडी, जि.सांगली श्री.एच.के.गायकवाड यानी सांगितले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (३) अन्वये माहिती-मागणी अर्ज संबंधित 'सार्वजनिक प्राधिकरणा'तील जन माहिती अधिकाऱ्यांकडे ५ दिवसांत हस्तांतरित करणे बंधनकारक असून त्यानुसार कार्यवाही न केल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,आटपाडी, जि.सांगली श्री.एम.डी.ढाणे याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.स्वप्नील हनुमंत पवार
मु.चिंचोली, पो.पांढरी, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.उस्मानाबाद उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, मूकबधीर निवासी शाळा, परांडा,
ता.परांडा, जि.उस्मानाबाद

(२)**जन माहिती अधिकारी** तथा मतिमंद निवासी शाळा, परांडा,
ता.परांडा, जि.उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०६ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.स्वप्नील हनुमंत पवार
मु.चिंचोली, पो.पांढरी, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.उस्मानाबाद
प्रतिनिधी श्री.युवराज श्रीधर भोसले

(१)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, मूकबधीर निवासी शाळा, परांडा,
ता.परांडा, जि.उस्मानाबाद श्री.अनिल मोहन भोकरे

| | |
|---|---|
| (२)**जन माहिती अधिकारी** तथा मतिमंद निवासी शाळा, परांडा,<br>ता.परांडा, जि.उस्मानाबाद श्री.सुधीर नेताजी जगताप | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मूकबधीर व मतिमंद निवासी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांच्या नाव-पत्त्यांसह अनुदान आदिबाबतची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मूकबधीर निवासी शाळा, परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद श्री.अनिल मोहन भोकरे व मतिमंद निवासी शाळा, परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद श्री.सुधीर नेताजी जगताप यांच्याकडे मागितली होती. अद्यापपर्यंत ती दिलेली नाही, उलट शाळेच्या संस्थापकांनी आपल्याला दमदाटी केली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.स्वप्नील हनुमंत पवार यानी केली.

श्री.पवार याना आतापर्यंत तीन वेळा माहिती दिली आहे. माहितीची पोहोच ते देत नाहीत. रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली असूनही अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जि.उस्मानाबाद यानी विचारणा केल्यामुळे त्यांच्याकडेही दोन वेळा रजिस्टर्ड टपालाने माहिती सादर केली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मूकबधीर निवासी शाळा, परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद श्री.अनिल मोहन भोकरे व मतिमंद निवासी शाळा, परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद श्री.सुधीर नेताजी जगताप यानी रजिस्टर्ड टपालाच्या पावत्यांसह केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मूकबधीर निवासी शाळा, परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद व मतिमंद निवासी शाळा, परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद यांचे निवेदन व सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे दिसते. अपीलकर्त्यास आणखी माहिती हवी असल्यास त्याबातची मागणी लेखी करून छायांकित प्रतींचे योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येईल. मात्र विद्यार्थी/विद्यार्थिनी व पालक यांचे निवासी पत्ते यासारखा व्यक्तिगत तपशील जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मूकबधीर निवासी शाळा, परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद व मतिमंद निवासी शाळा, परांडा, ता.परांडा, जि.उस्मानाबाद यानी देऊ नयेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.गुणाजी ज्ञानदेव चव्हाण
मारुती पॅलेस, हॉटेल प्रकाशचे पाठीमागे, **अपीलकर्ता**
विश्रामबाग, सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमि संपादन अधिकारी,**
क्र.१२, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५७/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे जयसिंगपूर, ता.शिरोळ येथील रि.स.नं.१५४/१-अ व १५४/२-अ ची जमीन संपादनाच्या संदर्भातील एकूण ४ मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.गुणाजी ज्ञानदेव चव्हाण यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे विचारात घेता ध्अपीलकर्त्यास उपलब्ध असणारी माहिती देण्यात आलेली आहे. अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती ही सन १९८० सालातील सदर माहितीशी संबंधित असणारे विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१४, कोल्हापूर

यांचे कार्यालय बंद झाले असल्याने सदर माहिती उपलब्ध होत नाहीङ, असे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, कोल्हापूर यानी दि.२२.६.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. सदरचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.इम्तियाज अक्कलकोटकर
९-अ, सिरतनगर सिव्हिल लाईन, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

प्रस्तुत अपिलाची सुनावणी दि.२३.६.२०१० व दि.१२.११.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. दोन्ही वेळा अपीलकर्ता श्री.इम्तियाज अक्कलकोटकर अनुपस्थित होते. त्यानी मागितलेली माहिती प्राथमिक शिक्षण विभागाकडील असल्याचे उपस्थित अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर यानी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी दि.१०.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दाजीसाहेब प्रतापराव कोकाटे
मु.पो.तांबोळी, ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहोळ, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तांबोळे,
ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७८ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.दाजीसाहेब प्रतापराव कोकाटे<br>मु.पो.तांबोळी, ता.मोहोळ, जि.सोलापूर | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

जानेवारी २००३ ते २००८ या कालावधीतील ग्रामपंचायतीने केलेल्या विकास कामांची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तांबोळे, ता.मोहोळ, जि.सोलापूर यानी दिली नाही व त्याबाबत आपल्याला काहीही कळविले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दाजीसाहेब प्रतापराव कोकाटे यानी केली.

न्यायालयातील उपस्थिती व ग्रामपंचायत निवडणूक यामुळे सुनावणीला उपस्थित राहता येत नसल्याचे कळवून जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तांबोळे, ता.मोहोळ, जि.सोलापूर यानी आयोगाच्या पूर्वपरवानगीने लेखी निवेदन सादर केले. माहिती तयार असून अपीलकर्त्यास लेखी कळवूनही त्यानी ती नेली नाही. आजही माहिती विनाशुल्क देण्यास तयार आहे, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तांबोळे, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.एन.एम.कुलकर्णी यानी निवेदनात म्हटले आहे.

अपीलकर्त्यांनी पाच वर्षांचा कालावधी नमूद करून मोघम स्वरूपात माहितीची-मागणी केली आहे. आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची लेखी मागणी करून त्याना माहिती प्राप्त करून घेता येईल. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तांबोळे, ता.मोहोळ, जि.सोलापूर यानी त्यांना असे अवलोकन करू द्यावे व २५ पृष्ठांपर्यंतची माहिती निःशुल्क व त्याहून अधिक माहिती हवी असल्यास योग्य ते शुल्क आकारून द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मुल्ला साजीद गुलाम दस्तगीर — अपीलकर्ता
कसबा ९८७, मुल्लागल्ली ता. बार्शी, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
जात पडताळणी समिती, सोलापूर
जानकी हॉल पाठीमागे, स्वारगेट, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
जात पडताळणी समिती, सोलापूर
जानकी हॉल पाठीमागे, स्वारगेट, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७०८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मुल्ला साजीद गुलाम दस्तगीर
कसबा ९८७, मुल्लागल्ली ता. बार्शी, जि. सोलापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या भावकीतील एका व्यक्तीच्या जात पडताळणीची व त्याविषयीच्या कागदपत्रांची माहिती जन माहिती अधिका-यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मुल्ला साजीद गुलाम दस्तगीर यानी केली.

त्रयस्थ व्यक्तीच्या जात पडताळणी विषयीची माहिती अपीलकर्ता यानी मागितली असून त्यात कोणतेही सार्वजनिक हित सामावलेले नाही. अशा स्थितीत त्रयस्थ पक्षाची व्यक्तिगत माहिती अपीलकर्त्यास न देण्याची जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, जात पडताळणी समिती, सोलापूर जानकी हॉल पाठीमागे, स्वारगेट, पुणे श्री. दिपक रावसाहेब वडकुते यांची कृती योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- १८ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पांडुरंग दत्तात्रय थिटे
मु. पो. केंदूर, ता. शिरुर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०३/२०१०/पुणे + १६१८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/७/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. पांडुरंग दत्तात्रय थिटे<br>मु. पो. केंदूर, ता. शिरुर, जि. पुणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

केंदूरच्या प्राथमिक केंद्र शाळेतील बांधकाम, शासकीय निधी /लोक वर्गणीचा वापर व त्यामधील अपहार याबद्दल श्री. भाऊसाहेब गावडे यानी केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन दिली जात नाही.

अभिलेख अवलोकनासाठी येण्याबाबत कळविले जाते, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. पांडुरंग दत्तात्रय थिटे यानी केली.

संबंधित बांधकामाचा विषय सन १९९३-९४ मधील असून श्री. भाऊसाहेब गावडे यानी सन १९९६ मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, पुणे यांच्याकडे तक्रार केली होती. त्या संदर्भातील अभिलेख अवलोकनाबाबत कळविले असता श्री. थिटे यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. गावडे उपस्थित राहिले. आपल्या कार्यालयाकडील सर्व संचिका त्याना दाखविण्यात आल्या, असे जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे श्री. एस. जे. तांबे व अपिलीय प्राधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे श्री. राहुल कृष्णाजी साकोरे यांनी उत्तरात व प्रथम अपिलाच्या निर्णयात नमूद केल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते. 'संदर्भिय तक्रारीनुसार शाळेतील निधीचा वापर/अपहार झाल्याप्रकरणी रितसर माहिती' अशा स्वरुपात श्री. थिटे यानी माहिती मागितली असून त्यात नेमकेपणा नाही. या स्थितीत संबंधित अभिलेखांचे अवलोकन करण्याबाबत कळविण्याची जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे श्री. एस. जे. तांबे यांची कृती व त्या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे श्री. राहुल कृष्णाजी साकोरे यांनी दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. अशोक लुखाजी निंबाळकर
स.नं. ७८, प्लॉट नं.१६, प्रिमिअर हाईटस्, अपीलकर्ता
ए-विंग, फलॅट नं. १६, डावी भुसारी कॉलनी,
पौड रोड, कोथरुड, पुणे-३८.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, कोपरगांव,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, कोपरगांव,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/७/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** ॲड. अशोक लुखाजी निंबाळकर
स.नं. ७८, प्लॉट नं.१६, प्रिमिअर हाईटस्,
ए-विंग, फलॅट नं. १६, डावी भुसारी कॉलनी,
पौड रोड, कोथरुड, पुणे-३८.

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, कोपरगांव,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर श्री. आर. एस. नवले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मिळकतीचे सन १९५२ ते २००९ या काळातील फेरफार व ७/१२ उतारे याच्या प्रती आपण मागितल्या होत्या. जन माहिती अधिकारी यानी आता माहिती दिली असून तीही अपुरी आहे. आयोगा-पुढील सुनावणीची नोटीस मिळाल्यानंतर माहिती पाठविली. तीही प्रमाणित केलेली नाही. आपण व्यावसायाने वकील असूनदेखिल वैयक्तिक मिळकतीच्या संदर्भातील कागदपत्रे तत्परतेने दिली जात नाहीत ही खेदाची बाब आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता ॲड. अशोक लुखाजी निंबाळकर यानी केले.

ॲड. निंबाळकर यानी मागितलेली माहिती ५० वर्षांहून अधिक काळाची असल्यामुळे व त्या दरम्यान अभिलेख कक्षाचे लिपिक नसल्यामुळे माहिती देता आली नाही. काही माहिती विलंबाने दिली व ऊर्वरित माहिती सोबत आणली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर श्री. आर. एस. नवले यानी माहितीच्या प्रतींसह नमूद केले.

माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबतचा अहवाल संबंधितांच्या लेखी खुलाशासह एक आठवडयात आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार विलंबास जबाबदार असणारे लिपिक श्री. एस.व्ही.भारती यांचा लेखी खुलासा व ऊर्वरित माहिती अपिलकर्त्यास रजिस्टर्ड टपालाने पाठविल्याची पोहचपावती यासह अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, ता. कोपरगांव, जि.अहमदनगर श्री. आर. एस. नवले यानी दि.४.८.२०१० च्या पत्रान्वये सादर केला. माहिती अभिलेख कक्षातील जुन्या कागदपत्रांवरुन उपलब्ध करुन घ्यावयाची होती. परंतु मध्यंतरीच्या काळात जानेवारी ते जूनच्या दरम्यान आपल्या दोन बंधूंचे आकस्मिक निधन झाले. त्यामुळे महिनाभर रजेवर होतो. हजर झाल्यानंतर अनवधानाने माहिती द्यावयाची राहिली, असे श्री. भारती यानी खुलाशात नमूद केले आहे. ॲड. निंबाळकर यांचा माहिती-मागणीचा अर्ज दि. ३.११.२००९ रोजीचा असून विहित मुदतीत त्याना उत्तरही दिले गेलेले नाही. संबंधित लिपिकांच्या अडचणी लक्षात घेतल्या तरी अपीलकर्त्यांना काहीही न कळविणे व जन माहिती अधिकारी

यानी त्याबाबत कोणताही पाठपुरावा न करणे समर्थनीय ठरत नाही. दि. ३.११.२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि. २८.७.२०१० रोजी म्हणजे जवळजवळ ८ महिन्यांनी दिली गेली आहे. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर श्री. आर. एस. नवले यानी श्री. भारती याना माहिती देण्यास सांगितल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ कलम ५ (५) अन्वये तेही जन माहिती अधिकारी ठरतात. मात्र माहिती देण्यास सहाय्य मागितलेल्या लिपिकांनी कार्यवाही केली नाही, हा या लिपिकाचा दोष असला तरी माहिती देण्याबाबतची जबाबदारी असणारे जन माहिती अधिकारी श्री. आर. एस. नवले यानी त्याबाबत कोणतेही प्रयत्न अथवा पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. हे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीत अधिक गांभीर्याने दक्षता घेण्याची व काटेकोर राहण्याची जाणीव संबंधित लिपिक व जन माहिती अधिकारी यांना होणे आवश्यक आहे. अपिलीय प्राधिकारी यानी प्रथम अपिलाची दखल घेतलेली दिसत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूद लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर श्री. पी. एस. राजपूत यानी विहित मुदतीत अपिलावरील कार्यवाही करणे आवश्यक असल्याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता ॲड. अशोक लुखाजी निंबाळकर यानी मागितलेली माहिती ५० वर्षांहून अधिक कालावधीतील असून ती देण्यास झालेल्या विलंबाबाबत लिपिक श्री. एस. व्ही. भारती यानी केलेला खुलासा लक्षात घेतला तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या काटेकोर अंमलबजावणीबाबत जाणिवेचा भाग म्हणून लिपिक श्री. एस.व्ही.भारती व जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर श्री. आर. एस. नवले याना प्रत्येकी रु. ५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम लिपिक श्री. एस.व्ही.भारती व जन

माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर श्री. आर. एस. नवले यांच्या एप्रिल २०११ मध्ये देय असलेल्या मार्च, २०११ च्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर श्री. पी. एस. राजपूत यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. आबासाहेब गोपाळराव पाटील
मु. पो. खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. आबासाहेब गोपाळराव पाटील
मु. पो. खामगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर

**विद्यमान अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी,
जि. सोलापूर श्री. वि. ना. भुजबळ

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** श्री. स. वि. तळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. जी. व्ही. सस्ते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

बार्शी तालुक्यातील कृषी खात्यामार्फत गतिमान योजनेतील गावे, झालेली कामे आदिंची माहिती आपण जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. परंतु त्यानी ती दिली नाही. माहितीसाठीचे शुल्क कळविण्याचे आदेश अपिलीय प्राधिका-यांनी दिले होते. परंतु जन माहिती अधिका-यांनी ते कळविले नाही. त्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. आबासाहेब गोपाळराव पाटील यानी केली.

अपीलकर्ता श्री. आबासाहेब गोपाळराव पाटील यानी दोन अर्जान्वये विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. ती देण्यास बराच कालावधी लागेल. तसेच दि. ३.४.२००९ च्या अर्जाला लावलेले शुल्क स्टॅम्प ॲक्टनुसार पूर्तता करणारे नाही, असे श्री. पाटील याना दि. २७.४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. एका अर्जात त्यानी ३ वर्षांची व एका अर्जात एक वर्षाची माहिती मागितली असून सुमारे ७०-७२ गावांमध्ये चालू असलेल्या कामांची त्यानी मागितलेली माहिती सुमारे ५० हजार पानांची होते. एवढया छायांकित प्रती देण्याएवढे अनुदान कार्यालयाला नाही. शासनाकडे मागणी केली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. जी. व्ही. सस्ते व अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. वि. ना. भुजबळ यांनी केले. अपीलकर्त्यांसह ८ व्यक्ती अशाच प्रकारची विस्तृत माहितीची मागणी करतात. शुल्क भरत नाहीत, व त्यातील दारिद्र्यरेषेखाली असणा-यांना अनुदानाअभावी निःशुल्क माहिती देणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांचे समाधान करता येत नाही, असेही प्रतिपादन त्यानी केले.

अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे प्रमाण लक्षात घेता साधन सामुग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागण्याच्या कारणावरुन (माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ च्या नियम (९) अन्वये) जन माहिती अधिकारी माहिती नाकारु शकले असते. परंतु त्यानी तसे केलेले नाही. आवश्यक तर अभिलेखाचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती लेखी मागणी करुन अपीलकर्ता प्राप्त करुन घेऊ शकतात. तथापि त्यानी मागितलेल्या माहितीसाठीचे शुल्क जन माहिती अधिकारी यानी त्वरित कळवावे व त्यानी शुल्क भरणा केल्यानंतर आठ दिवसांत माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी

अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. जी. व्ही. सस्ते यानी दि. १५.११.२०१० च्या पत्रान्वये श्री. पाटील याना दोन अर्जांमधील माहितीसाठी अनुक्रमे रु. ५२,०६४/- व रु. २५,२६२/- शुल्क कळविले. परंतु 'त्यानी अर्धवट माहितीचे शुल्क कळविले असून महत्त्वाच्या माहितीचे शुल्क कळविलेले नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी वेळेत शुल्क कळविले नसल्यामुळे व वेळेत माहिती दिली नसल्यामुळे त्याना शास्ती व्हावी व माहिती विनाशुल्क मिळावी', अशी मागणी अपीलकर्ता श्री. पाटील यानी दि. १९.११.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. जन माहिती अधिकारी तथा मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. जी. व्ही. सस्ते व अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. वि. ना. भुजबळ यांनी केलेली कार्यवाही लक्षात घेता ही तक्रार दखलपात्र नाही. आवश्यक असल्यास अपीलकर्ता यानी शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश विश्वनाथ गायकवाड
मु. पो. कांडगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरपंच/ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कांडगाव ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८४/२००९/कोल्हापूर + ९६५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. प्रकाश विश्वनाथ गायकवाड
मु. पो. कांडगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर

**विद्यमान अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर ओमराव किसन गहाणे

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** श्री. व्ही. जी. भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा सरपंच/ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कांडगाव ता. करवीर, जि. कोल्हापूर सौ. मनिषा तानाजी निकम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

मटन मार्केट लिलावाच्या संदर्भातील आपण मागितलेला अहवाल २१ दिवस विलंबाने दिला. त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रकाश विश्वनाथ गायकवाड यानी केली.

आपल्याकडे दोन ग्रामपंचायतींचा पदभार असल्यामुळे तसेच अपीलकर्ता श्री. प्रकाश विश्वनाथ गायकवाड व त्यांचे वडिल श्री. विश्वनाथ विष्णु गायकवाड वारंवार तक्रारी आदि स्वरुपाचे अर्ज करीत असतात. अपीलकर्ता ग्रामपंचायतीचे थकबाकीदार असून 'थकबाकीदारांना कोणत्याही प्रकारची कागदपत्रे देऊ नयेत', असा ठराव ग्रामपंचायतीने केलेला असल्यामुळेही माहिती देण्यात अडचण होती. या सर्व कारणांमुळे माहिती देण्यास विलंब झाला. 'मागितलेले सर्व अहवाल मिळाले. कागदपत्रांबाबत कोणतीही तक्रार नाही', असे अपीलकर्ता श्री. प्रकाश विश्वनाथ गायकवाड यानी दि. ३१.७.२००९ च्या पत्रान्वये लेखी दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कांडगाव ता. करवीर, जि. कोल्हापूर सौ. मनिषा तानाजी निकम यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. दोन ग्रामपंचायतींच्या पदभारामुळे विलंब लागल्याचे जन माहिती अधिका-यांचे प्रतिपादन योग्य असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. ओमराव किसन गहाणे यानी सांगितले.

अपीलकर्ता व त्यांचे वडिल माहितीच्या अधिकाराखाली अर्ज, इतर तक्रारी व पत्रव्यवहार सातत्याने करीत असतात. त्या संदर्भात वेळोवेळी त्याना उत्तरे दिली जातात. तथापि एकाच विषयावर माहितीची मागणी व तक्रारी करुन ते त्रास देत असतात. मानवी हक्क आयोगाकडेही त्यानी अर्ज केला होता व तो आयोगाने फेटाळला आहे, असे लेखी निवेदन सरपंच श्री. आनंदराव मारुतराव मेढसींगे, ग्रामपंचायत कांडगाव ता. करवीर, जि. कोल्हापूर यानी श्री. प्रकाश विश्वनाथ गायकवाड व श्री. विश्वनाथ विष्णू गायकवाड यांच्या अर्जांच्या तारीखवार तपशीलासह दि.९.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगाच्या मौखिक आदेशानुसार सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री. प्रकाश विश्वनाथ गायकवाड व श्री. विश्वनाथ विष्णू गायकवाड हे सातत्याने एकाच विषयाच्या अनुषंगाने अर्ज व पत्रव्यवहार करीत असल्याचे दिसून येते. हा माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर म्हणता येणार नाही. तसेच वेळोवेळी त्यांना उत्तरे देण्यात आल्याचे दिसते.

श्री. विश्वनाथ विष्णू गायकवाड यांचे अपील क्र. ९६५/२०१०/कोल्हापूर मध्येही त्यानी दाखल केलेली कागदपत्रे विचारात घेता मटन मार्केट संदर्भातीलच माहिती मागितली असून अन्य बाबी वरील प्रमाणे असल्याचे दिसून येते. त्यामुळे तेही उपरोक्त विवेचनानुसार निकाली काढण्यात येत आहे.

श्री. प्रकाश विश्वनाथ गायकवाड व श्री. विश्वनाथ विष्णु गायकवाड यांना आवश्यक असल्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. श्री. प्रकाश विश्वनाथ गायकवाड यांचे अपील क्र. १४८४/२००९/कोल्हापूर व श्री. विश्वनाथ विष्णु गायकवाड यांचे अपील क्र. ९६५/२०१०/कोल्हापूर ही दोन्ही अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. जिजाबाई दादासाहेब जाधव
मु. पो. सुरवड, ता. इंदापूर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहाय्यक निबंधक, इंदापूर यांचे कार्यालय,
ता. इंदापूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह सचिव,
श्री. भैरवनाथ सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्या.
सुरवड, भांडगाव, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३४/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** सौ. जिजाबाई दादासाहेब जाधव
मु. पो. सुरवड, ता. इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहाय्यक निबंधक, इंदापूर यांचे कार्यालय,
ता. इंदापूर, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्रीमती एस.एस.धस

**जन माहिती अधिकारी** तथा सह सचिव,
श्री भैरवनाथ सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्या.
सुरवड, भांडगाव, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. रावसाहेब उत्तमराव घोगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्त्या सौ. जिजाबाई दादासाहेब जाधव यानी मागितलेली माहिती दिली. ती अपुरी असल्याच्या कारणावरुन सौ. जाधव यानी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहाय्यक निबंधक, इंदापूर यांचे कार्यालय, ता. इंदापूर, जि. पुणे यांचेकडे अपील केले. त्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी झ ालेल्या चर्चेनुसार ऊर्वरित माहितीही दिली. माहिती देण्यास विलंब झाला. मात्र श्री भैरवनाथ सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्या. सुरवड, भांडगाव, ता. इंदापूर, जि. पुणे या संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान वा भागभांडवल मिळत नसून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसतांनाही माहिती दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सह सचिव, श्री भैरवनाथ सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्या. सुरवड, भांडगाव, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. रावसाहेब उत्तमराव घोगरे
यानी केले. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहाय्यक निबंधक इंदापूर यांचे कार्यालय, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. मुकुंद भास्कर पवार यानी त्याला दुजोरा दिला.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच) मधील तरतुदीनुसार श्री भैरवनाथ सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्या. सुरवड, भांडगाव, ता. इंदापूर, जि. पुणे ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. तरीही माहिती देण्याची संस्थेची भूमिका उल्लेखनिय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २१ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.काशिनाथ आनंदा खरात
द्वारा वृषाली मेडिकल, दत्तनगर, आंबेगाव रस्ता, आंबेगांव बु., पुणे-४६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नशिक-४२२२२२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संपादक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नशिक-४२२२२२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.२.२०११ |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सुनावणीला अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी सर्व अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संपादक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नशिक डॉ.रमेश शेकोकार व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नशिक डॉ.प्रकाश अतकरे यानी लेखी निवेदन प्रतिनिधी श्री.उत्तम सावळेराम जाधव यांच्या करवी सादर केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता मे-२००६ मधील व जून २००७ मधील उत्तरपत्रिका जतनाच्या कालावधीनुसार उपलब्ध नसल्यामुळे त्याच्या प्रती देता येणार नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संपादक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नशिक यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा

कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नशिक यानी तो निर्णय कायम केला असून कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विनोदकुमार भगवान शिंदे
९/१५७, रविवार पेठ, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहरदास स्ट्रीट फोर्ट, मुंबई-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा उद्यांग केंद्र, होटगी रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८५ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा उद्यांग केंद्र, होटगी रोड, सोलापूर
विद्यमान-प्रतिनिधी श्री.अे.आर.औटी, तत्कालीन श्री.एम.व्ही.महेर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.विनोदकुमार भगवान शिंदे यानी शुल्क भरल्यानंतर सन १९९० ते २००९ या कालावधीतील विस्तृत स्वरूपाची संपूर्ण माहिती (सुमारे ५६७ पाने ) यूपीसीने पाठविल्याचे जन माहिती

अधिकारी तथा जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा उद्यांग केंद्र, होटगी रोड, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.अे.आर.औटी यानी माहितीच्या प्रतींसह व अपीलकर्त्याची पोहोचदर्शक स्वाक्षरी असलेल्या पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा उद्यांग केंद्र, होटगी रोड, सोलापूर यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२ फेब्रवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विशाल विनायक भंडारे
बुधवार पेठ, राहुल चौक, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८६ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विशाल विनायक भंडारे
बुधवार पेठ, राहुल चौक, सोलापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९९३ मध्ये झालेल्या भूकंपातील ग्रस्त व्यक्तींना अनुदान देण्याच्या योजनेत आपल्या नातेवाईकांनी खोटेपणाने वारस नोंद लावून घर पडलेले नसताना अनुदान घेतले आहे. त्याबाबत पुरावे सादर करूनही कारवाई केली जात नाही व त्यानी अनुदान मिळण्यासाठी सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीही दिल्या जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विशाल विनायक भंडारे यानी केली.

अभिलेखाची तपासणी केली असता, संबंधित माहिती आढळत नसल्याचे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले. प्रथम अपिलाच्या दरम्यान अपीलकर्त्याने आणखी काही माहितीची मागणी केली. कार्यालयाकडील उपलब्ध माहिती त्या त्या वेळी दिली असून अपीलकर्त्याची मागणी असलेल्या कागदपत्रांची जतनाच्या वर्गवारीनुसार मुदत पाच वर्षांची आहे. त्यामुळे अनुदान वाटपाच्या वेळचे पंचनामे, सादर करण्यात अलेली कागदपत्रे आदिंच्या प्रती देता येणे शक्य नाही, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.बी.आर.माळी यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अनुदान वाटपातील गैरप्रकाराची अपीलकर्त्याची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मकसूद बशीर शेख
रा. महिबूबनगर, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/११/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,<br>सहकारी संस्था, सोलापूर श्री. बालाजी शरणप्पा कटकदौंड | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

सहकारी पतसंस्थेच्या सन १९९७ ते २००१ या कालावधीतील निवडणूकीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. मकसूद बशीर शेख यानी मागितली होती. कार्यालयाच्या स्तरावरील माहिती दिली व संस्थेच्या स्तरावरील माहितीसाठी पतसंस्थेला कळविले. मोहोळ तालुका व्यापारी ग्रा. बि. शेती सहकारी

पतसंस्था, मोहोळ या पतसंस्थेला कोणतेही शासकीय अनुदान वा भागभांडवल नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे पतसंस्थेने कळविले. तसेच अपीलकर्त्यांची नादेय दाखल्याची मागणी असून त्यांच्याकडे ५० हजार रुपयांचे कर्ज थकित असल्यामुळे व त्याबाबतचा दावा न्यायालयात दाखल असल्यामुळे असा दाखला दिला नाही, असेही संस्थेने कळविले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर श्री. बालाजी शरणप्पा कटकदौंड यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार उपरोक्त पतसंस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सय्यद लियाकत बादशहा साहेब काझी — अपीलकर्ता
मु. पो. नाझरा, ता. सांगोला, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह.संचालक,
साखर विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर,पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
सांगोला तालुका सहकारी साखर कारखाना लि.
वाकी, ता. सांगोला, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक सह.संचालक,
साखर विभाग, पुणे साखर संकुल,
शिवाजीनगर,पुणे श्री. डी. आर. घोडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

सांगोला तालुका सहकारी साखर कारखाना लि. वाकी (शिवणे), ता. सांगोला, जि. सोलापूर साखर कारखान्याला शासनाचे रु. १२ कोटी भागभांडवल असून रु. ७ कोटींचे सवलतीच्या दरातील कर्ज आहे. त्याला शासनाची हमी आहे. कारखान्याच्या सभासद यादीत अपीलकर्त्यांच्या नावात झालेल्या चुकीच्या अनुषंगाने अपीलकर्त्यांनी माहिती मागितली होती. मुद्रण दोषातून ही चूक झाली असून त्याबाबतचा सविस्तर खुलासा केल्याचे कारखान्याने कळविले, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सह.संचालक, साखर विभाग, पुणे साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री. डी. आर. घोडे यानी नमूद केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत कार्यवाही होणे आवश्यक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सांगोला तालुका सहकारी साखर कारखाना लि. वाकी, ता. सांगोला, जि. सोलापूर श्री. यशवंत शंकरराव कुलकर्णी याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २२ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.परमेश्वर दत्तात्रय तळेकर
मु.पो.केम, ता.करमाळा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बाशी, ता.बार्शी, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३७ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बाशी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.सुधाकर किशनराव दरबस्तवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

शेतीपंपासाठी दिलेल्या वीज जोडणीच्या संदर्भातील माहिती अपूर्ण व विलंबाने मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.परमेश्वर दत्तात्रय तळेकर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.तळेकर यानी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. अपुरा कर्मचारी वर्ग, वीज पुरवठाविषयक तातडीची कामे व माहितीचे विस्तृत स्वरूप यामुळे माहिती देण्यास विलंब झाल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर यानी प्रथम अपिलाच्या सुनावणीत नमूद केले व त्यावेळी काही माहिती दिली. तथापि ती अपूर्ण असल्याची अपीलकर्ता यांची तक्रार असल्यामुळे परिपूर्ण माहिती देण्याचे आदेश दिले. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता केली, असे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.सुधाकर किशनराव दरबस्तवार यानी नमूद केले.

माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर यानी दहा दिवसांत खुलासा सादर करावा असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले, परंतु त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी कार्यवाही केली नाही. त्याबाबत स्मरण दिल्यानंतर दि.३०.११.२०१० च्या पत्रान्वये त्यानी खुलासा सादर केला. अपुरा कर्मचारी वर्ग व तातडीची कामे यामुळे, तसेच विस्तृत व संदिग्ध स्वरूपाची माहितीची मागणी असल्यामुळे माहिती संकलित करण्यास विलंब लागेल याची कल्पना अपीलकर्त्यास दिली होती. दर वेळी ते विस्तृत स्वरूपाची माहिती मागत असतात, असे प्रतिपादन खुलाशात केले असून विलंब क्षमापित करण्याची विनंती केली आहे.

दि.३०.६.२००९ च्या अर्जानुसार दि.२४.९.२००९ रोजी पूर्ण माहिती दिली असल्याचे उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यावरून दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.पी.एस.जोशी यांच्या खुलाशातील कारणे लक्षात घेऊनही विलंबाचा पूर्ण कालावधी क्षमापित करण्यासाठी समर्थनीय नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(३) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(४) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, जेऊर उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.पी.एस.जोशी यानी दि.३०.६.२००९ च्या अर्जावर प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दि.२४.९.२००९ रोजी माहिती दिली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील ३० दिवसांची विहित मुदत वजा जाता ५४ दिवस विलंब झाला आहे. श्री.जोशी यानी नमूद केलेली कारणे लक्षात घेऊन त्यातील ३० दिवस क्षमापित करण्यात येत असून ऊर्वरित २४ दिवसांसाठी श्री.जोशी याना प्रतिदिन रूपये २५०/- प्रमाणे रूपये ५३००/- शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती त्याना एप्रिल २०११ व मे २०११ मध्ये मिळणाऱ्या मार्च २०११ व एप्रिल २०११ या महिन्यांच्या वेतनातून दोन हप्त्यांत वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बाशी, ता.बार्शी, जि.सोलापूर यानी करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २३ फेब्रुवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.महंमद बाबालाल मुल्ला
३८, लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी. **अपीलकर्ता**
सातारा-४१५ ००४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
सातारा नगरपरिषद, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग),**
सातारा नगरपरिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३२/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग),**<br>सातारा नगरपरिषद, सातारा<br>**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**<br>सातारा नगरपरिषद, सातारा<br>यांचे प्रतिनिधी श्री.मोहन रघुनाथ जाधव (वरिष्ठ लिपिक) | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** रजिया कन्स्ट्रक्शन कंपनी, सातारा याना सन २००९-१० या वर्षात मंजूर करण्यात आलेल्या निविदांच्या धारिकांचे अवलोकन, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेतंर्गत सन २००८-०९, व सन २००९-१० या कालावधीत करण्यात आलेली कामे तदनुषंगिक एकूण ५ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.महंमद बाबालाल मुल्ला यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मला जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग), सातारा नगरपरिषद, सातारा यांच्याकडून आवश्यक असणारी सर्व माहिती मिळाली असून याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. माझे अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.मुल्ला यानी दि.१८.२.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती सिंधु शिवाजी यादव
४३, केसरकर पेठ, सातारा शहर, **अपीलकर्ता**
सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
सातारा नगरपरिषद, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम विभाग),**
सातारा नगरपरिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९९/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (बांधकाम विभाग),**<br>सातारा नगरपरिषद, सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**<br>सातारा नगरपरिषद, सातारा<br>यांचे प्रतिनिधी श्री.मोहन रघुनाथ जाधव | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** स्वतःच्या मिळकतीमधील गटाराचे अतिक्रमण काढणेसंदर्भात दिलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती सिंधु शिवाजी यादव यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मला जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बांधकाम विभाग), सातारा नगरपरिषद, सातारा यांच्या कडून परिपूर्ण माहिती मिळाली असल्याने माझी कोणतीही तक्रार नाही. माझ्या अपिलाची सुनावणी रद्द करावी', असे निवेदन अपीलकर्त्या श्रीमती यादव यानी दि.१८.२.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुधीर अच्युतराव देशमुख
मु.पो.ता.आटपाडी, **अपीलकर्ता**
जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
सांगली पाटबंधारे मंडळ, वारणाली,
विश्रामबाग, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता,**
लघु पाटबंधारे (बांधकाम),
उप विभाग, आटपाडी, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८५/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता,**<br>लघु पाटबंधारे (बांधकाम),<br>उप विभाग, आटपाडी, जि.सांगली<br>श्री.सुभाष काशिनाथ मेटकर | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.एस.के.मेटकर, उपअभियंता यांच्या कार्यकालावधीत सन २००४-०९ या कालावधीत करण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेच्या कामाबाबतची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुधीर अच्युतराव देशमुख यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता, लघु पाटबंधारे (बांधकाम), उप विभाग, आटपाडी, जि.सांगली यांच्याकडून आवश्यक ती सर्व माहिती उपलब्ध झाली आहे. त्याबद्दल मी समाधानी आहे. माझी कोणतीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.देशमुख यानी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

प्रा.चंद्रकांत ज्ञानदेव लोखंडे
पदार्थ विज्ञान विभाग, **अपीलकर्ता**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव,**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
कोल्हापूर-४१६ ००४

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
कोल्हापूर-४१६ ००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६६/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** पुरस्कार प्राप्त गुणवंत विद्यापीठ शिक्षकांच्या संदर्भातील माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता प्रा.चंद्रकांत ज्ञानदेव लोखंडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर दरम्यानच्या काळात मला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून हवी असणारी माहिती मिळाली

असल्याने मी पूर्ण समाधानी आहे. माझी कुठलीही तक्रार राहिलेली नाही. मी अपील मागे घेत आहे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.लोखंडे यानी दि.१४.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संजय अण्णाप्पा कांबळे
मु.पो.रुकडी, ता.हातकणंगले, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उपविभाग क्र.६,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**<br>ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उपविभाग क्र.६,<br>ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर<br>यांचे प्रतिनिधी श्री.संजय चिंतामणी अवघडे, कार्यालय अधीक्षक | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००५-०९ या कालावधीत भारत निर्माण योजने अंतर्गत रुकडी येथे सुरु असणाऱ्या कामासंदर्भातील माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.संजय अण्णाप्पा कांबळे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मी मागणी केलेली माहिती मला जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने मी आयोगाकडे दाखल केलेले अपील माघारी घेत असून अपील अर्ज निकाली काढण्यात यावा', असे अपीलकर्ता श्री.कांबळे यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उपविभाग क्र.६, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.संजय चिंतामणी अवघडे, अधीक्षक यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.छगन जगन्नाथ देसाई
३३/११, के.व्ही.महावितरण उपकेंद्र, **अपीलकर्ता**
अंकलखोप, ता.पलूस, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महावितरण विभागीय कार्यालय,
ताकारी रोड, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ व्यवस्थापक (आस्थापना),**
महावितरण विभागीय कार्यालय,
ताकारी रोड, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५२/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली यांच्या कार्यालयात दि.२३.९.२००९ रोजी दिलेल्या जबाबानुसार अदा केलेल्या देयकांच्या सत्यप्रती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.छगन जगन्नाथ देसाई यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,

महावितरण विभागीय कार्यालय, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली व जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ व्यवस्थापक (आस्थापना), महावितरण विभागीय कार्यालय, इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली यानी दिलेल्या माहितीबाबत मी समाधानी आहे. सुनावणीच्या वेळी मी हजर राहण्याची आवश्यकता नाही. माझे अपील निकाली काढण्यात यावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.देसाई यानी दि.८.२.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.गजानन सदाशिव कुंभार
मु.पो.समडोळी, ता.मिरज, **अपीलकर्ता**
जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपलिका,
सांगली-४१६ ४१६

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता (बांधकाम विभाग),**
प्रभाग समिती क्र.३
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपलिका,
सांगली-४१६ ४१६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४९/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.२.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**<br>प्रभाग समिती क्र.३ सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपलिका,<br>सांगली-४१६ ४१६<br>यांचे प्रतिनिधी श्री.गिरीष फाटक<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त,**<br>सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपलिका,<br>सांगली-४१६ ४१६ श्री.विजय कुलकर्णी | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** बांधकाम विभागामार्फत उपमहापौर फंडातून करण्यात आलेल्या कामाच्यासंदर्भातील एकूण १० मुद्दे |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.गजानन सदाशिव कुंभार यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२२.२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. 'माझ्या माहिती-मागणी नुसार मला दरम्यानच्या काळात जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपलिका, सांगली यांच्या वतीने माहिती देऊन माझे संबंधित विषयाबाबत शंका निवारण केली आहे. तरी सदरचे अपील निकाली काढावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.कुंभार दि.१८.२.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २३ फेब्रुवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**